# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार १६ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ ८







## आरटीआय कार्यकर्ता देशातील नवा व्यवसाय बनलाय

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** रस्ता बांधकामाच्या कामात सरकारी कर्मचा-याला अडथळा आणल्याचा आरोप असलेल्या एका माहिती अधिकार कार्यकर्त्याचा अटकपूर्व जामीन सर्वोच्च न्यायालयाने सोमवार दि. १५ मे ला फेटाळला. हा जामीन फेटाळताना, माहिती अधिकार कार्यकर्ता असणे हा आता एक नवा व्यवसाय बनला आहे अशी तोंडी टिप्पणी न्यायालयाने



केली.खंडपीठातील न्यायमूर्ती मेहता म्हणाले आरटीआय कार्यकर्ते असणे हा आता एक नवा व्यवसाय झाला आहे. केंद्र सरकारने निधी दिला आहे, रस्ता बांधकामाची काळजी सरकार घेईल. तुम्ही कोणीही नाही आहात. कसले हे तथाकथित आरटीआय कार्यकर्ते! हे म्हणजे यलो जर्नलिझम (पित्त पत्रकारिता) आहे. अर्ज फेटाळण्यात येत आहे.

न्यायमूर्ती बिश्नोई यांनी देखील बेहल यांच्या रस्ता बांधकामाच्या देखरेखीवर (मानिटरिंग) प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले या सर्व रस्त्यांच्या कामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवणारे तुम्ही कोण आहात? तुम्ही कोणी वरिष्ठ अधिकारी आहात का? असा सवाल त्यांनी केला. या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि त्याच्या एका साथीदारावर चालू असलेल्या रस्ता बांधकामाच्या कामात अडथळा आणल्याचा आरोप आहे. काम करून घेणा-या पर्यवेक्षकाला (सुपरवायझर) आणि मजुरांना धमकावले होते. सुपरवायझरला मारहाण केली आणि त्याच्या साथीदाराने लाथा बुक्क्यांनी मारले, असाही त्यांच्यावर आरोप आहे. यासोबतच त्यांनी तिथे काम करणा-या मजुरांना जातीवाचक शिवीगाळ केली. या सर्व प्रकारानंतर त्यांच्यावर नवीन कायद्यानुसार (भारतीय न्याय संहिता) मारहाण व सरकारी कामात अडथळा आणल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**अर्ज फेटाळल्यानंतर सुप्रीम कोर्टात धाव-**या प्रकरणी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारल्यानंतर माहिती अधिकार कार्यकर्ते राकेश कुमार बेहल यांनी जामिनासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यावर न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

## जयपूरमध्ये आंदोलन पेटले

# CJP प्रमुख दीपके यांना थप्पड; समर्थकांकडून तरुणांना चोप

**जयपूर/वृत्तसंस्था :** जयपूरमधील शहीद स्मारकावर सुरू असलेल्या एका आंदोलनादरम्यान आज जोरदार हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. NEET पेपरफुटी, शिक्षण व्यवस्था आणि बेरोजगारीविरोधात पुकारण्यात आलेल्या आंदोलनात काकरोच जनता पार्टीचे (CJP) संस्थापक अभिजीत दीपके यांना दोन तरु णांनी जाहीरपणे कानशिलात लगावली. या घटनेनंतर संतप्त झालेल्या पक्ष समर्थकांनी दोन्ही तरु णांना पकडून घटनास्थळीच बेदम चोप दिला. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत कानशिलात मारणा-या तरु णाला ताब्यात घेतले आहे. NEET पेपरफुटी आणि तरुणांच्या विविध समस्यांवरून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी शेकडो आंदोलक शहीद स्मारकावर एकत्र आले होते. CJP प्रमुख ⇨(पान २ वर)





### द्वेष करणा–यांना 'गेट वेल सून'चा संदेश

राजस्थानमध्ये आंदोलनावेळी दिपकेंवर काही जणांना हल्ला केल्याचा हा प्रकार कॅमे-यात कैद झाला आहे. नीट पेपरफुटीप्रकरणी आवाज उठवत असलेल्या दिपकेंच्या जयपूर येथील आंदोलनावेळी ही घटना घडली. याप्रकरणी आता दिपकेंनी पहिली प्रतिक्रिया दिली असून, एकदा नाही दहावेळी कानाखाली मारली तरी मूळ ⇨(पान २ वर)

## भारत ग्राहक नव्हे, जगाचे प्रश्न सोडवणारा देश-पंतप्रधान

**पॅरिस/वृत्तसंस्था :** भारत आता केवळ जगातील तांत्रिक आणि आर्थिक उपायांचा ग्राहक राहिलेला नाही, तर अनेक जागतिक समस्यांवर उपाय सुचवणारा आणि त्यात योगदान देणारा देश बनला आहे असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी येथे रविवारी केले.फ्रान्समधील भूमध्य समुद्रकिनारी असलेल्या नीस येथे आयोजित भारत इनोव्हेट्स २०२६ या कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रान यांच्या उपस्थितीत मोदी बोलत होते. मोदी म्हणाले की, भारतातील तरु ण संशोधक आणि उद्योजक मानवजातीच्या हितासाठी उपयुक्त ठरणारे उपाय विकसित करत आहेत. दहा वर्षांपूर्वी जग भारताकडे तंत्रज्ञान स्वीकारणारा देश म्हणून पाहत



होते. पण, आज भारत तंत्रज्ञान पुरविणारा देश म्हणून उदयास येत आहे. या पार्श्वभूमीवर भारत इनोव्हेट्स हा भारतासोबत जागतिक नवोन्मेषाचा पुढचा अध्याय लिहिण्यासाठी जगाला दिलेला खुले निमंत्रण आहे असे मोदी म्हणाले. मोदींनी उच्च तंत्रज्ञान, संरक्षण, संशोधन आणि नवोन्मेष क्षेत्रांमध्ये सरकारने केलेल्या सुधारणांचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, भारताची रिफार्म एक्स्प्रेस थांबणार नाही; ती पुढेही वेगाने धावत ⇨(पान २ वर)

## 22 जूनपासून राज्याचे पावसाळी अधिवेशन

**मुंबई / प्रतिनिधी:** महाराष्ट्र विधिमंडळाच्या आगामी पावसाळी अधिवेशनाचे सविस्तर वेळापत्रक ठरवण्यासाठी आज मुंबईत पार



पडलेली कामकाज सल्लागार समितीची महत्त्वाची बैठक आता संपली आहे. या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, राज्याचे पावसाळी अधिवेशन २२ जून ते १० जुलै २०२६ या कालावधीत होणार आहे. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत अधिवेशनाचा कालावधी निश्चित करण्यात आला असून, आगामी पावसाळी अधिवेशनाचे कामकाज एकूण तीन आठवडे चालणार आहे. या तीन आठवड्यांच्या कालावधीत अनेक महत्त्वाची विधेयके, जनहिताचे प्रश्न आणि शासकीय कामकाज पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सध्या राज्यातील शेतक-यांचे प्रश्न, कर्जमाफी, आगामी निवडणुका आणि राजकीय घडामोडी पाहता हे तीन आठवड्यांचे पावसाळी अधिवेशन अत्यंत वादळी ठरण्याची शक्यता आहे. विरोधकांनी विविध मुद्द्यांवरू न सरकारला कोंडीत पकडण्याची तयारी केली असून, सत्ताधारी पक्ष देखील विरोधकांना चोख उत्तर देण्यासाठी सज्ज झाला आहे. त्यामुळे २२ जूनपासून मुंबईत हायव्होल्टेज राजकीय रणसंग्राम पाहायला मिळणार आहे.

## खा.सायोनी घोष भाजप समर्थक गटात सामील

**कोलकाता/वृत्तसंस्था :**सयोनी घोष यांनीही तृणमूल काँग्रेसमध्ये ममता बॅनर्जी यांच्या विरोधात बंड केले असून, त्या भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएला पाठिंबा देणा-या गटात सामील झाल्या आहेत. सयोनी यांनी एक मोठे विधान केले. माध्यमांना नव्हे, तर आपल्या मतदारसंघातील जनतेला उत्तर देणार असल्याचे त्यांनी सांगितले. माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या विरोधात बंड केलेल्या तृणमूल काँग्रेसच्या खासदार सायनी घोष यांनी रविवारी या विषयावर मौन सोडले. विमानतळावर त्यांनी माध्यामांसोबत संवाद साधला. 'योग्य वेळ आल्यावर त्या या विषयावर बोलतील. त्यांनी पत्रकारांना सांगितले, 'मी तुम्हाला उत्तर देणार नाही, पण मी माझ्या मतदारसंघातील जनतेला उत्तर देईन.' सायनी यांनी इतर अनेक टीएमसी खासदारांसोबत बंड करून काकोली घोष यांच्या नेतृत्वाखालील बंडखोर गटात प्रवेश केला आहे. सुमारे २० टीएमसी खासदार फुटले आहेत. सायनी या रविवारी दिल्लीत दाखल झाल्या. विमानतळावर पत्रकारांशी बोलताना, घोष यांनी या प्रकरणावर भाष्य करण्यास नकार दिला. त्या म्हणाल्या, 'मी सध्या काहीही बोलणार नाही. योग्य



वेळ आल्यावरच मी बोलेन.' बंडखोर टीएमसी खासदार आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांच्यात एक बैठक नियोजित आहे, यामध्ये ते लोकसभेत स्वतासाठी स्वतंत्र आसनव्यवस्थेची मागणी करण्याची शक्यता आहे.

**२० खासदारांचा समावेश-** पक्षात सुरू असलेल्या राजकीय बंडाच्या पार्श्वभूमीवर तृणमूल काँग्रेसच्या आणखी एक खासदार, माला राय, यादेखील दिल्लीत दाखल झाल्या आहेत. बंडखोरांमध्ये सायनी घोष, काकोली घोष आणि युसूफ पठाण यांच्यासह १९ ते २० खासदारांचा समावेश आहे. या सर्वांनी ममता बॅनर्जी यांना सोडून एक नवीन गट स्थापन केला असून एनडीएला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. ⇨(पान २ वर)

## 'ज्यांना जायचे आहे, त्यांनी खुशाल जावे'

### मातोश्रीवरील खासदारांच्या बैठकीत उद्धव ठाकरेंचे उद्गार

**मुंबई/प्रतिनिधी :**'ज्यांना जायचे आहे, त्यांनी खुशाल जावे; त्यांचे भले व्हावे. बाळासाहेबांची शिवसेना सोडून जाणा-यांना आज ना उद्या पश्चाताप होणार आहे', असे नाराज उद्गार उद्धवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काढले. पक्षातील काही खासदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाणार असल्याची चर्चा रंगली आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंनीखासदारांची बैठक मातोश्रीवर बोलावली होती.

सूत्रांच्या हवाल्याने मातोश्रीवरील बैठकीत झालेल्या घडामोडींबद्दलचे वृत्त दिले आहे. उद्धव ठाकरे खासदारांची बैठक घेतली. काही खासदार गैरहजर होते, तर काहींनी ऑनलाईन उपस्थिती लावली होती. या बैठकीत उद्धव ठाकरे म्हणाले की, 'आजचा दिवस माझा नसला, तर उद्याचा दिवस माझा नक्की आहे. तोपर्यंत सोसावे लागेल, सहन



करावे लागेल. जे बाळासाहेबांची शिवसेना सोडून गेले, त्यांना पश्चाताप होईल. पण, तोपर्यंत वेळ गेलेली असेल', असे विधान ठाकरे यांनी खासदारांशी बोलताना केले. उद्धव ठाकरेंनी बैठकीत शिवसेनेत झालेल्या फुटीचाही दाखल दिला. ते म्हणाले, 'मागच्या वेळी फूट पडली. तेव्हाही मला सगळं माहिती होतं, पण जबरदस्तीने हात धरू न थांबवण्यात अर्थ नव्हता. त्यामुळे ज्यांना जायचे आहे, त्यांनी खुशाल जावे. त्यांचे भले व्हावे. असे मी म्हणेन', असे उद्गार ठाकरेंनी काढले. पुण्यात माध्यमांशी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, 'लोक अंधभक्त असतात, पणण आम्ही आमच्या सहका-यांवर अंधविश्वास ठेवतो. आमच्यासोबत जे लोक आहेत, त्यांना २०२४ च्या निवडणुकीमध्ये उद्धव ठाकरेंवर विश्वास ठेवून लोकांनी मोठ्या मताधिक्याने निवडून आणले आहे. संसदेमध्ये दोन तृतीयांश बहुमत हवे असल्याने भाजपाकडून देशभरात तोडफोड सुरू आहे.'

## अभियांत्रत्रिकी सीईटीचा निकाल जाहीर 26 विद्यार्थ्यांना 100 पर्सेंटाईल

**मुंबई :** अभियांत्रिकी अभ्यासक्रमसह इतर काही तंत्रज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणा-या गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र (पीसीएम) विषय गटाच्या प्रवेश परीक्षेच्या (सीईटी) पहिल्या संधीचा निकाल सोमवारी सायंकाळी जाहीर करण्यात आला. या परीक्षेत २६ विद्यार्थ्यांना १००



पर्सेंटाईल मिळाले आहेत. त्यात २२ विद्यार्थी तर ४ विद्यार्थिनी आहेत. १०० पर्सेंटाईल गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांमध्ये २४ विद्यार्थी राज्यातील तर दोन विद्यार्थी इतर राज्यातील आहेत. हा निकाल सर्व विद्यार्थ्याच्या ल?गीनमध्ये उपलब्ध करू न देण्यात आला असून या अभ्यासक्रमाची सामाईक प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार आहे.

पीसीएम समूहाच्या पहिल्या संधीची सीईटी ११ ते २० एप्रिल या कालावधीत १६ सत्रात घेण्यात आली. या सीईटीला एकूण ४ लाख ७९ हजार ३३२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यात १६ सत्रांत मिळून ४ लाख ५४ हजार ०६९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यामध्ये २ लाख ७३ हजार १३५ विद्यार्थी होते व १ लाख ८० हजार ९१६ विद्यार्थिनी होत्या तर १८ तृतीयपंथीय होते. ही सीईटी राज्यातील ४ लाख ⇨(पान २ वर)

## राज्यभरात शाळा आजपासून सुरू

**मुंबई / प्रतिनिधी-**महिनाभराच्या प्रदीर्घ सुटीनंतर आजपासून राज्यातील शाळांना अधिकृतपणे सुरु वात झाली आहे. पहिल्याच दिवशी शाळेत पाउल ठेवणा-या विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह पाहायला मिळाला. राज्यभरात विविध ठिकाणी मंत्री, लोकप्रतिनिधी आणि शिक्षकांनी शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, नवीन गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पनवेलमधील वहाळ येथील जिल्हा परिषद शाळेला थेट भेट दिली. यावेळी त्यांनी तेथील आधुनिक शिक्षणपद्धती आणि शिक्षकांच्या कामाचे भरभरू न कौतुक केले. आज जिल्हा परिषदेतील शाळांचे शिक्षण हे ९० टक्के खाजगी शाळांपेक्षाही अधिक चांगल्या दर्जाचे झाले आहे असे मुख्यमंत्री यावेळी



म्हणाले.नवप्रवेशित विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प, नवीन गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले, तर काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या पायांचे ठसे घेउन त्यांचे औक्षण करत स्वागत करण्यात आले. अंतुलेनगर येथील जिल्हा परिषद शाळेत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रम पार पडला. शाळा रंगीबेरंगी फुग्यांनी सजवण्यात आल्या होत्या आणि पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने शाळा परिसर आनंदाने फुलून गेला.

**जि.प.शाळा माडेल होत आहेत :** सुनेत्रा पवार ⇨(पान २ वर)

### विदर्भातील शाळा 30 जूनपासून

अमरावती जिल्ह्यातील सीबीएसई आणि राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा आता १५ जूनऐवजी ३० जूनपासून सुरू होतील. विदर्भातील सध्याचे उष्णतामान, विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे निर्देश लक्षात घेउन शिक्षण विभागाने हा निर्णय घेतला. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी आणि शाळा व्यवस्थापनांना याबाबतचे निर्देश जारी केले आहेत.

## राम मंदिरात चोरी, 50 कर्मचारी रडारवर



**अयोध्या/वृत्तसंस्था :** येथील राम मंदिरातील दानपेट्यांमधून देणग्यांच्या चोरीने सर्वांना धक्का बसला आहे. प्राथमिक अंदाजानुसार, ही चोरी २०० कोटी रु पयांपेक्षा जास्त असू शकते. नोटांच्या मोजणीशी संबंधित सुमारे ५० कर्मचारी संशयाच्या घे-यात आहेत. पोलिस आणि तपास यंत्रणांनी आतापर्यंत ५ कर्मचा-यांकडून सुमारे २ कोटी रु पयांची रोकड, एक कार आणि ३ आयफोन जप्त केले आहेत.४ दिवसांपूर्वी दिल्लीतून एक आयपीएस अधिकारी अयोध्येत पोहोचले. त्यांना एका विशेष विमानाने आणले होते. ते देखील श्रीराम जन्मभूमी परिसरात ट्रस्टच्या पदाधिका-यांशी चर्चा करू न अहवाल तयार करत आहेत. दरम्यान, या प्रकरणाच्या चौकशीसाठी शासनाने एक विशेष तपास समिती स्थापन केली आहे. एसआयटी १५ दिवसांत आपला अहवाल सादर करेल. एजन्सीने ठेवलेल्या कर्मचा-यांपैकी बहुतेक जणांना दरमहा १४,५०० रु पये वेतन मिळते. ट्रस्टशी संबंधित कर्मचा-यांमध्ये काही असे आहेत जे विनावेतन सेवा देतात. संपूर्ण प्रकरणाची सुरु वात तेव्हा झाली, जेव्हा या कर्मचा-यांमध्ये समाविष्ट असलेले अनुकल्प मिश्रा, लवकुश, राजेश पाठक, रामशंकर उर्फ टिन्नू यादव, केडी तिवारी, मनीष यादव, करु ण, रितिक सिंह, श्रीवास्तव आणि मौर्य गेल्या ५ वर्षांत करोडपती झाले. त्यांची जीवनशैली बदलली. महागड्या गाड्या आणि जमिनी खरेदी केल्या. जे कर्मचारी फक्त पगारावर गुजराण करत होते, ते लोक त्यांच्या निशाण्यावर आले. जेव्हा मंदिर प्रशासनात त्यांचे ऐकले गेले नाही, तेव्हा रामकोट मोहल्ल्यातील एका कर्मचा-याने या चोरीच्या चर्चेला सार्वजनिक केले. ही गोष्ट अयोध्येच्या गल्ल्यांमधून ⇨(पान २ वर)

### हर हर महादेव, 5 महिन्यांची प्रतीक्षा संपली

## भीमाशंकर ज्योतिर्लिंगाचे दर्शन सुरु

**पुणे/प्रतिनिधी :**बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या भीमाशंकर मंदिराचे दरवाजे तब्बल पाच महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर पुन्हा एकदा भाविकांसाठी खुले करण्यात आले आहेत. मंदिर प्रशासनाच्या निर्णयामुळे राज्यभरातील शिवभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मंदिरात दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येण्याची शक्यता लक्षात घेउन प्रशासनाने काही नवीन नियम लागू केले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मंदिर परिसरातील दुरु स्ती, संवर्धन आणि सुरक्षाविषयक कामांमुळे दर्शन व्यवस्था काही काळासाठी मर्यादित करण्यात आली होती. आता ही कामे पूर्ण झाल्यानंतर भाविकांना नियमित



दर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. भाविकांची सुरक्षितता, शिस्तबद्ध दर्शन व्यवस्था आणि गर्दी नियंत्रणासाठी मंदिर प्रशासनाने पाच नवीन नियम लागू केले आहेत. मंदिर परिसरात प्रवेश करण्यापूर्वी ओळखपत्र बाळगणे, ऑनलाइन किंवा ऑफलाइन नोंदणीची प्रक्रिया ⇨(पान २ वर)

### जहाजाचे इंजिन निकामी, 11 भारतीयांची सुटका

**दुबई :** ओमानच्या किना-याजवळ अडकलेल्या भारतीय ध्वजांकित विराट-१ या व्यापारी जहाजावरील १४ पैकी ११ भारतीय खलाशांची सुटका सुरू असल्याची माहिती मस्कतमधील भारतीय दूतावासाने दिली. सुरु वातीला या घटनेबाबत फारशी माहिती देण्यात आली नव्हती. मात्र नंतर जहाजाच्या इंजिनमध्ये बिघाड झाल्यामुळे ही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले.दूतावासाने सोशल मीडियावरील निवेदनात जहाजाचे इंजिन निकामी झाल्यानंतर ११ खलाशांना सुरक्षितपणे लाइफ राफ्ट (जीवरक्षक तराफा) मध्ये स्थलांतर केले. त्यानंतर त्यांना एमव्ही जबल अली-९ या जहाजावर सुरक्षित पोहोचवण्यात आले आहे.

## प्रसिद्ध मराठी अभिनेत्री संचिता उगलेची आत्महत्या

**मुंबई/प्रतिनिधी :**नालासोपारा पूर्वेतील आचोळे गाव परिसरात राहणा-या २२ वर्षीय अभिनेत्री संचिता उगले हिने राहत्या घरी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून,



पोलिसांकडून आत्महत्येच्या कारणांचा तपास सुरू आहे. आचोळे गावातील साई संतोषी इमारतीत राहणा-या अभिनेत्री संचिता उगले हिने शनिवारी (१४ जून) सायंकाळी सुमारे ७ ते ८ वाजण्याच्या सुमारास घरातील बेडरूममध्ये आत्महत्या केली. यावेळी तिने घराचा दरवाजा आतून बंद करू न घेतला होता. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी व स्थानिक नागरिकांनी तिला तातडीने वसई-विरार महानगरपालिका रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणीअंती तिला मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच आचोळे पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करू न मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे.

**संचिताने 'छावा'त केले काम-** अभिनेत्री संचिता उगले हिनं अनेक गाजलेल्या मालिकांमध्ये काम केलं आहे. कुमकुम भाग्य, वागले की दुनिया यांसारख्या प्रसिद्ध शोमधून संचितानं आपली वेगळी ओळख निर्माण केली. तसेच दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे शोमध्येही तिने काम केले आहे. संचिताने फिल्ममध्येही काम केले आहे. विक्की कौशल स्टार फिल्म 'छावा'चा ती भाग होती. यामध्ये तिने ताराबाई ही भूमिका साकारली होती.

## टीएमसी, शिवसेना अन् राष्ट्रवादी पक्ष फोडला

### शर्मिला ठाकरे भाजपवर भडकल्या

**मुंबई/प्रतिनिधी :**ममता बॅनर्जी, उद्धव ठाकरे, शरद पवार यांचा पक्ष फोडण्यात आला. दुस-यांची पक्ष कशाला फोडता. तुम्ही तुमची मुले मोठी करा ना. दुस-यांची मुले चोरण्यापेक्षा भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ( आरएसएस ), विश्व हिंदू परिषदेत चांगली मुले आहेत. त्यांनी फक्त दुस-यांच्याच सतरंज्या उचलायच्या का? असा संतप्त सवाल मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.

शर्मिला ठाकरे म्हणाल्या, पेट्रोल १०० रूपयांच्या वरती गेले आहे. १२ वर्षांपूर्वी भाजप ज्या मुद्यांसाठी रस्त्यावर उतरू न आंदोलन करत होतीच; त्याबद्दल कोणीही चकार शब्द बोलायला तयार नाही. माझ्याकडे दादरचे एक ज्वेलर आले होते. ते बोलले, चिपी विमानतळ बंद झाले आहे. तुम्ही कोणीच यावर आवाज उठवत नाही. २०१२ पासून नरेंद्र मोदींचं सरकार आल्यापासून किती विमानतळे सुरू झाले आणि किती बंद झाले? एक विमानतळ बांधायचे असेल तर साधारण ४० ते ५० हजार कोटी रूपये खर्च येतो.नवी मुंबईला विमानतळ



झाले आहे. आता पुरंदरला विमानतळ करत आहेत. पुण्यात एक विमानतळ आहे. एवढी हवाई दळणवळण कुठे सुरू आहे? ४० ते ५० हजार कोटी खर्च करू न विमानतळ बांधायचे, एक-दोन विमाने उतरवायची आणि बंद करू न टाकायचे. ज्वेलर मला बोलला की, चिपी येथील विमानांना चांगला प्रतिसाद मिळतोय. तरीसुद्धा गोव्याला प्रतिसाद कमी मिळत असल्याने बंद करू न टाकले. मग तुम्ही विमानतळे बांधताय कशाला? असा सवाल शर्मिला ठाकरेंनी उपस्थित केला. पुरंदरचे शेतकरी विरोध करत आहेत. पुरंदरमध्ये शेती पिकत आहे, ती ⇨(पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# वायुदलाच्या विमानाने नीटच्या ६ हजार प्रश्नपत्रिका शहरात दाखल

## -पेपरफुटी गैरप्रकाराच्या पार्श्वभूमीवर गोपनीयता
## -अमरावतीच्या इतिहासातील पहिलीच वेळ

अमरावती/प्रतिनिधीः-

राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षेतील नीट देशव्यापी पेपरफुटी आणि गैरप्रकारांच्या पार्श्वभूमीवर, आगामी २१ जून रोजी होणारी परीक्षा पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाने कडेकोट मोहीम हाती घेतली आहे. याचाच एक भाग म्हणून आज, सोमवार १५ जून रोजी मुंबईहून थेट भारतीय वायुदलाच्या विशेष हेलिकॉप्टर द्वारे 'नीट' परीक्षेच्या प्रश्नपत्रिका अमरावतीत आणण्यात आल्या. परीक्षेच्या गोपनीयतेसाठी थेट लष्करी हेलिकॉप्टरचा वापर करण्या आल्याची अमरावतीच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ आहे.

माहितीनुसार सोमवारच्या सकाळी वायुदलाचे हेलिकॉप्टर शहरातील नजीकच्या हनुमानगढी परिसरातील मैदानावर उतरले. हेलिकॉप्टर लँडिंगच्या आधी पासूनच संपूर्ण परिसराला पोलिसांनी वेढा घातला होता. हेलिकॉप्टर मधून ६ हजार प्रश्नपत्रिकांचे बॉक्स बाहेर काढताना कमालीची गुप्तता आणि सुरक्षा पाळण्यात आली होती. तेथून सशस्त्र पोलिसांच्या विशेष ताफ्याद्वारे आणि कडेकोट बंदोबस्तात या प्रश्नपत्रिका अमरावती शहरात रवाना करण्यात आल्या. सुरक्षेचा उपाय म्हणून प्रशासनाने या प्रश्नपत्रिकांची विभागणी करून त्या शहरातील दोन अत्यंत सुरक्षित ठिकाणी ठेवल्या आहेत. यामध्ये कॅम्प परिसरातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मुख्य शाखेतील सुरक्षित लॉकर तसेच



अमरावती जिल्हा कोषागार भवनातील मुख्य स्ट्राँग रूमचा समावेश आहे. या दोन्ही ठिकाणी २४ तास सशस्त्र पोलिसांचा खडा पहारा तैनात करण्यात आला आहे.अमरावती पोलिस, सीआरपीएफचे कमांडो, सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल विभाग, महापालिका अग्निशमन दल, रूग्णवाहिका आदी हनुमान गढी येथे तैनात होते. सुरक्षेच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या होत्या. आखोर जिल्हा कोषागार, एसबीआय बँक अशा दोन्ही ठिकाणी 'नीट' प्रश्नपत्रिका ठेवण्यात आल्या आहेत. तीन मे रोजी झालेल्या नीट परीक्षाचा पेपर नीट न झाल्यामुळे हा पेपर रद्द करण्यात आला होता. यामुळे आता पुन्हा २१ जून रोजी परीक्षा घेण्यात येत आहे. जिल्ह्यातील ६ हजार आणि देशभरातील लाखो विद्यार्थी ही परीक्षा देणार आहे. या मध्ये कोणतीही गडबडी होऊ नये म्हणून गोपनीयता ठेवली जात आहे.

# वादळी पावसानंतर अमरावती महानगरपालिका प्रशासन सतर्क

## -आयुक्त वर्षा लड्डा यांची राजापेठ व बेलपुरा परिसरात प्रत्यक्ष पाहणी

**अमरावती/प्रतिनिधीः-**

रविवारी जोरदार वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक भागांमध्ये पाणी साचले. अनेक प्रमुख मार्गांवर मोठमोठी झाडे उन्मळून पडली, तर अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून रस्त्यावर कोसळल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला. या संपूर्ण परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत अमरावती महानगरपालिका प्रशासनाने तातडीने मदत व पुनर्वसनाची कामे हाती घेतली आहेत.

या पार्श्वभूमीवर सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी सकाळी अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त वर्षा लड्डा यांनी राजापेठ येथील भुयारी गटार तसेच बेलपुरा परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी त्यांनी पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेत संबंधित



अधिकाऱ्यांना आवश्यक त्या तातडीच्या उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसह केलेल्या या पाहणीत त्यांनी विविध समस्यांची माहिती घेत नागरिकांशी संवादही साधला.

पाहणीदरम्यान राजापेठ परिसरातील भुयारी गटार ची तपासणी करण्यात आली. यावेळी आयुक्तांनी संबंधित अभियंते व अधिकाऱ्यांना भुयारी गटारांची तातडीने स्वच्छता करून पाणी निचऱ्याची व्यवस्था अधिक सक्षम करण्याचे निर्देश दिले. तसेच भविष्यात अशा परिस्थितीची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी नाल्यांची नियमित साफसफाई आणि देखभाल करण्यावर भर देण्यास सांगितले.

वादळी वाऱ्यामुळे बेलपुरा परिसरातील विविध भागांमध्ये मोठमोठी झाडे रस्त्यावर कोसळल्याने वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या रस्त्यांवर पडल्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या उद्यान विभाग, अतिक्रमण विभाग, अग्निशमन विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन पथकाने रात्रीपासूनच युद्धपातळीवर काम सुरू केले. कोसळलेली झाडे हटविणे, फांद्या छाटणे आणि रस्ते वाहतुकीसाठी खुले करणे यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली.

आयुक्त वर्षा लड्डा यांनी पाहणीदरम्यान सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून काम करण्याच्या सूचना दिल्या. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सज्ज ठेवण्यास, नागरिकांच्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करण्यास आणि संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवण्यास त्यांनी सांगितले. तसेच आगामी काळात हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यांच्या अनुषंगाने आवश्यक ती पूर्वतयारी करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

१ व १० वरिल उर्वरित

## क्ख्ध प्रमुख दीपके यांना

अभिजीत दीपके आंदोलनस्थळी पोहोचले असता, समर्थकांनी त्यांना खांद्यावर उचलून आत नेण्यास सुरुवात केली. याच गर्दीचा फायदा घेत दोन अज्ञात तरुण पुढे आले आणि त्यांनी दीपके यांच्या कानशिलात लगावली. या हल्ल्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला आणि कार्यकर्त्यांनी त्या तरुणांना पकडून मारहाण करण्यास सुरुवात केली. घटनास्थळी तैनात असलेल्या पोलिसांनी तात्काळ एका तरुणाला जमावाच्या तावडीतून सोडवून ताब्यात घेतले.

**२० जून रोजी दिल्ली चलो!-** या हल्ल्याच्या घटनेनंतरही अभिजीत दीपके यांनी आंदोलकांना संबोधित केले. हिंदू-मुस्लिम राजकारण आता चालणार नाही, अशी घोषणा देत ते म्हणाले की, आपण जात आणि धर्मात विभागले गेलो आहोत, पण यात अडकून पडता कामा नये. आपला निर्धार पक्का असल्याचे सांगत आम्ही येत्या २० जून रोजी पुन्हा दिल्लीवर मोर्चा काढणार आहोत. यावेळी जेव्हा आम्ही दिल्लीला जाउ, तेव्हा (शिक्षणमंत्र्यांचा) राजीनामा घेतल्याशिवाय परत येणार नाही. दिल्ली चलो! च्या घोषणांनंतर राष्ट्रगीताने या आंदोलनाची सांगता झाली. या घटनेमुळे जयपूरमधील राजकीय आणि सामाजिक वातावरण कमालीचे तापले आहे.

## द्वेष करणा-यांना 'गेट वेल सून'चा संदेश

मुद्यावरुन विचलित होणार नाही, धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावाच लागेल, असे दिपकेंनी स्पष्ट केले आहे.जयपूरमधील आंदोलन खूपच मोठे होते, शांततापूर्ण मार्गाने झालेले हे आंदोलन यशस्वी झाले. दिवसेंदिवस हे आंदोलन मोठे होत आहे, असे दिपके जयपूरमधील आंदोलनावर बोलताना म्हणाले. आज घडलेला प्रकार भीती दाखवण्याचा, धमकावण्याचा आणि मूळ मुद्यावरुन लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न आहे. पण, आपल्याला विचलित व्हायचं नाही. आपला एकच मुद्दा आहे आणि तो म्हणजे धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावाच लागेल, अशा शब्दात दिपकेंनी हल्ल्यानंतर त्यांची भूमिका मांडली.

एक कोटी विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे. काहींनी आत्महत्या केली आहे, त्यासाठी प्रधान यांना राजीनामा द्यावाच लागेल. त्यामुळे एकदा नव्हे दहावेळा हल्ला करा, कानाखाली मारा पण आम्ही बोलत राहू की, धर्मेंद्र प्रधान तुम्हाला राजीनामा द्यावाच लागेल, असे दिपके म्हणाले. समोरून कितीही हल्ले झाले तरी आमच्याकडून हल्ला होणार नाही, असे स्पष्ट करताना हे आंदोलन शांततापूर्ण मार्गाने सुरु असून, तसेच सुरु राहील, असेही दिपकेंनी सांगितले. द्वेष करणा-या दिपकेंनी गेट वेल सून असाही संदेश दिला.

**शांतता व प्रेमाने लढण्याचा निर्धार-** दुस-या एका पोस्टमध्ये दिपकेंनी, शारीरिक हल्ले हे भित्रेपणाचे लक्षण आहे. आम्ही शांततेने आमचा आवाज उठवत राहू. मी गांधी आणि आंबेडकरांचा अनुयायी आहे आणि मी ही लढाई शांतता व प्रेमाने लढत राहीन, अशा शब्दात भूमिका स्पष्ट करत, शिक्षणमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागेल, असा उल्लेख केला.

## भारत ग्राहक नव्हे, जगाचे

राहील. भारत-फ्रान्स संबंधांवर मोदी म्हणाले की, भारत आणि फ्रान्स यांच्यातील सहकार्य हे केवळ राजनैतिक संबंधापुरते मर्यादित नाही; तर ते विश्वास, नवोन्मेष, प्रेरणा व सामायिक दृष्टिकोनावर आधारित आहेत.

आपल्या भाषणात मॅक्रान यांनी मेक इन इंडिया या उपक्रमाचे कौतुक करत फ्रान्सने विविध क्षेत्रांत त्यात सहभाग घेतल्याचे सांगितले. त्यांनी भारताचे वर्णन नवोन्मेषाचा देश असे करत कृत्रिम बुद्धिमत्ता, हवामान बदल आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रांत भारत-फ्रान्स सहकार्य अधिक विस्तारण्याची गरज व्यक्त केली. तसेच नागरी अणुउर्जा क्षेत्रात, विशेषतः लघु माड्युलर अणुभट्ट्या या क्षेत्रात दोन्ही देशांमध्ये सहकार्य वाढवण्याच्या मोठ्या संधी असल्याचे त्यांनी नमूद केले.

भारत इनोव्हेट्स २०२६ म्हणजे काय?

भारत सरकारचा प्रमुख जागतिक नवोन्मेष उपक्रम, डीप-टेक स्टार्टअप्स आणि संशोधन प्रकल्पांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ, भारत, फ्रान्स आणि इतर देशांतील स्टार्टअप्स व गुंतवणूकदारांचा सहभाग.

## खा.सायोनी घोष भाजप

यापूर्वी शनिवारी, कोलकाता उत्तरचे तृणमूल काँग्रेसचे खासदार सुदीप बंडोपाध्याय यांनी बंडखोर खासदार शताब्दी राय यांच्यासह नवी दिल्लीतील केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेतली.बंडोपाध्याय यांना त्यांच्याच पक्षातील सदस्यांकडून टीकेला सामोरे जावे लागले. कृष्णनगरच्या खासदार महुआ मोईत्रा यांनी या ज्येष्ठ नेत्यावर जोरदार हल्ला चढवत, त्यांनी आपल्या ठिकाणाबद्दल पक्षाची दिशाभूल केल्याचा आरोप केला. ते नवी दिल्लीतील केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांच्या निवासस्थानी दिसले होते. 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये मोईत्रा यांनी दावा केला की, बंडोपाध्याय यांनी पक्षाच्या नेत्यांना सांगितले होते की, पोटाच्या आजारामुळे त्यांना कोलकाता येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मात्र, नंतर ते राजधानीतील केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांच्या निवासस्थानी टीव्हीवर दिसले, असा आरोप त्यांनी केला.

## राज्यभरात शाळा आजपासून

पिंपरी चिंचवडमध्ये जिल्हा परिषदेच्या शाळेत बोलताना सुनेत्रा पवार यांनी आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. त्या म्हणाल्या, शाळेचा पहिला दिवस ही माझ्या जिव्हाळ्याची बाब आहे. पूर्वी शाळेच्या पहिल्या दिवशी रडारड व्हायची, पण आता परिस्थिती बदलली आहे. शाळा असो की शासकीय इमारत, ती दर्जेदारच असायला हवी, असा अजितदादांचा अट्टाहास असायचा. म्हणूनच आज जिल्हा परिषद शाळा माडेल बनत असून, इथे अत्याधुनिक लॅबच्या माध्यमातून प्रात्याक्षिकांसह दर्जेदार शिक्षण दिले जात आहे.

**आम्ही शाळेत जाताना रडायचो, आता मुलं हसत येतातः शिरसाट**

छत्रपती संभाजीनगरमधील सातारा जिल्हा परिषद शाळेतही प्रवेश उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट उपस्थित होते. आमच्या वेळी वेगळी परिस्थिती होती, आम्ही शाळेत जाताना रडायचो; पण आजची मुलं हसत हसत शाळेत येत आहेत. पालकांनी मुलांवर कोणतीही बंधने न टाकता, त्यांना जे वाटतं ते करू दिले पाहिजे असा सल्ला त्यांनी यावेळी दिला.

**हिंगोलीत विद्यार्थ्यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत-**नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा परिषद व खासगी शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. जिल्हाभरातील सुमारे एक हजार शाळांमध्ये प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.

**बीडमध्ये औक्षण करून भरवले गुलाब जामुन-**बीड जिल्ह्यातील शाळांमध्ये पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे अतिशय अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. शिक्षकांनी नवीन विद्यार्थ्यांचे औक्षण केले, त्यांच्या हातात फुले दिली आणि तोंड गोड करण्यासाठी त्यांना गुलाब जामुनभरवले. याशिवाय विद्यार्थ्यांसाठी खास सेल्फी पाईंट देखील तयार करण्यात आला होता, ज्यामुळे पहिल्याच दिवशी मुले भारावून गेली होती.

## राम मंदिरात चोरी,

अखिलेश यादव यांच्यापर्यंत पोहोचली. आता हे देशभरातील चर्चेचा विषय बनले आहे.

**चोरी कशी उघडकीस आली**

रामलल्लाच्या गर्भगृहाजवळ आणि दर्शन मार्गाजवळ ठेवलेल्या दानपेट्यांमधून जी काही रोकड काढली जाते, ती रामजन्मभूमी परिसराच्या आतच असलेल्या एका "गोपनीय कक्षात" नेली जाते. सुरक्षा कारणांमुळे या खोलीचे नेमके स्थान अत्यंत गुप्त ठेवले जाते. या खोलीत बाहेरील लोकांना प्रवेश पूर्णपणे वर्जित आहे. देणग्या मोजण्यासाठी या खोलीत एकूण ५० कर्मचारी उपस्थित असत.

**कर्मचारी ३ प्रकारचे**

१. २४ कर्मचारी

नोट मोजून त्यांचे बंडल बनवतात. हे कर्मचारी ट्रस्टने खासगी एजन्सीमार्फत ठेवले आहेत.

२. १२ कर्मचारी

हे ट्रस्टचे आहेत, जे या २४ कर्मचा-यांवर लक्ष ठेवतात. म्हणजे १ कर्मचा-याच्या वाट्याला देखरेखीसाठी २ कर्मचारी होते.

३. १४ कर्मचारी

यांमध्ये एसबीआयचे कर्मचारी आणि टीसीएसच्या ऑडिट टीमचे सदस्य असतात.

## भीमाशंकर ज्योतिर्लिंगाचे दर्शन

पूर्ण करणे, दर्शनासाठी निश्चित वेळेचे पालन करणे, प्लास्टिक साहित्यावर बंदी आणि स्वच्छता नियमांचे काटेकोर पालन करणे हे नियम महत्त्वाचे मानले जात आहेत.

याशिवाय मंदिर परिसरात ध्वनिप्रदूषण टाळण्यासाठी मोठ्या आवाजातील स्पीकर, फटाके किंवा इतर त्रासदायक साधनांवर निर्बंध घालण्यात आले आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा अधिक सक्षम करण्यात आली असून स्वयंसेवक आणि सुरक्षा कर्मचा-यांची संख्या वाढविण्यात आली आहे.

मंदिर प्रशासनाने भाविकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले असून, दर्शनासाठी येताना नियमांचे पालन करण्यास सांगितले आहे. श्रावण महिना आणि आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर मोठी गर्दी होण्याची शक्यता असल्याने नियोजनबद्ध पद्धतीने दर्शन घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, भीमाशंकर मंदिर पुन्हा खुले झाल्याने शिवभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण असून हर हर महादेवच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला आहे.

## टीएमसी, शिवसेना अन्

जमीन जबरदस्तीने विकत घेतली जात आहे.शेतक-यांनी हरित लवादाकडे अर्ज दाखल केला आहे. पण, सर्वोच्च न्यायालयापासून हरित लवादा सरकारच्याच हातात आहे. तुम्हाला कुठेही न्याय मिळत नाही. सरकार १०० ते २०० वर्षे जुनी झाडे तोडत आहे. झाड तोडीमुळे उन्हाळा वाढला आहे. पाउस उशिरा पडणार आहे. जमिनीतील पाणी कमी झाले आहे,ह्याकडेही शर्मिला ठाकरेंनी लक्ष वेधले आहे. देशाची आणि देशाच्या अर्थव्यवस्थेची वाट लावली आहे, असे म्हणत शर्मिल ठाकरेंनी संताप व्यक्त केला आहे.

## अभियांत्रिकी सीईटीचा निकाल जाहीर

४२ हजार २६१ तर राज्याबाहेरील ११ हजार ८०८ विद्यार्थ्यांनी दिली. ही सीईटी राज्यातील ३६ जिल्ह्यातील १८६ परीक्षा केंद्रावर संगणकाधारित पद्धतीने घेण्यात आली होती. यावर्षी महाराष्ट्राबाहेरील परीक्षा केंद्रावर सीईटी परीक्षा घेण्यात आली नाही.दरम्यान, यंदापासून प्रथमच दोन वेळा परीक्षा घेण्यात आल्याने विद्यार्थ्यांचे लक्ष आता दुस-या संधीच्या निकालाकडे लागले असून दोन्ही परीक्षांमधील सर्वोच्च पर्सेंटाइलच प्रवेशासाठी ग्राह्य धरण्यात येणार आहे. दुस-या संधीच्या सीईटीचे निकाल अद्याप जाहीर व्हायचे आहेत. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता क्रमवारीत बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः पहिल्या प्रयत्नात अपेक्षित कामगिरी न करणा-या विद्यार्थ्यांना दुस-या परीक्षेतील गुणांचा मोठा फायदा होउ शकतो.

१०० पर्सेंटाईल गुण मिळविणारे २६ विद्यार्थी

पीसीएम समूहाच्या पहिल्या संधीच्या या सीईटीमध्ये एकूण २६ विद्यार्थ्यांनी १०० पर्सेंटाईल गुण मिळवले आहेत. राज्यातील २४ विद्यार्थ्यामध्ये आर्यन कुंजीर (पुणे), आदर्श राज (मुंबई उपनगर) ,आर्यन शर्मा (नागपूर), चैतन्य येरणे (चंद्रपूर), आशुतोषकुमार चौबे (मुंबई ), दर्शन चौधरी (चंद्रपूर), दर्शील कुंटे (ठाणे), ई[illegible]री गागरे (अहिल्यानगर), इबादूर रहमान कामरुल बारलस्कर (पुणे), अनंत जाधव (धाराशिव), जान्हवी अस्ती (गोंदिया), जान्हवी मिश्रा (चंद्रपूर), कनिष्क वाघ (नागपूर), खानापुरे सार्थक (सोलापूर), ध्रुव खोसे (लातूर), ऐश्वर्य लाडे (नागपूर), नमिष कौशिक (पुणे), नमया अग्रवाल (गोंदिया), राजदीप ठाकरे (यवतमाळ), रेयान कुमार (मुंबई), ऋतुराज राजे (गोंदिया), शौर्य फुलबांधे (नागपूर), शौर्य सिंग (ठाणे), वेद तळेले (ठाणे) या राज्यातील विद्यार्थ्यांनी १०० पर्सेंटाईल गुण मिळविले आहेत. यामध्ये चार विद्यार्थीनी आहेत. यामध्ये राज्याबाहेरील मध्यप्रदेश राज्यातील जबलपूर येथील अगस्त्य पचौरी व पश्चिम बंगाल राज्यातील कोलकाता येथील आर्यमन डोकानिया या दोन विद्यार्थ्यांनी १०० पर्सेंटाईल गुण मिळविले आहेत.

## बडनेरात स्वच्छतेचा बोजवारा

जागोजागी नाल्या जाम आहे. कचरा कंटेनर भरलेले आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. या संदर्भात तक्रार केल्यानंतरही कंपनीचे कर्मचारी लक्ष नाही देत. मनपा प्रशासन ही याकडे दुर्लक्ष करत आहे. कोणार्क कंपनी संदर्भात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या तरीही प्रशासनाच्या वतीने कोणतीही ठोस कार्यवाही नाही करण्यात आली. बडनेरा मध्ये अस्वच्छता पाहायला मिळत आहे. असे असताना प्रशासन फक्त कर वसूलींकडे लक्ष देत आहे. नियमित फॉगिंग आणि कीटकनाशक औषधांचा वापरही नाही होत. स्वच्छता कर्मचाऱ्यांकडे आवश्यक सामग्री ही उपलब्ध नाही. पावसाच्या दिवसात यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता आहे. याकडे लक्ष देऊन जर समस्याचे निराकरण नाही करण्यात आले तर यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी नगरसेविका मीरा कांबळे ,महेश मूलचंदानी, अशोक पांडे, योगेश विजयकर, प्रियंका पाटणे, भूषण पाटणे, संदीप कांबळे सह पदाधिकारी कार्यकर्ता उपस्थित होते.

**दोन-तीन दिवसात कारवाईचे आश्वासन-** मनपा आयुक्त वर्षा लड्डा, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक आरोग्य विभागाचे अधिकाऱ्यांनी चर्चा केली आणि दोन-तीन दिवसात या संदर्भात कंत्राटदार कंपनी सोबत चर्चा करून समस्याचे निराकरण करण्याचे आश्वासन दिले.

## इर्विन, डफरीन व सुपर मधील

रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालया, सुपर स्पेशलिटी सह विविध आरोग्य संस्थांची पाहणी करून व्यवस्थेची झाडाझडती घेतली. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमरावतीतील आरोग्य संस्थांच्या दुरवस्थेबाबत आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे लक्ष वेधल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. पाहणी दरम्यान स्वच्छतेचा अभाव, जर्जर इमारती, मनुष्यबळाची कमतरता आणि अन्य मूलभूत त्रुटी आढळून आल्या. नोडल अधिकारी डॉ. सांगोले यांनी नाराजी व्यक्त केली. त्यांनी रुग्णालयात मूलभूत सुविधांचा अभाव आणि प्रशासकीय नियंत्रण कमजोर असल्याचे म्हटले आहे. यामुळे रुग्णांना योग्य आरोग्य सुविधा मिळत नाही. त्यांच्या निरीक्षण दरम्यान लक्षात आले की रुग्णालयातील घाण पसरली आहे, शौचालय आणि बाथरूम मध्ये दरवाजे तुटलेले आहे. त्यांनी स्पष्ट म्हटले की अधिकाऱ्यांचा कर्मचाऱ्यांवर कोणतेही प्रभावी नियंत्रण नाही. यामुळे अनेक तक्रारी समोर येत आहे. पाच कोटीचा फंड मिळाल्यानंतरही शासकीय रुग्णालयाची डागडुजी करण्यात आली नाही. आरोग्य सुविधांमध्ये कोणतीही सुधारणा येथे नाही. त्यामुळे त्यांनी चिंता व्यक्त केली. शहरातील आरोग्य व्यवस्था पाहून ते भडकले.

या संदर्भातील सविस्तर अहवाल लवकरच आरोग्यमंत्र्यांकडे सादर करण्यात येणार असून, त्यानंतर संबंधितांवर कारवाईची शक्यता व्यक्त करण्यात आलेली आहे.

## कारमधून अवैध देशी दारूची

मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी दिले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली अचलपूर उपविभागाचे पथक परिसरात गस्त घालत होते. दरम्यान, करजगाव येथील विकास कचाये हा दारू दुकानातून मोठ्या प्रमाणात देशी दारू आणत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. ही दारू चांदूर बाजार–थुगाव–शिरजगाव मार्गे करजगाव येथे किरकोळ विक्रेत्यांना विक्रीसाठी नेली जात असल्याचेही समोर आले. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांना सोबत घेऊन थुगाव–शिरजगाव मार्गावरील नागोबा संस्थान परिसरात सापळा रचला. काही वेळात संशयित कार तेथे येताच पोलिसांनी तिला अडवून झडती घेतली. यावेळी कारच्या मागील भागात व डिकीत देशी दारूचे २१ बॉक्स आढळून आले. या कारवाईत देशी दारू, कार आणि मोबाईल असा एकूण ८ लाख ९४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी विकास सुंदर कचाये (२४, रा. करजगाव) व दीपक प्रताप आंबेकर (२४, रा. करजगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## प्रवीण पोटे यांच्या विजयासाठी

आले असताना केले. हॉटेल ग्रँड महफिल मध्ये आयोजित बैठकीमध्ये त्यांनी निवडणुकीचा आढावा घेतला. तीन तास त्यांनी पदाधिकाऱ्यांशी निवडणुकी संदर्भात चर्चा केली. सोमवारी सकाळी साडेनऊ वाजता प्रदेशाध्यक्ष चव्हाण अमरावती मध्ये आले होते. भाजप पदाधिकारी आणि महायुती घटक पक्षातील पदाधिकाऱ्यांनी त्यांचे भव्य स्वागत केले. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे ,आमदार प्रताप अडसड ,राजेश वानखेडे, उमेश यावलकर, राजेश वानखडे, केवलराम काळे, महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे ,शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे ,जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, प्रभुदास भिलावेकर ,आमदार सुलभा खोडके, सुरेखा ठाकरे ,संतोष महात्मे, माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील, सुधाकर भारसाकळे ,श्याम देशमुख, आशिष धर्माले आदि उपस्थित होते. प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी म्हणाले की प्रवीण पोटे यांना विजयी बनविण्यासाठी सर्वांना प्रयत्न करण्याची गरज आहे. प्रत्येक मतदारा पर्यंत आपल्याला पोहोचायचे आहे. एकही मत अवैध नाही होणार याची खात्री घ्यायला हवी. महायुती घटक दलात सहभागी असणाऱ्या प्रत्येकाला विजयासाठी प्रयत्न करायची गरज आहे. यावेळी आमदार सुलभा खोडके यांनी म्हटले की अजितदादा प्रमाणे आम्हीही शब्दाचे पक्के आहोत. दिलेला शब्द पाळणार आहोत. निवडणुकीमध्ये प्रवीण पोटे यांना आमचा पाठिंबा आहे. आमदार रवी राणा यांनी सुद्धा युती धर्माचे पालन करण्याचे म्हटले. निवडणूक होईपर्यंत कोणीही आऊट ऑफ स्टेशन नाही होणार असे निर्देशही त्यांनी पदाधिकारी कार्यकर्त्यांना दिले. यामुळे महायुतीला एक नवीन उर्जा मिळाली आहे.

## डीसीपी यशवंत सोळंके यांनी

गुन्हेगारीविरोधात कठोर भूमिका घेत अनेक सराईत गुन्हेगारांवर प्रभावी कारवाई करून कायद्याचा धाक निर्माण केला होता. नवीन जबाबदारी स्वीकारल्यानंतर शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासोबतच गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याला प्राधान्य दिले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## उदखेड शेत शिवारातील जुगार

दिपरंजीत बजरंग सिंग गहरवाल (४० दुर्गवाडा), परवेज शेख याकूब शेख (२५, फरीद कॉलन, महेश रमेशराव बनाई (४८,दुर्गा नगर ),मोहम्मद शहबाज शेख मेहबूब पटेल (४९ कुराह), शेख समीर शेख सलीम (२६,आठवडी बाजार), अब्दुल नदी अब्दुल नबी (३८, रेहान पार्क ), अब्दुल एजाज अब्दुल अजिम (४७, हबीब नगर नंबर एक), जहीर खान हुसेन खान (४०, कुऱ्हा ) अनिल गुलाबराव पाटील (५०, कुऱ्हा ) अशी अटक आरोपींची नावे आहे.

ग्रामीण भागात अवैध दारू विक्री करणारे जुगार खेळणारे यांच्यावर कार्यवाही करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी दिले होते. त्यानुसार मोर्शी गुन्हे प्रगटीकरण पथकाने रविवारी गोपनीय माहितीच्या आधारे उदखेड शेत शिवारात सुरू जुगार अड्ड्यावर धाड मारून बारा आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १० मोटरसायकल किंमत ७ लाख २० हजार, एक चार चाकी वाहन किंमत १० लाख, रोख ४८ हजार ८५० रूपये, ९ मोबाईल १ लाख ५१ हजार ५०० रूपये, ५२ पत्ते असा एकूण १९ लाख २० हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार बंदी अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक निकेतन कदम अप्पर अधीक्षक दत्ता तोटेवार उपविभागीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनात मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक तुषार चव्हाण, अमलदार छत्रपती करपते, स्वप्निल बायस्कर, ऋषिकेश टेकाळे, नयन शहाकार ,अथर्व कोहले यांनी कारवाईमध्ये सहभाग घेतला.

## ३९.४८ किलो गांजासह दोघे

यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीनंतर दोघांविरुद्ध एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला. पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-१) यशवंत सोलंके आणि सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. कारवाईत पोउपनि अनिल सावरकर, कैलास जाधव, सुधीर प्रांजल, निलेश गुल्हाने, शिवा आंधले, एजाज शाह, धीरज यादव, प्रमोद सायरे, रितेश चौहान, धनराज ठाकूर, मोहम्मद समीर, महिला पोलीस शिपाई संध्या मानकर तसेच शासकीय छायाचित्रकार सुधीर गुडधे यांनी सहभाग घेतला. या कारवाईमुळे बडनेरा परिसरात अंमली पदार्थांच्या अवैध व्यवहारांना मोठा धक्का बसला असून, गांजाचा पुरवठा साखळी उघड करण्यासाठी पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

## कुमकुम मोहोडचा जागतिक

येथील खेलो इंडिया धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्रात मागील आठ वर्षांपासून राज्य क्रीडा मार्गदर्शक प्रफुल्ल डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करणाऱ्या कुमकुमच्या या सातत्यपूर्ण आंतरराष्ट्रीय यशामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचा गौरव वाढला आहे. तसेच यापूर्वीही चीन येथे झालेल्या आर्चरी वर्ल्ड कप स्टेज-२ स्पर्धेत तिने भारतीय महिला संघाचे प्रतिनिधित्व करताना सुवर्णपदक जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. कुमकुमच्या या यशाबद्दल जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी तिचे विशेष अभिनंदन केले आहे.

उपसंचालक तथा जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रमोद चांदुरकर आणि अध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे यांनीही शुभेच्छा दिल्या आहेत. कुमकुमची सध्याची प्रगती आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सातत्य पाहता ती आगामी स्पर्धांमध्येही भारताला आणखी पदके मिळवून देईल, असा विश्वास तिचे प्रशिक्षक प्रफुल डांगे यांनी व्यक्त केला असून कुमकुम आता जुलै २०२६ मध्ये स्पेन येथे होणाऱ्या 'वर्ल्ड कप स्टेज-४' आणि जपान येथे होणाऱ्या '२० व्या आशियाई क्रीडा' स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

## एसटी कामगारांचे घंटानाद आंदोलन

नोव्हेंबर २०२१ पासून वार्षिक वेतन वाढीचा दर तीन टक्के व घर भाड्याचा भत्या दर लागू करण्यात आला होता परंतु हे थकबाकी आहे ते देण्यात यावी. महागाई भत्त्याची थकबाकी देण्यात यावी. कामगार कराराच्या तरतुदीनुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे देय असलेला ५८% महागाई भत्ता देण्यात यावा. घर भाडे भत्ता थकबाकी सह लागू करा. अर्थसंकल्पात महामंडळासाठी तरतूद करण्यात यावी, चार श्रम संहिता रद्द करण्यात यावी, कामगारांना कॅशलेस मेडिकल क्लेम सवलत उपलब्ध करण्यात यावी, कंत्राटी भरती करण्यात येऊ नये, स्व मालकीच्या बसेस घेण्यात याव्या या सह इतर मागण्यांसाठी घंटानाद आंदोलन करण्यात आले. यानंतरही जर मागण्या पूर्ण नाही झाल्या तर २२ जून रोजी विभागीय कार्यालयासमोर द्वारसभा घेण्यात येणार आणि २९ पासून मध्यवर्ती कार्यालय विभागीय कार्यालय येथे बेमुद्रात धरणे आंदोलन सुरू करण्याचा इशारा देण्यात आला आहे. आंदोलन करणा-यांमध्ये संदीप मुळे, जयंत मुळे, दिनेश शेळके, किशोर हिरोडे, मोहित देशमुख, नंदकिशोर नव्हाथे, धीरज गोगटे, मनिश तिवारी, शिवा भारती, ज्ञानेश्वर खोंड, अभिजीत बोके, अनिल भालचक्र सह कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, १६ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## कळंबा बोडखे वाशीयांचे दात्यांच्या दयेवर जगणे सुरू

### शाश्वत पाणी पुरवठा योजना नसल्याने नागरिकांची धावाधाव

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील कळंबा बोडखे या तीन हजार च्या जवळपास लोकसंख्या असलेल्या गावातील नागरिकांचे सध्या मानवता जपणाऱ्या दात्यांच्या दानशूर वृत्तीवर एक एक दिवस पुढे ढकलणे सुरू असल्याचे गंभीर व मनाला बैचेन करणारे वास्तव पुढे येत आहे.

मानवा सकट सगळ्या जीव जंतूंना जगण्यासाठी पाणी अत्यंत गरजेचे असताना नेमकी हीच जीवनावश्यक बाब या गावात मागील अनेक वर्षांपासून उपलब्ध नाही. शाश्वत, अखंड आणि मुबलक प्रमाणात पेयजल उपलब्ध करून देण्यात स्थानिक ग्राम पंचायत प्रशासन, पंचायत समिती प्रशासन वा जिल्हा परिषद प्रशासन अयशस्वी ठरले असल्याने या गावातील नागरिकांना स्थानिक व बाहेरच्या दात्यांच्या दान केलेल्या पाण्यावर जगण्याची वेळ सध्या आलेली असल्याची माहिती या गावाचे नागरिक सुनील रतन चव्हाण यांनी प्रस्तुत प्रतिनिधीला दिली.



गावातील सार्वजनिक विहिरी केव्हाच कोरड्या ठाक पडलेल्या आहेत.

नागरिकांसाठी कुठलीही सार्वजनिक पेयजलाची व्यवस्था नसल्याने शेगी या गावचे सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत राठोड, माजी जिल्हा परिषद सदस्य आर के राठोड, स्थानिक डॉक्टर निवास चव्हाण आणि सुनील रतन चव्हाण यांनी आपल्या परीने स्थानिक नागरिकांची पाण्याची भूक भागावी यासाठी टँकरद्वारे पाण्याची व्यवस्था करून दिली होती. एका दिवसाला जवळपास पंधरा हजार लिटर पाण्याची गरज असून या गावाला दात्यांनी दिलेले पाणी ज्या दिवशी दिले त्याच दिवशी संपून जाते. दुसऱ्या दिवशी कोणी दाता पुढे आला तर या गावातील अबाल वृद्धांना गाईगूरांना पाण्याची सोय होते अशी भीषण अवस्था सध्या असल्याची माहिती सुद्धा चव्हाण यांनी दिली.जिल्हा प्रशासनाने कळंबा बोडखे या गावातील नागरिकांना सध्या पडत असलेल्या प्रखर उन्हात दररोज पेयजल उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक नागरिकांच्या वतीने पुढे येत आहे.

## महसूल प्रशासनाची शिष्टाई आली फळाला

■ प्रतिनिधी | मानोरा ■

महसूल प्रशासनाच्या पुढाकाराने आणि विठोली, रामतीर्थ, कारखेडा येथील शेतकरी बांधवांच्या सहकार्याने विठोली येथील पानंद रस्ता सामंजस्याने खुला करण्यात आला असून, लोकसहभागातून तो सुस्थितीत तयार करण्यात येत आहे.

या उपक्रमासाठी मानोरा तहसीलदार राजेंद्र पाटील साहेब, विठोली ग्राम महसूल अधिकारी आर. एम. भालेकर आणि नेहल सातंगे बाबू साहेब यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रलंबित प्रश्न मिटविणे शक्य झाले. हा पानंद रस्ता शेतकऱ्यांना शेतावर जाण्यासाठी महत्त्वाचा होता. मात्र कारखेडा येथील शेतकरी ज्ञानेश्वर तुळशीराम जाधव यांच्या शेतात वरच्या भागातील शेतकऱ्यांचे पाणी जाऊन त्यांची शेती दरवर्षी



### शेतकऱ्यांच्या सामंजस्याने लोकसहभागातून पांदण रस्त्याची करण्यात आली निर्मिती

बुडीत असल्याने त्यांनी हा रस्ता वापरासाठी बंद केला होता. प्रशासनाच्या मध्यस्थीने आणि शेतकरी बांधवांच्या सहकार्याने ज्ञानेश्वर जाधव यांच्या शेतात वाहून नुकसान करणाऱ्या पाण्याला नालीवाटे बाहेर काढण्यास उपरोक्त शेतकऱ्यांनी मदत केल्याने हा रस्ता सामंजस्याने खुला करण्यात आला आहे. आता लोकसहभागातून रस्त्यावर मातीकाम आणि सपाटीकरण करण्यात आला आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला .

शेतकऱ्यांच्या या सहकार्याचे आणि प्रशासनाच्या पुढाकाराचे परिसरातून कौतुक होत आहे.

## थकीत वेतनासाठी कर्मचाऱ्याची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे धाव

### संस्था राखणदारावर उपासमारीची वेळ आल्याचा आरोप

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

मंगरूळपीर तालुक्यातील अशोक नगर येथील रहिवासी शिवा ग्यानराव भडांगे यांनी आपल्या थकीत वेतनासाठी जिल्हा परिषद प्रशासनाकडे धाव घेतली असून, वेतनाअभावी कुटुंबावर उपासमारीची वेळ आल्याचा आरोप केला आहे.

शिवा भडांगे हे परमहंस भगवंत माऊली शिक्षण प्रसारक मंडळ, मंगलधाम, मंगरूळपीर यांच्या वतीने संचालित अपंग निवासी विद्यालय, तुळजापूर येथे दि. ०१/०७/२०२१ पासुन विना अनुदानित तत्वावर मागील तीन वर्षांपासून राखनदार सेवा पुर्ती केली असतांनाही आजही दि.२३ ऑगस्ट २०२६ पर्यंत राखणदार पदावर कार्यरत असल्याचे त्यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे.

भडांगे यांनी मुख्याध्यापक, सचिव व अध्यक्ष यांच्यावर गंभीर आरोप करताना सांगितले की, खोट्या स्वाक्षऱ्या व खोटे दस्तावेज, बनावट राजिनामे शासन प्रशासन दरबारी दाखल करून मला व माझ्या कुटुंबाला वाढीव पैशांची मागणी करण्याचा त्यांचा तगादा दिवसेंदिवस वाढत असून. तसेच जातीवाचक शिवीगाळ, मानसिक व शारीरिक त्रास देण्यात येतोय. याबाबत तक्रार दाखल केल्याचा राग मनात धरून संबंधितांनी आपल्या कामाच्या कालावधीतील वेतन रोखून धरल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

## रिसोड, पुसद व अकोला नाका परिसरात प्रवासी निवारा शेड उभारावेत; वसंतराव हिवराळे यांची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशीम शहरालगत असलेल्या रिसोड नाका, पुसद नाका व अकोला नाका परिसरातील एसटी बस थांब्यांवर प्रवाशांच्या सोयीसाठी प्रवासी निवारा शेड उभारण्यात यावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते वसंतराव हिवराळे यांनी आगार व्यवस्थापक, वाशीम यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दि. १० जून २०२६ रोजी सादर केलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, वाशीम हे जिल्ह्याचे मुख्यालय असल्याने ग्रामीण भागातील शाळकरी विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक-युवती, नोकरदार, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक व महिला मोठ्या संख्येने एसटी बसने शहरात ये-जा करतात. कामे आटोपल्यानंतर परतीच्या प्रवासासाठी या नाका



परिसरातील बसथांब्यांवर प्रवाशांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागते. मात्र संबंधित ठिकाणी प्रवासी निवारा शेडची सुविधा नसल्याने नागरिकांना उन्हाळ्यात कडक उन्हाचा, तर पावसाळ्यात मुसळधार पावसाचा सामना करावा लागतो. विशेषतः महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे हिवराळे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

ग्रामीण भागातून येणाऱ्या प्रवाशांसाठी या ठिकाणी मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे जनहिताचा विचार करून प्रवाशांच्या सुरक्षितता व सोयीसाठी रिसोड नाका, पुसद नाका व अकोला नाका परिसरात तातडीने एसटी बस थांबा प्रवासी निवारा शेड उभारण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, आगार व्यवस्थापकांनी निवेदनाची दखल घेत संबंधित विभागाशी दूरध्वनीवर चर्चा केली असून, आवश्यक कार्यवाही करून लवकरच प्रवासी निवारा शेड उभारण्याबाबत सकारात्मक पावले उचलण्यात येतील, असे आश्वासन दिल्याची माहिती हिवराळे यांनी दिली. प्रवाशांच्या मूलभूत सुविधांसाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## शिक्षण क्षेत्राचा सुवर्ण 'किरण'! सात दिवसात दुसऱ्यांदा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने किरण चौधरी यांचा गौरव

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शिक्षण क्षेत्रात गेल्या २५ वर्षांपासून केलेल्या अविरत, प्रामाणिक आणि प्रभावी कार्याची दखल घेत येथील गोविंद पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक तथा अध्यक्ष किरण चौधरी (एम.ए., बी.एड.) यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. पुणे येथील 'ग्लोबल एलिट मीडिया अँड टेक' संस्थेच्या वतीने १४ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला.

किरण चौधरी यांना अल्पावधीत मिळालेला हा दुसरा राज्यस्तरीय पुरस्कार असून, त्यांच्या या यशाबद्दल शिक्षण क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवून शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि संस्थाचालकांच्या हक्कांसाठी त्यांनी प्रभावी लढा उभारला आहे.



गेल्या अडीच दशकांपासून त्यांनी खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित तसेच स्वयंअर्थसहाय्यित शाळांशी संबंधित विविध प्रश्न शासन स्तरावर मांडले आहेत. विशेषतः आरटीई अंतर्गत २५ टक्के मोफत प्रवेशाचा परतावा, जुनी पेन्शन योजना , टप्पावाढ अनुदान, शिक्षक व संस्थाचालकांचे हक्क यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. यापूर्वी त्यांना मेस्टा संघटनेचाही सन्मान प्राप्त झाला असून, आता पुण्यातील प्रतिष्ठित संस्थेकडून मिळालेला राज्यस्तरीय पुरस्कार त्यांच्या कार्याची व्यापक पोहोच अधोरेखित करणारा ठरला आहे.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर भावना व्यक्त करताना किरण चौधरी म्हणाले, हा सन्मान माझा एकट्याचा नसून गेल्या २५ वर्षांत मला साथ देणाऱ्या प्रत्येक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, संस्थाचालक, मित्र परिवार, आणि माझे कुटुंबातील व्यक्तीचा आहे. शिक्षकांचे हक्क आणि त्यांच्या भविष्याची सुरक्षा हीच माझी प्राथमिकता असून, हा पुरस्कार आगामी लढ्यासाठी अधिक बळ देणारा ठरेल. पुण्यात झालेल्या या दिमाखदार सोहळ्यास शिक्षण, तंत्रज्ञान आणि माध्यम क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## रोजगार, बेरोजगारी व असंघटित उद्योग क्षेत्राची माहिती संकलित करण्यासाठी सर्वेक्षणांना प्रारंभ



■ प्रतिनिधी | वाशिम ■

सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने राबविण्यात येणारे नियतकालिक कामगार शक्ती सर्वेक्षण (PLFS) आणि असंघटित क्षेत्रातील उद्योग-आस्थापनांचे वार्षिक सर्वेक्षण (ASUSE) ही दोन महत्त्वपूर्ण सर्वेक्षणे एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत राज्यभर राबविण्यात येणार आहेत. महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा), महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत ही सर्वेक्षणे केली जात आहेत. अचूक व विश्वासार्ह आकडेवारी उपलब्ध व्हावी, हा या सर्वेक्षणांचा प्रमुख उद्देश आहे. नियतकालिक कामगार शक्ती सर्वेक्षणाद्वारे रोजगार, बेरोजगारी, महिला कामगारांचा सहभाग, स्वयंरोजगार तसेच असंघटित रोजगार क्षेत्रासंदर्भातील अद्ययावत माहिती प्राप्त होणार आहे.

तसेच असंघटित क्षेत्रातील उद्योग-आस्थापनांच्या वार्षिक सर्वेक्षणाद्वारे उत्पादन, व्यापार आणि सेवा क्षेत्रातील असंघटित उद्योग-आस्थापनांची संख्या, उपलब्ध रोजगाराचे प्रकार, कार्यरत कामगारांची संख्या, प्रति कामगार व प्रति आस्थापना स्थूल मूल्यवर्धन, उत्पादकता तसेच वेतन यांसारख्या महत्त्वपूर्ण निर्देशांकांची माहिती संकलित केली जाणार आहे. बांधकाम क्षेत्र या सर्वेक्षणातून वगळण्यात आले आहे. या सर्वेक्षणातून प्राप्त होणाऱ्या आकडेवारीचा उपयोग शासनाकडून विविध विकासात्मक योजना व धोरणे तयार करताना केला जाणार आहे.

## घरपोच गॅस वितरणात अवैध वसुलीचा आरोप

### चौकशी व कठोर कारवाईची मागणी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

येथील भारत गॅस एजन्सीमार्फत घरपोच गॅस सिलिंडर वितरणाच्या नावाखाली काही ग्राहकांकडून निर्धारित शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारली जात असल्याचा आरोप करत या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात माजी सभापती श्रीकांत खंडागळे यांनी पुरवठा अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, घरपोच गॅस वितरणाच्या नावाखाली काही वितरण कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांकडून अतिरिक्त पैसे घेतले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे



येत आहेत. तसेच काही ग्राहकांशी अरेरावीची वागणूक दिली जात असल्याचेही निदर्शनास आले असून, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. महागाईच्या पार्श्वभूमीवर आधीच आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या ग्राहकांवर अशा प्रकारची अतिरिक्त वसुली अन्यायकारक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे या प्रकरणाची तातडीने चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासोबतच भारत गॅस एजन्सीच्या घरपोच वितरण शुल्काची पडताळणी करणे, ग्राहकांकडून अतिरिक्त रक्कम घेतली जात असल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करणे, वितरण कर्मचाऱ्यांच्या ग्राहकांशी होणाऱ्या वर्तनाची चौकशी करणे, तक्रारींचे निवारण करण्यासाठी स्वतंत्र संपर्क व्यवस्था उपलब्ध करून देणे आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक निर्देश जारी करावेत, अशा प्रमुख मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.


ग्राहकांना न्याय मिळावा आणि गॅस वितरण व्यवस्था अधिक पारदर्शक व विश्वासार्ह राहावी, यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष घालून योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. निवेदनावर माजी सभापती श्रीकांत खंडागळे यांच्या स्वाक्षरी असून, ते १५ जून २०२६ रोजी पुरवठा विभागाकडे प्राप्त झाल्याची नोंदही करण्यात आली आहे.

## दत्तात्रय बंडेवार यांचे निधन



**वाशीम :** संत निरंकारी मिशनचे प्रचारक तथा वाशीम ब्रॉन्चचे संचालक दत्तात्रय बंडेवार यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले . मृत्युसमयी त्यांचे वय ७० वर्ष होते . दत्तात्रय बंडेवार यांनी आपला परिवार आणि नोकरी सांभाळतांना संपुर्ण वेळ निरंकारी मिशनचा प्रचार , प्रसार आणि सेवेमध्ये व्यतीत केला . त्यांच्या पश्चात पत्नी , मुलगा , सुन , दोन मुली , जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे . स्थानिक पद्मतिर्थ मोक्षधाम येथे आज १५ जून रोजी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## सेवापूर्ती धम्म संघाच्या वतीने दहा दिवशीय धम्म संस्कार शिबिर



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक पंचशील नगर येथील निळ वादळ बुद्ध विहार येथे सेवापूर्ती धम्म संघाच्या वतीने दहा दिवशीय धम्म संस्कार शिबिराला दि.११ जून पासून सुरूवात झालेली आहे.हे धम्म संस्कार शिबीर दि.११ जून ते २० जून या कालावधीत होणार असून धम्म संस्कार शिबीराचे आयोजन सेवापूर्तीचे विलास खिल्लारे, दिलीप कंकाळ, अशोक ताजणे, नारायण जाधव, अरविंद एस.पडघान, दिलीप गवई, बाळासाहेब भगत, अनिल वानखेडे, जमदाडे, एड.भास्कर इंगळे, प्रकाश इंगळे, शिवाजी पडघान, सुभाष अंभोरे यांचेसह सेवापूर्ती धम्म संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. या दहा दिवशीय धम्म संस्कार शिबीराचा मुख्य उद्देश म्हणजे तथागत गौतम बुद्धांनी सांगितलेले पंचशील, करूणा, मैत्री व प्रज्ञा यासोबतच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या समता, स्वातंत्र्य,बंधुता आणि न्यायाचा संदेश मुलांपर्यंत व भावी पिढी पर्यंत पोहचविणे, शिका,संघटीत व्हा व संघर्ष करा .हा डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा संदेशच मानवाला प्रगतीकडे नेवू शकतो.

## स्मार्ट मीटर सक्तीला मंगरूळपीर तालुक्यातील वीज ग्राहकांचा तीव्र विरोध

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

राज्यात स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेला विरोध वाढत असून, मंगरूळपीर तालुक्यातील वीज ग्राहकांनीही या निर्णयाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वीज ग्राहक हक्क समिती, मंगरूळपीर यांच्या वतीने उपकार्यकारी अभियंता, महावितरण कार्यालय मंगरूळपीर यांना निवेदन सादर करून स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती तात्काळ थांबविण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, नागरिकांची संमती न घेता तसेच व्यापक जनमत जाणून न घेता स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम राबविली जात आहे. हा प्रकार सर्वसामान्य वीज ग्राहकांवर अन्याय करणारा असून लोकशाही मूल्यांनाही बाधा



पोहोचविणारा आहे. स्मार्ट मीटरमुळे वीजबिलांमध्ये वाढ होण्याची शक्यता, प्रीपेड पद्धतीमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी, तांत्रिक त्रुटी तसेच ग्राहकांच्या हिताचे पुरेसे संरक्षण नसल्याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या सर्व शंका आणि आक्षेपांचा विचार न करता नागरिकांवर हा निर्णय लादला जात असल्याची भावना ग्राहकांनी व्यक्त केली. महाराष्ट्रातील जनतेला विश्वासात न घेता कोणतीही योजना राबविणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे राज्य शासनाने स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती तात्काळ थांबवून संपूर्ण योजनेचा फेरविचार करावा. सर्वसामान्य नागरिक, ग्राहक संघटना आणि लोकप्रतिनिधींशी खुली चर्चा करूनच पुढील निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

तसेच स्मार्ट मीटर योजनेबाबत शासनाने ग्राहकांमध्ये पुरेशी जनजागृती केली नसल्याचा आरोपही करण्यात आला. जनतेच्या भावना व मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

यावेळी रामराव वाघमारे, अरुण उजवणे, पंकज राऊत, गजानन राऊत, राजू भारसाखळे, मोहन वानखेडे, दिलीप फुके, जुबेर मोहनवाले, शिवा सावके, संतोष लांभाडे, चंदू ठाकरे, अर्जुन सुर्वे, दिलीप राऊत, नितेश लुंगे, ओम इंगळे, गोपाल बोर्डे, राहुल माळी, शुभम राठोड, हरिओम चौधरी, शंकर ठाकरे, गणेश बोथे, भूषण सुर्वे यांच्यासह अनेक वीज ग्राहक उपस्थित होते.

तालुक्यातील वीज ग्राहकांवर स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती करण्यात आली तर नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होईल. ग्राहकांना जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसविण्याचा प्रयत्न झाल्यास त्यास लोकशाही मार्गाने विरोध करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**अर्जुन भीमराव सुर्वे,**
सामाजिक कार्यकर्त

..................

शासनाचा स्मार्ट मीटर सक्तीचा निर्णय चुकीचा असून त्यामुळे ग्राहकांची आर्थिक पिळवणूक होण्याची भीती आहे. ग्राहकांचे हित लक्षात घेऊन शासनाने हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा.

**राजू भारसाखळ**
वीज ग्राहक

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १९९ ■ मंगळवार, १६ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# जिल्हाधिकाऱ्यांच्याहस्ते श्रमशक्ती व असंघटीत क्षेत्रातील सर्वेक्षणाचा शुभारंभ

## जिल्हा व राज्याच्या विकासाला हातभार लावणारे सर्वेक्षण

### दोनही सर्वेक्षणाच्या माहिती पत्रकाचे प्रकाशन



**वर्धा जनमाध्यम :** विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेला चालना देण्यासाठी राज्यात प्रथमच जिल्हानिहाय श्रमशक्ती सर्वेक्षण आणि असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे सर्वेक्षण मोहिम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात या सर्वेक्षणाचा शुभारंभ जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या हस्ते करण्यात आला. श्रमशक्ती व असंघटीत क्षेत्रातील उद्योग असे दोन सर्वेक्षण होणार आहे. यावेळी दोनही सर्वेक्षणाच्या माहिती पत्रकाचे प्रकाशन देखील करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांसह वर्धा नगर परिषदेचे नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, हिंगणघाटच्या नगराध्यक्ष डॉ.नयना तुळकसकर, जिल्हा नियोजन अधिकारी अनिरुद्ध राजुरवार, जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उपायुक्त मुरलीनाथ वाडेकर, सहाय्यक नियोजन अधिकारी राधाकृष्ण चव्हाण, मुख्याधिकारी विजय देशमुख आदी उपस्थित होते.

श्रमशक्ती सर्वेक्षणाद्वारे वेगवेगळ्या क्षेत्रातील रोजगाराच्या स्थितीचा अचूक आढावा घेण्यात येतो. कौशल्य विकास कार्यक्रमांना दिशा देण्यासोबतच रोजगार निर्मितीच्या प्रभावी योजना राबविण्यासह जिल्ह्याचा आर्थिक व सामाजिक विकासाचा अंदाज तयार करण्यासाठी सर्वेक्षण उपयुक्त ठरते. त्याचबरोबर विविध निर्देशांकाची मोजणी जसे श्रम बल सहभाग दर, कामगार लोकसंख्या गुणोत्तर आणि बेरोजगारी दर मोजणीस सर्वेक्षणामुळे हातभार लागतो.

श्रमशक्ती सर्वेक्षणासोबतच असंघटीत क्षेत्रातील उद्योगांचे सर्वेक्षण देखील करण्यात येणार असून असंघटीत बिगर कृषी उद्योगांची माहिती संकलित करणारे हे एक महत्वाचे सर्वेक्षण आहे. अर्थव्यवस्थेतील असंघटीत बिगर कृषी क्षेत्रातील लहान उत्पादक, व्यापारी आणि सेवा प्रदाता क्षेत्रातील वाहतूक, शिक्षण, आरोग्य इत्यादी आर्थिक आणि कार्यात्मक वैशिष्ठे मोजण्यासाठी सर्वेक्षण उपयुक्त आहे. या सर्वेक्षणामुळे असंघटीत क्षेत्रातील उद्योगांचे स्वरुप, आकार, कार्यपद्धती, संसाधने, उत्पादन आणि सेवांचे वितरण, खर्च आणि उत्पन्न यांची माहिती मिळते. या सर्वेक्षणाच्या माहितीचा उपयोग जिल्ह्यातील असंघटीत उद्योगांची माहिती जाणून घेऊन या क्षेत्रातील योजना व धोरणात्मक नियोजन करण्यास उपयुक्त ठरते.

सदर सर्वेक्षण मार्च २०२७ पर्यंत चालणार आहे. राज्यात हे सर्वेक्षण जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्य शासनाच्या नियोजन विभागामार्फत महास्ट्राईड प्रकल्पांतर्गत राबविण्यात येत आहे. श्रमशक्ती सर्वेक्षणासाठी निवडलेल्या कुटुंबाची माहिती संकलित करण्यात येणार आहे. संकलित केलेली माहिती पुर्णपणे गोपनिय राहणार आहे. श्रमशक्ती व असंघटीत क्षेत्रातील उद्योगांच्या सर्वेक्षणात संबंधितांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

# बालकांना दर्जेदार शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे काळाची गरज - पालकमंत्री

## अंगणवाडी केंद्रांना शैक्षणिक पुस्तक संचांचे वितरण



**वर्धा जनमाध्यम :** बालकांना दर्जेदार शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. वाचन संस्कृतीच्या माध्यमातून बालकांची भाषा, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता व विचारक्षमता विकसित होत आहे. जिल्ह्यातील बालकांच्या सर्वांगीण विकासात अंगणवाडी सेविकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्रांतील बालकांच्या शैक्षणिक, बौद्धिक व सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने साई मंदिर, वर्धा येथे पालकमंत्र्यांच्या हस्ते शैक्षणिक पुस्तक संचाचे वितरण करण्यात आले, त्यावेळी डॉ.भोयर बोलत होते. कार्यक्रमाला गुरुकुंज मोझरीचे पद्मश्री पुरस्कार प्राप्त जनार्दन बोथे, माजी खासदार रामदास तडस, नगर परिषदेचे उपाध्यक्ष प्रदीपसिंग ठाकूर, गॅलिलिओ कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीष दोषी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, महिला व बालविकास विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा कुरसंगे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा कुरसंगे यांनी केले. पुस्तकांच्या माध्यमातून बालकांमध्ये वाचन संस्कृती रुजविणे, शब्दसंग्रह वाढविणे, एकाग्रता व आकलन क्षमता विकसित करणे तसेच नैतिक मूल्यांचे संवर्धन करण्यास मदत होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### संचासाठी क्रिएटिव्ह गॅलिलिओ कंपनीचे जिल्ह्यास सहकार्य

यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते शैक्षणिक पुस्तक संचांचे विमोचन तसेच जिल्ह्यातील विविध अंगणवाडी केंद्रांना शैक्षणिक पुस्तक संचांचे वितरण करण्यात आले.

जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रांमधील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रिएटिव्ह गॅलिलिओ कंपनीच्या वतीने सदर शैक्षणिक पुस्तक संच उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्याबद्दल कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीष दोषी यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास संजय गाते, सुनील गफाट, निलेश किटे, वैशाली येरावार, सुभाष राठी, स्वाती गव्हाणे, प्रदीप तलमले, विलास आगे, निलेश पोहेकर, जयश्री गफाट, सोनाली कलोडे, पृथ्वीराज शिंदे, सरस्वती मडावी तसेच महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी व कर्मचारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाण्याच्या शोधात आलेले चितळ घराच्या छतावर; वनविभागाच्या बचाव पथकाने दिले जीवदान

## कुत्र्यांच्या पाठलागामुळे चितळाची धाव थेट घराच्या छतावर; जामगावातील थरारक घटना



**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील माणिकवाडा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या जामगाव येथे सोमवारी पहाटे एक थरारक घटना घडली. पाण्याच्या शोधात जंगलातून गावात आलेल्या चितळाने जीव वाचवण्यासाठी थेट एका घराच्या छतावर आश्रय घेतल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. १५ जून रोजी पहाटेच्या सुमारास एक चितळ गावात शिरले. गावात प्रवेश करताच काही भटक्या कुत्र्यांनी त्याचा पाठलाग सुरू केला. घाबरलेल्या अवस्थेत जीव वाचवण्यासाठी चितळाने धाव घेत शेळके यांच्या घराच्या छतावर उडी मारली आणि तिथेच आश्रय घेतला.

पहाटेपासून कुत्र्यांचे सतत भुंकणे सुरू असल्याने शेजारी राहणारे अशोक मोगरे यांनी बाहेर येऊन पाहणी केली. त्यावेळी घराच्या छतावर चितळ बसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. चितळ अत्यंत घाबरलेल्या अवस्थेत असल्याचे पाहून त्यांनी तत्काळ वनविभागाशी संपर्क साधला. माहिती मिळताच वनविभागाचे बचाव पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. ग्रामस्थांच्या मदतीने आणि अत्यंत सावधगिरीने



तब्बल दोन तास बचाव मोहीम राबविण्यात आली. अखेर चितळाला सुरक्षितपणे ताब्यात घेण्यात यश आले. त्यानंतर त्याला जवळील जंगल परिसरात सोडून जीवदान देण्यात आले.

या बचाव मोहिमेत वनरक्षक दिगंबर गणेशपुरे (धाडी बीट), वनरक्षक डाकोरे (मोई) तसेच मोई येथील भास्कर चव्हाण यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

दरम्यान, गावात आलेल्या वन्यप्राण्याला इजा न करता वनविभागाला तातडीने माहिती देत सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांचेही सर्वत्र कौतुक होत आहे.

# सारंगपुरीतील कोट्यवधींच्या धातू पाईपलाईन चोरीचा आरोप

## मुख्याधिकाऱ्यांकडे थेट पुरावे सादर

### चोरी करणाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करा; दिलीप पोटफोडे यांची मागणी

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी शहरातील सारंगपुरी तलाव ते शहरापर्यंत इंग्रजकालीन पाणीपुरवठ्यासाठी वापरण्यात आलेल्या धातूच्या पाईपलाईन चोरीप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आर्वी विधानसभा अध्यक्ष दिलीप पोटफोडे यांनी मुख्याधिकारी डॉ. किरण सुक्कलवाड यांना निवेदन देत तात्काळ फौजदारी कारवाईची मागणी केली आहे. विशेष म्हणजे चोरी करतानाचे कथित थेट पुरावे असलेला पेन ड्राइव्हही त्यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला.

निवेदनात नमूद केल्यानुसार सारंगपुरी तलाव ते आर्वी शहर दरम्यान इंग्रज काळात ही पाईपलाईन उभारण्यात आली होती. त्या काळात पाणीपुरवठ्यासाठी तयार करण्यात आलेल्या या लाईनमध्ये तांबे, पितळ, कांस्य आणि बीड यांसारख्या महागड्या धातूंचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला होता. त्यामुळे ही पाईपलाईन अत्यंत टिकाऊ आणि कोट्यवधी रुपयांची मौल्यवान मालमत्ता मानली जात होती. या लाईनमुळे एकेकाळी शहराला सुरळीत व प्रभावी पाणीपुरवठा होत होता.

शहरात नवीन पर्यायी पाणीपुरवठा योजना सुरू झाल्यानंतर ही पाईपलाईन बंद अवस्थेत होती. याचाच फायदा घेत काही पांढरपेशी चोरांनी नियोजनपूर्वक कट रचत ३ जून २०२६ रोजी रात्रीच्या अंधारात नवीन जेसीबीच्या सहाय्याने पाईपलाईन खोदून काढली आणि वाहनांद्वारे तिची वाहतूक करून रफादफा केल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

नगर परिषदेच्या मालमत्तांची खुलेआम चोरी, विक्री आणि अतिक्रमण सुरू असल्याचा आरोप करत संबंधित चोरट्यांवर तसेच त्यांना साथ देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी दिलीप पोटफोडे यांनी केली आहे. या प्रकरणाची प्रत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनाही पाठविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# वर्धा अर्बन बँक घोटाळ्यात नवे धक्कादायक खुलासे

## व्यवस्थापकाच्या घरातून ३ लाखांची रोकड; १०२ ग्रॅम सोने जप्त

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील कच्छी लाईन परिसरातील वर्धा अर्बन ॲण्ड रुरल को-ऑपरेटिव्ह बँकेत उघडकीस आलेल्या कथित आर्थिक अपहार प्रकरणाचा तपास आता अधिकच वेगाने पुढे सरकत असून आर्थिक गुन्हे शाखेच्या कारवाईत नवे धक्कादायक तपशील समोर येत आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी तथा बँकेचे तत्कालीन व्यवस्थापक प्रवीण बोरकर यांच्या घरातून पोलिसांनी तब्बल ३ लाख रुपये रोख रक्कम जप्त केली असून बँकेतून सुमारे १०२ ग्रॅम सोनेही हस्तगत करण्यात आले आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

धूनीवाले मठ परिसरातील रहिवासी प्रवीण बोरकर यांनी व्यवस्थापक पदावर कार्यरत असताना बँकेत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. विश्वासार्हतेच्या आडून त्यांनी अनेकांची फसवणूक केल्याची चर्चा आहे. बनावट सोने गहाण ठेवून व्यवहार केल्याची बाब तपासात समोर आली असून एका महिलेला एफडी व सोने गहाण ठेवण्याच्या आमिषाने तब्बल ३५ लाख रुपयांना गंडा घातल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात आतापर्यंत नऊ तक्रारी दाखल झाल्या आहेत. प्राथमिक चौकशीनंतर प्रवीण बोरकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला. पोलिस उपअधीक्षक पुंडलिक भटकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक निशांत फुलेकर हे तपास करीत आहेत. त्यांच्या पथकाने केलेल्या धाडीत रोकड आणि सोने जप्त करण्यात आले. सध्या आरोपी प्रवीण बोरकर न्यायालयीन कोठडीत असून या घोटाळ्यात आणखी काही जणांचा सहभाग उघड होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांचा एल्गार; विविध मागण्यांसाठी विभागीय कार्यालयावर निदर्शने



**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील (एसटी) कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र एस.टी. कामगार संयुक्त कृती समितीच्या वतीने सोमवारी वर्धा येथील विभागीय कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. घोषणाबाजी करत कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. आंदोलनानंतर अधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदनही सादर करण्यात आले.

एसटी कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, ही प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली. तसेच सन २०१६ ते २०२० या कालावधीतील कामगार करारासाठी जाहीर करण्यात आलेल्या ४ हजार ८४९ कोटी रुपयांच्या पॅकेजमध्ये कर्मचाऱ्यांवर अन्याय झाल्याचा आरोप कृती समितीने केला.

यापूर्वीच्या कामगार करारानुसार देय असलेला वार्षिक वेतनवाढीचा दर ३ टक्के असताना तो २ टक्क्यांवर आणण्यात आला होता. त्याचप्रमाणे घरभाडे भत्त्याचा दर ८, १६ व २४ टक्क्यांऐवजी ७, १४ व २१ टक्के करण्यात आल्यामुळे कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

माहे नोव्हेंबर २०२१ पासून सुधारित दर लागू करण्यात आले असले तरी एप्रिल २०१६ ते ऑक्टोबर २०२१ या कालावधीतील थकीत फरक अद्याप देण्यात आलेला नाही. त्यामुळे संबंधित थकबाकी तातडीने अदा करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच सन २०१८ पासूनचा महागाई भत्ता, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे ५८ टक्के महागाई भत्ता व त्याची थकबाकी, घरभाडे भत्ता आणि इतर आर्थिक लाभ लागू करण्यात यावेत, अशी मागणीही करण्यात आली. याशिवाय इतर राज्यांप्रमाणे एसटी महामंडळासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात स्वतंत्र तरतूद करावी, मध्यवर्ती कार्यशाळांमध्येच नवीन बस बांधणीसाठी चॅसिस उपलब्ध करून द्यावेत व स्वमालकीच्या बस तयार करण्यात याव्यात अशा मागण्याही निवेदनातून करण्यात आल्या. या आंदोलनात अतुल गौरखेडे, शम्मी पठाण, प्रमोद गुंडतवार, श्रीकांत ढेपे, राहुल मुन, विलास राऊत, प्रदीप शेंडे, प्रफुल्ल लोनगाडगे, प्रशांत लोखंडे, राहुल ढगे, मधुकर शिवणकर, प्रमोद नगराळे यांच्यासह कृती समितीचे अनेक पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी समाजाचा पाठिंबा गरजेचा : पद्मश्री शंकरबाबा पापळकर



**वर्धा जनमाध्यम :** वर्धा सोशल फोरमच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना निशुल्क बी-बियाणे वाटप तसेच क्रांतिज्योती सावित्रीआई फुले गौरव पुरस्कार २०२६ सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलताना यांनी प्रशासनाची शेतकरी सहायक धोरणे, समाज आणि परिवाराचा पाठिंबा मिळाल्यास शेतकरी आत्महत्या कमी होऊ शकतात, असे प्रतिपादन केले. त्यांनी शेतकऱ्यांनी जोडधंदा म्हणून गोपालन व बकरी पालन करण्याचा सल्लाही दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. ज्ञानदा फणसे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद वर्धा या होत्या. त्यांनी वर्धा सोशल फोरमच्या उपक्रमाचे कौतुक करत पुरस्कारप्राप्त महिलांचे अभिनंदन केले. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित वैशाली शिंदे, उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा कृषी विभाग यांनी घन कपाशी लागवडीबाबत मार्गदर्शन केले तसेच यावर्षी पेरणी करण्याची घाई करू नये, असा सल्ला शेतकऱ्यांना दिला.

यावेळी व्यासपीठावर वर्धा सोशल फोरमचे अध्यक्ष डॉ. अभ्युदय मेघे व सचिव अविनाश सातव उपस्थित होते. कार्यक्रमात पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांचा भव्य सत्कार करण्यात आला. मनीषा मेघे यांनी मानपत्राचे वाचन केले. पद्मश्री पापळकर यांच्या अनाथालयातील अंध विद्यार्थिनी कु. गांधारी हिने सुरेल गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तिचा विशेष सत्कारही करण्यात आला. सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ. चेतना सवाई, तबस्सुम आझमी, कु. कांचन रघटाटे आणि अश्विनी रवी काळे यांना क्रांतिज्योती सावित्रीआई फुले गौरव पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले. वर्धा सोशल फोरमकडून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे हे अकरावे वर्ष असून महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या सहकार्याने शेतकरी कुटुंबांना निशुल्क बी-बियाणे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी, शेतकरी बांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी पुरोहित यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्याम परसोडकर यांनी केले.

# काळे ढग... पण पाऊस गायब

## तब्बल ७० मिमी पावसाची तूट; पेरण्या रखडल्या, जलसाठे तळाला

**वर्धा जनमाध्यम :** मृग नक्षत्र सुरू झाले आकाशात काळ्या ढगांची गर्दीही झाली; मात्र पावसाने जिल्ह्याकडे पाठ फिरवल्याने शेतकरी आणि नागरिकांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. जूनच्या पहिल्या पंधरवाड्यात जिल्ह्यात सरासरी ८७.०१ मिमी पाऊस अपेक्षित असताना प्रत्यक्षात केवळ १६.०६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. परिणामी तब्बल ७०.०५ मिमी पावसाची तूट निर्माण झाली असून पेरणीपूर्व तयारी पूर्ण करून बसलेल्या शेतकऱ्यांचे डोळे आता आकाशाकडे लागले आहेत.

दरवर्षी जून महिन्यात जिल्ह्यात सरासरी १७१.०१ मिमी पाऊस पडतो. त्यानुसार पंधरवाड्यात किमान ८७ मिमी पाऊस अपेक्षित होता. मात्र यंदा पावसाने अक्षरशः दडी मारल्याचे चित्र आहे. ८ जूनपासून मृग नक्षत्राला सुरुवात झाली असली तरी दमदार 'मृगसरी' कोसळण्याऐवजी ऊन-सावलीचा खेळ सुरू आहे. हवामानातील बदल आणि एल निनोच्या प्रभावामुळे यंदाचा मान्सून लांबल्याची चर्चा तज्ज्ञांमध्ये सुरू आहे.

गतवर्षीही जूनमध्ये पावसाची तूट होती; मात्र त्यावेळी १२३.०४ मिमी पाऊस झाल्याने पेरण्यांना काही प्रमाणात गती मिळाली होती. यंदा मात्र परिस्थिती अधिक गंभीर बनत चालली आहे. शेतकरी पेरणीसाठी सज्ज असताना पावसाअभावी शेतजमीन कोरडीच पडली आहे. दुसरीकडे विहिरी, बोअरवेल आणि जलाशयांतील पाणीपातळी झपाट्याने खाली जात असल्याने ग्रामीण भागात पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची भीती व्यक्त होत आहे.

२२ जूनपासून आर्द्रा नक्षत्राला सुरुवात होत असून या काळात दमदार पाऊस होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. मात्र येत्या काही दिवसांत समाधानकारक पाऊस न झाल्यास खरीप हंगामासह पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे.

# वेगाच्या हव्यासात जीवाशी खेळ नको

## वाहतूक नियम पाळा, अपघात टाळा; एनसीसी छात्रसैनिकांना पोलिसांचे मार्गदर्शन



**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत असलेल्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याची गरज अधोरेखित करत एनसीसी छात्रसैनिकांसाठी विशेष जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मानवी चुका हाच अपघातांचा सर्वात मोठा कारणीभूत घटक आहे, असे स्पष्ट प्रतिपादन वाहतूक नियंत्रण शाखेचे सहायक फौजदार रियाज खान यांनी केले. दि. १५ जून रोजी सेवाग्राम येथील २१ महाराष्ट्र बटालियनच्या वार्षिक एनसीसी शिबिरांतर्गत बापूराव देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात ही कार्यशाळा पार पडली. छात्रसैनिकांनी स्वतः वाहतूक नियमांचे पालन करून समाजातही जनजागृती करावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### सामाजिक दायित्व...

**खल्लार**-१४ जून रोजी दुपारी दोन वाजताच्या सुमारास दहीहांडा दर्यापूर रोडवरील लोतवाडा गावाच्या हद्दीत पुलाजवळ वादळामुळे बाभूळचे मोठे झाड संपुर्ण रोडवर पडल्याने वाहतूक मोठया प्रमाणात विस्कळीत झाली होती. हि बाब लोतवाडा येथिल सामाजिक कार्यकर्ते भिमराव कुऱ्हाडे यांच्या निदर्शनास येताच त्यांनी स्वतःच्या ट्रॅक्टरने सहकाऱ्यांच्या मदत घेऊन रोडवरील पडलेले बाभूळ झाड बाजूला करुन विस्कळीत झालेली वाहतूक पुन्हा सुरु करुन सामाजिक दायित्व पार पाडले.

(छाया: युवराज डोंगरे, खल्लार)



### भूगावजवळ कडुनिंबाच्या झाडाला आग

**आसेगाव पूर्णा**-अमरावती–परतवाडा मार्गावरील भूगावजवळ १४ जून रोजी दुपारी सुमारे ३.१५ वाजता हिरव्यागार कडुनिंबाच्या झाडाला आग लागली. झाड अद्याप जळत असून ते रस्त्यावर कोसळल्यास वाहतूक ठप्प होण्यासह जीवितहानीची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, बातमी लिहिपर्यंत संबंधित विभागाचे कोणतेही अधिकारी किंवा कर्मचारी घटनास्थळी पोहोचले नसल्याने वाहनचालकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

### अर्धा जून सरला; बळीराजाची धाकधूक

**अंजनगाव बारी**-जून महिन्याचा अर्धा कालावधी उलटून गेला तरी अमरावती जिल्ह्यासह ग्रामीण भागात समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे खरीप हंगामातील पेरण्या खोळंबल्या असून शेतकरी चिंतेत आहेत. बी-बियाणे व खतांची खरेदी करून मशागतीची कामे पूर्ण झालेली असतानाही पेरणीयोग्य पाऊस नसल्याने शिवार ओस पडले आहे.दरम्यान, पुढील २४ ते ४८ तासांत उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढली आहे. हवामान तज्ज्ञांच्या माहितीनुसार,१८ जूननंतर मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता असून महाराष्ट्रात दमदार पावसाचे संकेत आहेत.मात्र, एल निनोच्या प्रभावामुळे यंदा पावसाचा वितरणात असमतोल राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. काही भागांत कमी पाऊस तर काही ठिकाणी अतिवृष्टी होऊ शकते. सध्या तरी अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत असून त्यांच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत.

### पूर्णा, सपनसह गर्गा धरण परिसरात पावसाची हजेरी

**अमरावती-** मान्सूनच्या सुरुवातीला जिल्ह्यात सर्वत्र अपेक्षित पाऊस झाला नसला तरी काही प्रमुख धरणांच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पावसाची नोंद झाली आहे. विशेषतः पूर्णा, सपन, आणि चंद्रभागा धरण परिसरात झालेल्या पावसामुळे जलसाठ्यात वाढ होण्यास मदत झाली आहे. परंतु गेल्या वर्षाच्या तुलनेत पावसाची ही नोंद कमी असल्याचे दिसून येत आहे. सिंचन विभागाच्या अहवालानुसार, १ जूनपासून सपन धरण परिसरात सर्वाधिक १९ मिमी पाऊस पडला आहे. त्याखालोखाल पूर्णा १४ मी.मी. आणि गर्गा धरण ११ मिमी पावसाची नोंद झाली आहे. तर उर्ध्व वर्धा धरण परिसरात केवळ ३ मिमी पाऊस झाला आहे. या तुलनेत १ जून २०२५ पासून शहानुरमध्ये १४ मी.मी., चंद्रभागा १४ मी.मी., पूर्णा ९ मी.मी., सपन २८ मी.मी., पंधरीत ५ मी.मी. तर धरणांमध्ये ४० टक्के जिल्ह्यातील पाणीसाठा कायम झाली होती. सध्या जिल्ह्यातील मोठे, एकूण ५६ पाटबंधारे प्रकल्पांमध्ये ४१८. गर्गामध्ये ६ मी.मी. पावसाची नोंद मध्यम आणि लघु अशा पाणीसाठा उपलब्ध ८४ दशलक्ष घनमीटर उपयुक्त असून तो एकूण क्षमतेच्या ४० टक्के इतका आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठ्या उर्ध्व वर्धा धरणात २५०.०८ दशलक्ष घनमीटर म्हणजे ४४.३४ टक्के पाणीसाठा आहे. मध्यम प्रकल्पांमध्ये चंद्रभागा धरण ७६.५५ टक्के साठ्यासह अव्वल स्थानावर असून सपन धरणात ४१.०१ टक्के आणि पूर्णा धरणात ६०.३५ टक्के साठा उपलब्ध आहे. त्यामुळे खरीप हंगामासाठी आगामी काही दिवसांतील पावसाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शेतकरी आणि प्रशासनाच्या नजरा आता मान्सूनच्या पुढील टप्प्याकडे लागल्या आहेत.

# विभागात पहिल्यांदाच होणार 'पीएलएफएस' आणि 'एएसयूएसई' सर्वेक्षण

## विभागीय आयुक्त नयना गुंडे यांचे नागरिकांना सहकार्याचे आवाहन



**अमरावती/का.प्र.**

केंद्र शासनाच्या सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय (MoSPI) यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच 'मित्रा' (MITRA) व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने अमरावती विभागात दोन अत्यंत महत्त्वाचे सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे. अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत राज्यात पहिल्यांदाच 'नियतकालिक श्रम शक्ती सर्वेक्षण' (PLFS) आणि 'असंघटीत क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण' (ASUSE) एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत राबविले जाणार आहे. या राष्ट्रीय कार्यात विभागातील नागरिकांनी सर्वेक्षणासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे. या सर्वेक्षणांचे स्वरूप आणि उद्दिष्टे

**नियतकालिक श्रम शक्ती सर्वेक्षण (PLFS)** अंतर्गत निवडक कुटुंबांकडून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे श्रम बाजाराचे महत्त्वाचे निर्देशांक तयार केले जातील. यामध्ये प्रामुख्याने श्रम शक्ती सहभाग दर (Labour Force Participation Rate-LFPR), कामगार-लोकसंख्या गुणोत्तर (Worker Population Ratio-WPR), बेरोजगारी दर (Unemployment Rate-UR) या घटकांची अचूक आकडेवारी संकलित केली जाईल, ज्यामुळे भविष्यातील रोजगार धोरणांना दिशा मिळेल.

**असंघटीत क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण (ASUSE)** अंतर्गत राज्यातील उत्पादन, व्यापार आणि इतर सेवा क्षेत्रातील असंघटीत व बिगर-कृषि आस्थापनांच्या आर्थिक आणि कार्यात्मक वैशिष्ट्यांची आकडेवारी गोळा केली जाणार आहे. यामुळे असंघटीत क्षेत्रातील उद्योगांच्या विकासासाठी योजना आखणे सोपे होईल.

या सर्वेक्षणांची माहिती गोळा करण्यासाठी अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयांतर्गत 'Ipsos Research Private Limited' या नामांकित संस्थेची शासनाने निवड केली आहे. या संस्थेमार्फत नियुक्त केलेले अन्वेषक (Investigators) आणि पर्यवेक्षक (Supervisors) केवळ 'नमुना पद्धतीने' (Sample Method) निवडलेल्या ग्रामीण भागातील गावांना आणि शहरातील विशिष्ट वॉर्डमधील कुटुंबांना व आस्थापनांना प्रत्यक्ष भेट देऊन विहित प्रपत्रात माहिती गोळा करणार आहेत.

या सर्वेक्षणा अंतर्गत कुटुंब प्रमुख आणि उद्योग/आस्थापना प्रमुख यांच्या उपलब्धतेसाठी नियुक्त कर्मचारी रविवार व शासकीय सुट्टीच्या दिवशीही भेटी देऊ शकतात. सर्वेक्षणादरम्यान नागरिकांकडून किंवा उद्योगांकडून मिळालेली वैयक्तिक व व्यावसायिक माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. त्याचा वापर केवळ सांख्यिकी उद्देशांसाठी आणि शासकीय योजनांच्या नियोजनासाठीच केला जाईल.

'या राष्ट्रीय महत्त्वाच्या सर्वेक्षणाचा दर्जा हा नागरिकांनी दिलेल्या अचूक माहितीवर आणि सहकार्यावर अवलंबून आहे. अमरावती विभागातील ज्या कुटुंबांना किंवा उद्योगांना या सर्वेक्षणांतर्गत अधिकारी-कर्मचारी भेट देतील, त्यांनी कोणतीही भीती न बाळगता त्यांना योग्य व अचूक माहिती देऊन या शासकीय कार्यात आपले मोलाचे योगदान द्यावे.'

-नयना गुंडे,
विभागीय आयुक्त,अमरावती

# ८० ते १०० मि.मी. पाऊस झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

## कृषी विभागाचा सल्ला

**चांदूरबाजार/वार्ताहर**

देशाच्या उंबरठ्यावर मान्सून दाखल झाला असून जिल्ह्यातही येत्या काही दिवसांत मान्सून सक्रिय होण्याची शक्यता आहे. मात्र, मान्सूनपूर्व पावसाच्या आधारावर शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन तालुका कृषी विभागाने केले आहे. यावर्षी पावसातील अनियमितता लक्षात घेता, किमान ८० ते १०० मि.मी. पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे. एवढा पाऊस झाल्यास जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण होतो आणि पुढील ५ ते ८ दिवस पाऊस न झाल्यासही पिके तग धरू शकतात. त्यामुळे पेरणी उलटण्याचा धोका कमी होतो. सध्या शेतकऱ्यांनी कापूस, सोयाबीन, तूर, भुईमूग, मका, उडीद, मुग आदी खरीप पिकांच्या पेरणीचे नियोजन करावे. ३० जूनपर्यंत समाधानकारक पाऊस झाल्यास खरीप हंगामातील बहुतांश पिकांची पेरणी करता येऊ शकते. यावर्षी एल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे उताराला आडवी पेरणी, सरी-वरंबा किंवा बीबीएफ (इ) पद्धतीचा अवलंब करण्याचा सल्ला कृषी विभागाने दिला आहे. शेतकऱ्यांनी सोशल मीडियावरील स्वयंघोषित हवामान तज्ज्ञांवर विश्वास न ठेवता शासकीय हवामान अंदाजाच्या आधारेच खरीप हंगामाचे नियोजन करावे. कोणतीही शंका किंवा अडचण असल्यास तालुका कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी तालुका कृषी अधिकारी प्रवीण मोहोड यांनी केले आहे.

# नांदगाव पेठ ग्रामपंचायत निवडणुकीचे बिगुल वाजले



**नांदगाव पेठ/वार्ताहर**

ग्रामपंचायतीच्या सन २०२६ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली.आरक्षण जाहीर होताच इच्छुक उमेदवारांच्या हालचालींना वेग आला असून गावातील राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे.सन २०११ च्या जनगणनेच्या आधारे तसेच सन २०१५ आणि २०२०-२१ मध्ये झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकांतील आरक्षणाचा विचार करून विविध प्रभागांतील सदस्य पदांसाठी आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

ग्रामपंचायतीच्या एकूण ६ प्रभागांमधील १७ सदस्य पदांसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग (ना.मा.प्र.), सर्वसाधारण तसेच महिला आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. महिला आरक्षणालाही यावेळी विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.आरक्षण सोडतीनंतर इच्छुक उमेदवारांनी मतदारांच्या भेटीगाठी सुरू केल्या असून विविध राजकीय गट, पक्ष तसेच अपक्ष उमेदवारांनी निवडणुकीची रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे आगामी ग्रामपंचायत निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.आरक्षण सोडत प्रसंगी अध्यासी अधिकारी विजय वाघमारे, तलाठी आदेश गजभिये, धीरज बोबडे, राजेश दंदे, ग्रामविकास अधिकारी हर्षदा बोन्डे यांच्यासह माजी लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'एमपीएससी'च्या परीक्षेला २,२६३ उमेदवारांची दांडी

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्यावतीने अराजपत्रित गट 'ब' पदांसाठी 'सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६' रविवार, १४ जून रोजी घेण्यात आली. यासाठी १३ हजार ६७१ परीक्षार्थ्यांनी नोंदणी केली असली, तरी त्यापैकी तब्बल २ हजार २६३ परीक्षार्थ्यांनी दांडी मारल्याचे दिसून आले. साहाय्यक कक्ष अधिकारी, राज्य करनिरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक आदी अराजपत्रित सलग दोन पदांसाठी ही परीक्षा होती. शहरातील ४७ केंद्रांवर सकाळी ११ ते दुपारी १२ या कालावधीत ही परीक्षा पार पडली. यामध्ये ११ हजार ४०८ उमेदवारांनी परीक्षा दिली, तर २ हजार २६३ उमेदवारांनी दांडी मारल्याचे दिसून आले. महत्त्वाची बाब म्हणजे परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी एवढ्या मोठ्या संख्येने परीक्षेला दांडी मारल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, या परीक्षेचे संचालन व नियंत्रण करण्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे एकूण १ हजार ५५० अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखील परीक्षा सुरळीत पार पडली, अशी माहिती जिल्हा प्रशासनातर्फे देण्यात आली.

# नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी, पोलिस प्रशासनाचे जनसेवा अभियान

## ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांचा अभिनव उपक्रम




**चांदूरबाजार/वार्ताहर**

सर्वसामान्य नागरिकांच्या छोट्या छोट्या तक्रारी असतात. आपसातील समज गैरसमजातून वाद निर्माण होऊन, दोन्ही पक्ष पोलिस स्टेशन पर्यंत तक्रार घेऊन येतात. या छोट्या तक्रारींचा वेळीच निपटारा झाला नाही,तर पुढे मोठे वाद निर्माण होण्याची शक्यता असते.पोलिसात येणाऱ्या अशा तक्रारींचा सामंजस्यानी वेळीच निपटारा करण्यासाठी, पोलिस प्रशासनाचे जनसेवा अभियान सुरू केले आहे.

या अभियाना अंतर्गत १३ जून ला, चांदूरबाजार पोलिस स्टेशन मध्ये जनसेवा अभियान घेण्यात आले. या प्रसंगी ग्रामीण पोलीस अधीक्षकांनी, स्वतः हजर राहून नागरीकांच्या समस्या जाणून घेतल्या. दोन्ही बाजूंचे म्हणने ऐकून सामंजस्यातून प्रकरणाचा निपटारा केला. हा नाविन्यपूर्ण उपक्रम ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी सुरू केला आहे.त्यांच्या उपक्रमामुळे न्यायालयावरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे. या जनसेवा अभियाना नंतर पोलिस अधीक्षकांनी, तालुक्यातील पोलिस पाटलांसी संवाद साधला.त्यांना सदर अभियान बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रत्येक पोलिस स्टेशन निहाय,हे अभियान राबविण्यात येणार आहे.आपल्या गावातील स्थानिक पातळीवर सोडविल्या जातील अशा तक्रारी, पोलिस स्टेशन पर्यंत आल्यास त्यांना या अभियानाची माहिती द्यावी.तसेच पोलिस प्रशासनाच्या जनसेवा अभियानाला पोलिस पाटलांनी सहकार्य करावे. असे आवाहन हीं पोलिस पाटलांना केले.स्थानिक पोलिस स्टेशन मध्ये झालेल्या जनसेवा अभियान, जमीन विवाद,घरगुती वाद, आर्थिक देवाण घेवाण यासह नागरिकांच्या इतरही तक्रारी ऐकून घेण्यात आल्या.

सामंजस्यातून अनेक तक्रारींचा जागेवर निपटारा करण्यात आला.या जनसेवा अभियान प्रसंगी ग्रामीण पोलीस अधीक्षकांसह पोलिस निरीक्षक अशोक जाधव, पी.एस.आय. सिध्देश्वर उमाळे,विनोद इंगळे, ए.एस.आय. प्रदीप धोंडे, नितीन डोंगरे,खुपिया सुहास पोटे, आशिष राऊत, वाहतूक शाखेचे पंकज वाट, संकेत चावरे यांचे सह ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.तसेच पोलिस पाटील संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहूल उके यांचेसह, तालुक्यातील पोलिस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमोल माळोदे उत्कृष्ट खेळाडू विद्यार्थी पुरस्काराने सन्मानित



**अमरावती**-महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे वतीने वर्धापन दिनानिमित्त क्रिडा क्षेत्रात गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव दरवर्षी १० जून रोजी केला जातो. यावर्षी विद्यापीठाच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथील अंतीम वर्षाचा विद्यार्थी अमोल माळोदे या विद्यार्थ्याची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता उत्कृष्ट खेळाडू म्हणून विद्यापीठाकडून निवड झाल्याने त्याला वर्धापन नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ येथे चैत्राम देवचंद पवार (पद्मश्री पुरस्कार प्राप्त), विभागीय आयुक्त नाशिक डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी, नाशिक आयुष प्रसाद, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परिक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांच्याहस्ते गौरविण्यात आले. अमोल माळोदे यांची उत्कृष्ट खेळाडु म्हणून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक कडून सन २०२५-२६ करीता निवड झाल्याबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख, संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांनी विद्यार्थी अमोल माळोदे व क्रीडा विभाग संचालक संजय वाटाणे यांचे अभिनंदन केले आहे.

## उपवर्गीकरण विरोधात तिवसा येथे निषेध

# बैठकींत मोर्च्यात सहभागी होण्याचा निर्धार

**तिवसा/वार्ताहर**



उपवर्गीकरनाच्या नावाखाली आरक्षणावर षडयंत्राच्या विरोधात एकजूट होऊन तिवसा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात नुकतीच बैठक पार पडली असून या बैठकीत उपवर्गीकरणाच्या निर्णयाचा निषेध करण्यात आला. तसेच १७जून रोजी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर होणाऱ्या मोर्च्यात सहभागी होण्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी सरकार विरोधात घोषणा करण्यात आल्या. यासाठी सर्व आंबेडकरी, आंबेडकरवादी राजकीय पक्ष, धार्मिक संघटना, सामाजिक संघटना तसेच चळवळीतील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी होणार असून या मोर्च्यामध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.शासनाने अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाबाबत घेतलेला निर्णय हा सामाजिक न्याय, संविधानिक मूल्ये आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेच्या तत्त्वांना धक्का देणारा आहे. या अन्यायकारक निर्णयाच्या निषेधार्थ उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने १७ जून रोजी मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे याच अनुषंगाने तिवसा येथे महत्वपूर्ण बैठक पार पडली.हा केवळ मोर्चा नसून, आंबेडकरी चळवळीच्या एकजुटीचा आणि सामूहिक शक्तीचा निर्धार असल्याचे मत यावेळी कृतीसमितीच्या वतीने व्यक्त करण्यात आले. यावेळी रविकांत गवई,सुधाकर तलवारे, रमेश कटके, नयन मोंढे, नगरसेवक धनराज थुल,नगरसेवक आशिष ढोले,प्रशांत कांबळे,पुरुषोत्तम मेश्राम,संदीप चक्रनारायण, संदीप दहाट,जगदीश माहोरे,गजानन रामटेके, भारत दहाट,देवेंद्र खाकसे,जानराव मनोहर,जनार्दन शेंडे,पद्माकर खाकसे,सतीश यावले,भास्कर काळे,प्रफुल मकेश्वर,भारत खाकसे,शिवा शापामोहन,विजय यावले,अंकुश कस्तुरे आदी उपस्थित होते.

# पार्डी येथे कृषीदूतांचे मार्गदर्शन; पोटे पाटील कृषी महाविद्यालयाचा उपक्रम



**अमरावती/का.प्र.**

पार्डी येथे पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथील विद्यार्थ्यांमार्फत पाणी फाउंडेशन व महाराष्ट्र शासन कृषी विभाग त्यांच्या सहाय्याने ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बीज उगवण क्षमता चाचणी, बीजप्रक्रिया, हुमणी अळी या बहुभक्षीय किडीचे व्यवस्थापन तसेच एल निनो (El Niño) या हवामान घटनेचे शेतीवरील परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

एल निनो या हवामान घटनेमुळे पर्जन्यमानातील अनियमितता, पिकांवरील ताण तसेच उत्पादनावर होणारे परिणाम,बदलत्या हवामान परिस्थितीत शेतकऱ्यांनी पीक नियोजन, जलसंधारण व हवामानानुरूप कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक आहे अशी माहिती पाणी फाउंडेशनचे प्रशिक्षक प्रशांत देवळे यांनी दिली. सहायक कृषी अधिकारी प्रियंका पाटबाजे यांनी हुमणी अळी या बहुभक्षीय किडीच्या व्यवस्थापनाविषयी मार्गदर्शन करताना शेतकऱ्यांना एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा अवलंब करण्याचे आवाहन केले. पावसाळ्याच्या सुरुवातीस प्रकाश सापळ्यांचा वापर करावा, तसेच शेतात नियमित पाहणी करून अळींचा प्रादुर्भाव वेळेवर ओळखावा, हुमणी अळीचा प्रादुर्भाव सुरुवातीच्या टप्प्यात नियंत्रणात आणल्यास पिकांचे होणारे मोठे आर्थिक नुकसान टाळता येते,' असे त्यांनी नमूद केले.

सदर कार्यक्रमास कृषिदूत पार्थ सावळे, अमन पायरे, देवाशिष अंबाडकर, गोकुल खंडार व श्रीश मोरखडे उपस्थित होते. यावेळी महिला शेतकऱ्यांचा सहभाग प्रचंड होता. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे, उपप्राचार्य नितेश चौधरी तसेच कार्यक्रम समन्वयक प्रा. श्वेता देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## अस्तित्वासाठी लढा

पश्चिम बंगालच्या राजकारणात चार दशके केंद्रबिंदू असलेल्या ममता बॅनर्जींना त्यांनी स्थापन केलेल्या तृणमूल काँग्रेस पक्षाला अस्तित्वासाठी लढण्याची वेळ आली आहे. ममता म्हणजे संघर्ष असे बंगालच्या राजकारणात समीकरण बनले होते. हट्टी स्वभावामुळे त्यांनी कुणापुढे मान तुकवली नाही किंवा हार मानली नाही. काँग्रेसमध्ये असतानाही दिल्लीतील श्रेष्ठींना कधी जुमानले नाही. सोनिया गांधींना आव्हान देण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. आपलाच पक्ष म्हणजे खरी काँग्रेस हे त्यांनी राज्यात सिद्ध केले; पण यंदाच्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर व सत्ता गमावल्यानंतर ममता यांना सोनिया गांधींकडे जाऊन त्यांच्याकडून सांत्वन करून घेण्याची वेळ आली.ममता यांनी जे पेरले तेच उगवले. त्यांनी कधी संयमाचे राजकारण केले नाही. त्यांनी तीन दशकांचे वर्चस्व असलेली पश्चिम बंगालमधील डाव्या आघाडीची सत्ता उलथवून टाकली.स्वतःचा वेगळा पक्ष स्थापन करून काँग्रेस संकुचित केली. भाजपशी निकराने लढाई दिली; पण भाजपच्या बलाढ्य ताकदीपुढे ममता यांना सत्ता गमवावी लागली. पराभव झाल्यानंतर त्यांच्यावरील राजकीय संकट आणखी गडद झाले. काँग्रेस, भाजप किंवा डाव्या पक्षांनी त्यांना संकटात टाकले नाही, तर त्यांच्याच पक्षातील आमदार- खासदारांनी बंडाचा झेंडा फडकावून तृणमूल काँग्रेसवरच आमचा पक्ष म्हणून दावा केला आहे. काँग्रेसला शह देण्यासाठी ममता यांनी १९९८ मधे तृणमूल काँग्रेस पक्ष स्थापन केला. आता तोच पक्ष त्यांच्या हातून हिसकावून घेण्यासाठी बंडखोरांनी तयारी केली आहे. ज्यांना आमदार-खासदार केले, तेच ममता यांच्या विरोधात दंड थोपटून उभे आहेत. पश्चिम बंगालमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपला प्रचंड बहुमत मिळणार आणि आपला दारूण पराभव होणार हे पंधरा वर्षे मुख्यमंत्रिपदावर असलेल्या ममता बॅनर्जी यांना कळले नसावे, असे कसे म्हणता येईल?निकालानंतर पक्षाचे ८० आमदार निवडून आले; पण त्यातले बहुसंख्य आपल्याला सोडून जात आहेत, याची त्यांना कल्पना कशी आली नाही? ऐंशीपैकी साठ आमदारांनी वेगळा गट स्थापन केला व विधानसभा अध्यक्षांना पत्र लिहून तृणमूल काँग्रेस म्हणून मान्यताही मिळवली.बंडखोरांचे नेते ऋतब्रत बॅनर्जी यांना विधानसभेतील विरोधी पक्षनेते म्हणूनही मान्यता मिळाली. ज्यांचे नाव विरोधी पक्षनेता म्हणून ममता यांनी विधानसभा अध्यक्षांना पाठवले, त्या पत्रावरील आमदारांच्या स्वाक्षऱ्यांची आता पडताळणी चालू आहे. आपल्या पक्षाचे ६० आमदार आणि २० खासदार महिनाभरात आपल्याविरोधात बंडाचा झेंडा फडकवतील, याचा ममता यांना अंदाज कसा आला नाही? महाराष्ट्रात उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे ४० आमदार असेच सुरत, गोवा, गुवाहटीला निघून गेले होते. तेव्हादेखील ठाकरे यांना एवढ्या मोठ्या बंडाची कल्पना कशी आली नाही, असा प्रश्न विचारला गेला होता. एकनाथ शिंदे यांना भाजपने मुख्यमंत्रिपदाची बक्षिसी दिली. एवढेच नव्हे, तर विधानसभा अध्यक्षांनी व निवडणूक आयोगाने शिंदे यांच्या गटाला शिवसेना हे पक्षाचे नाव व धनुष्य बाण हे निवडणूक चिन्हही देऊन टाकले. ठाकरे यांना मशाल चिन्ह घेऊन निवडणूक लढविण्याची वेळ आली. नंतर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसबाबत तसेच घडले. त्यांनी स्थापन केलेला पक्ष त्याचे पुतणे अजित पवार ४० आमदारांसह घेऊन गेले. शरद पवार यांना पक्षाचे नाव व घड्याळ हे चिन्ह गमवावे लागले. त्यानंतर पवारांच्या हातात तुतारी आली. तसेच आता ममता यांच्या तृणमूल काँग्रेसबाबत होईल, अशी चिन्हे दिसत आहेत. ठाकरे, पवार किंवा ममता बॅनर्जी यांच्यावर अशी वेळ का आली? त्यांनी जी जी माणसे मोठी केली, ती त्यांच्यावर का उलटली, याचा शोध घेतला, तर त्याचे उत्तर 'जशी करणी-तशी भरणी' असे द्यावे लागते. ममता सलग पंधरा वर्षे मुख्यमंत्री होत्या. या काळात पक्षात, प्रशासनात सर्वत्र भ्रष्टाचार कमालीचा वाढला होता. गुंडगिरी व दहशत शिगेला पोहोचली होती. मुस्लिमांचे तुष्टीकरण कमालीचे वाढले होते. हिंदूंच्या सणासुदींवर निर्बंध लादले जात होते. मुस्लिमांना आमदार-खासदारकी भरपूर दिली गेली.केंद्रातील मोदी सरकारचा सतत द्वेष व दुस्वास ममतादीदी करीत राहिल्या. केंद्र सरकारने बोलविलेल्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीला हजर राहायचे नाही, राष्ट्रपती किंवा पंतप्रधान राज्यात आले, तर राजशिष्टाचार म्हणून स्वागताला जायचे नाही, इथपर्यंत त्यांची मजल गेली होती. दिल्लीला आपण जुमानत नाही, असे त्या दाखवत.डाव्या पक्षांच्या सरकारच्या विरोधात बंगलाच्या जनतेने ममतांना भरभरून पाठिंबा दिला. काँग्रेसच्या विरोधात ममतांच्या पाठीशी बंगाली जनता भक्कमपणे उभी राहिली. त्याच जनतेने विधानसभा निवडणुकीत ममतांचा पराभव केला व त्यांच्या पक्षाला सत्तेवरून हटवले. त्याच जनतेने मोदी-शहांवर विश्वास प्रकट केला व भाजपच्या हाती सत्तेच्या चाव्या दिल्या.बांगला देशी घुसखोरांना ममता संरक्षण देतात व त्यातून राज्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो, याचे गांभीर्य ममतांना वाटले नाही, असा मतप्रवाह होता. त्याचा राग जनतेच्या मनात खदखदत होता.ममतादीदींकडून सर्वच बाबतीत अतिरेक होत होता. ममतांच्या विरोधात बंडाचा झेंडा फडकवणारे आमदार-खासदार हे स्वच्छ आणि आदर्श लोकप्रतिनिधी आहेत असे नव्हे. त्यांनी केलेल्या भ्रष्टाचार, दहशत व घोटाळे यांना ममतांनी नेहमीच संरक्षण दिले. आता ममतांची राज्यातील सत्ता गेली आहे. पुन्हा सत्ता येणे शक्य दिसत नाही. मग, आपल्याला वाचवणार कोण?या विचाराने त्यांचे अनेक सहकारी अस्वस्थ झाले आहेत. ममता यांनी ज्यांना मोठे केले, त्यांच्याच विरोधात लढण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. पक्षातील अंतर्गत असंतोष दाबण्याऐवजी तो अधिक वाढत गेला, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. सत्ताकाळात घेतलेले काही निर्णय आणि त्यांचे परिणाम आता उलट दिशेने परतताना दिसत आहेत. स्थानिक नेतृत्व आणि केंद्रातील नियंत्रण यामधील ताणतणावही या संघर्षाला कारणीभूत ठरल्याचे बोलले जाते. पुढील राजकीय वाटचालीत ममता बॅनर्जींना नव्याने संघटनात्मक पुनर्बांधणी करावी लागेल, असे स्पष्ट दिसते. पश्चिम बंगालचे राजकारण पुन्हा एकदा मोठ्या बदलाच्या उंबरठ्यावर उभे असल्याची चिन्हे आहेत. ममता बॅनर्जी यांची वाटचाल उद्धव ठाकरे व शरद पवारांच्या मार्गाने सुरू झाली आहे.ममता बॅनर्जी यांनी उभा केलेला पक्ष आज त्यांच्या हातातून निसटण्याच्या उंबरठ्यावर उभा आहे. राजकारणात जनतेचा विश्वास आणि सहकाऱ्यांची निष्ठा गमावली की,सर्वात बलाढ्य नेत्यालाही स्वतःच्या अस्तित्वासाठी झगडावे लागते,हेच बंगालच्या घडामोडींनी पुन्हा अधोरेखित केले आहे.

# कर्जमाफी हे वेदनाशामक, उपचार नव्हे!

**कर्जबाजारीपण ही शेतकऱ्याची चूक नसून तोट्यात चालणाऱ्या शेतीचा अपरिहार्य परिणाम आहे. एक पीक बुडाले की जुने कर्ज फेडण्यासाठी नवे कर्ज, ते फेडण्यासाठी सावकाराचे दार आणि शेवटी जमीन गहाण-हे दुष्टचक्र आहे. हे मूळ दुखणे कायम ठेवून केवळ कर्जमाफी जाहीर करत राहिले, तर तेच चक्र पुन्हा फिरते. गेल्या अठरा वर्षांत चौथी कर्जमाफी हेच सिद्ध करते की कर्जमाफी हे वेदनाशामक आहे, उपचार नव्हे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करताना राज्यातील शेतकऱ्यांना ऐतिहासिक दिलासा दिल्याचा दावा केला आहे. लोककल्याणाला सर्वोच्च स्थान देणाऱ्या अहिल्यादेवींचे नाव या योजनेला दिले असले, तरी योजनेच्या शासन निर्णयातील बारकावे तपासले की एक वेगळेच चित्र समोर येते. ही योजना शेतकऱ्याला कर्जमुक्त करणारी नसून बँकांच्या ताळेबंदातील बुडीत कर्जे सरकारी तिजोरीतून भरून काढणारी, म्हणजेच बँकांची 'बॅलन्सशीट-सफाई' करणारी योजना आहे, असा थेट आरोप शेतकरी आंदोलक करीत आहेत आणि आकडेवारी पाहिली की या आरोपात तथ्य असल्याचे जाणवते.

प्रथम पार्श्वभूमी. खरीप २०२५-२६ मध्ये अतिवृष्टी आणि पुरामुळे राज्यात ७५ लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचे खुद्द केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी मान्य केले आहे. या आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी म्हणून नागपूर येथे शेतकरी संघटनांनी मोठे आंदोलन केले. खरिपाची पीककर्जे ३० जून २०२६ नंतर थकीत होणार असल्याने तीच तारीख पात्रतेसाठी धरावी, ही आंदोलकांची प्रमुख मागणी होती. प्रत्यक्षात सरकारने थकबाकीची तारीख ३० सप्टेंबर २०२५ निश्चित केली. योजनेत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान उचललेली आणि ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली पीककर्जेच समाविष्ट आहेत. याचा सरळ अर्थ असा की, ज्या आपत्तीमुळे कर्जमाफीची घोषणा करावी लागली, त्याच आपत्तीतील बाधित शेतकरी योजनेच्या बाहेर फेकले गेले आहेत. विशेष म्हणजे, शासन निर्णयातच 'अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी आणि पूर शेतकऱ्यांना कर्जाच्या दुष्टचक्रात लोटतात,' अशी कबुली सरकारने दिली आहे. ही ही चूक नाही, हेच धोरण आहे.

दुसरा गंभीर मुद्दा दोन लाख रुपयांच्या मर्यादेचा. ही मर्यादा मुद्दल अधिक व्याज धरून आहे. कर्ज थकीत झाले की व्याज सवलत संपते आणि बँका १२.५ ते १४.५ टक्के चक्रवाढ दंडव्याज आकारतात. त्यामुळे कर्ज जितके जुने, तितके दोन लाखांत व्याजाचे प्रमाण अधिक आणि फिटणारे मुद्दल कमी. २०२४-२५ चे कर्ज असेल तर सुमारे १.७८ लाख रुपये मुद्दल फिटते; पण २०१९-२० चे कर्ज असेल तर दोन लाखांपैकी एक लाखाहून अधिक रक्कम केवळ बँकेचे व्याज ठरते आणि शेतकऱ्याच्या वाट्याला येते जेमतेम ९९ हजारांची मुद्दलमाफी. राज्य सरकार बँकेला मात्र पूर्ण दोन लाख अदा करणार आहे. म्हणजे जे व्याज बँकांना एरवी बुडीत म्हणून निर्लेखित करावे लागले असते, ते आता सरकारी तिजोरीतून वसूल होणार. कर्जमाफीच्या नावाखाली बँकांच्या अनुत्पादक मालमत्तेची (एनपीए) स्वच्छता, हेच या योजनेचे खरे अर्थकारण आहे.

तिसरा मुद्दा उघड पक्षपाताचा. महात्मा फुले कर्जमुक्ती योजना २०१९ चे लाभार्थी पुन्हा थकबाकीत बुडाले असतील, तर त्यांना केवळ ५० हजारांपर्यंतच सवलत मिळणार. वाढता लागवड खर्च, कोसळते भाव आणि सततच्या नैसर्गिक आपत्तींनी ज्यांना पुन्हा कर्जात ढकलले, त्यांना 'एकदा मदत घेतल्याची शिक्षा' दिली जात आहे.

चौथा मुद्दा आणखी बोचरा आहे. दोन लाखांवर थकबाकी असलेल्या शेतकऱ्याला एकरकमी परतफेड सवलत हवी असेल, तर मर्यादेवरील प्रत्येक रुपया त्याने ३१ मार्च २०२७ पूर्वी रोखीने आधी भरावा लागेल. शेतकऱ्याला कसलीही सूट नाही. याच देशात कॉर्पोरेट कंपन्यांना मात्र दिवाळखोरी संहितेखाली (आयबीसी) बँका सरासरी ६७ टक्के, काही प्रकरणांत ७९ ते ९० टक्क्यांपर्यंत कर्जसूट देतात. सोळा लाख कोटींची कॉर्पोरेट कर्जे निर्लेखित करणारी व्यवस्था शेतकऱ्याचा एक रुपयाही सोडायला तयार नाही, हा दुटप्पीपणा या योजनेने ठळकपणे अधोरेखित केला आहे.

पाचवा मुद्दा आहे, सहकारी कर्जदारांच्या सापळ्याचा. नैसर्गिक आपत्तीनंतर रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार जिल्हा बँकांना जुने कर्ज पुनर्गठित करून नवे पीककर्ज देणे बंधनकारक असते. प्रत्यक्षात हे 'नूतनीकरण' केवळ कागदोपत्री होते; रोख व्यवहार नसतोच. पण नूतनीकरणामुळे कर्जाची तारीख नवी होते आणि ते ३० सप्टेंबर २०२५ रोजी 'चालू' दिसते. परिणामी हा शेतकरी थकबाकीदार नाही म्हणून माफीस अपात्र आणि स्वतःच्या पैशाने फेड केली नाही म्हणून प्रोत्साहनासही अपात्र. नियम पाळणाऱ्या आपत्तीग्रस्ताला दोन्ही टोकांकडून वगळले गेले आहे. शिवाय नियमित परतफेडदारांच्या ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहनासाठी २०२५-२६ व २०२६-२७ मध्ये नवे कर्ज घेण्याची सक्ती आहे; कर्जमुक्त राहू इच्छिणारा शेतकरी अपात्र ठरतो. आधार-ॲग्रिस्टॅक नोंदणी अनिवार्य करून मदतनिधीतील रक्कम कायमस्वरूपी 'सहकार स्टॅक' उभारणीकडे वळवली जात आहे. मागील योजनेत तांत्रिक त्रुटींमुळे तीस हजार शेतकरी लाभाविना राहिले होते; सातबारा-आधार विसंगतीचे कारण पुढे करून लाखोंना वगळण्याची सोय या अटींमध्ये दडलेली आहे.

या साऱ्या निकषांची बेरीज केली की लाभार्थींचे आणि वगळलेल्यांचे चित्र स्पष्ट होते. लाभ सर्वप्रथम बँकांना - ताळेबंद स्वच्छ, जमा व्याजाची शासकीय तिजोरीतून भरपाई. शेतकऱ्यांपैकी फक्त २०१९ ते २०२५ या खिडकीतील, दोन लाखांखालील, प्रथमच थकलेल्यांचा अरुंद गट पात्र. बाहेर मात्र मोठा समुदाय - खरीप २०२५-२६ चे आपत्तीग्रस्त, ५० हजारांत गुंडाळलेले फुले योजनेचे लाभार्थी, नूतनीकृत सहकारी कर्जदार, दोन लाखांवरील पूर्ण वसुलीला सामोरे जाणारे, महिना २५ हजारांवर उत्पन्न असलेला एक सदस्य असणारी कुटुंबे आणि ॲग्रिस्टॅकवर नोंद नसलेले शेतकरी.पण या योजनेच्या पलीकडे जाऊन मूळ प्रश्न विचारला पाहिजे: शेतकरी पुन:पुन्हा कर्जबाजारी का होतो?

याचे उत्तर शेतीच्या अर्थव्यवस्थेच्या रचनेत आहे. बियाणे, खते, कीटकनाशके, डिझेल आणि मजुरीचे दर कॉर्पोरेट नियंत्रणाखाली सतत वाढत आहेत, तर शेतमालाचे भाव मात्र उत्पादन खर्चाच्याही खाली कोसळत आहेत. हवामान बदलामुळे दर दोन-तीन वर्षांनी दुष्काळ, अतिवृष्टी किंवा गारपीट पीक उद्ध्वस्त करते आणि पीकविमा योजना भरपाई देण्यात सपशेल अपयशी ठरते. संस्थात्मक पतपुरवठा अपुरा असल्याने लहान व कोरडवाहू शेतकरी खासगी सावकाराकडे ढकलला जातो, जिथे व्याजदर दुप्पट-तिप्पट असतात.

आरोग्य, शिक्षण आणि लग्नकार्यासाठीही कर्जच काढावे लागते. राष्ट्रीय नमुना पाहणीनुसार देशातील निम्म्याहून अधिक शेतकरी कुटुंबे कर्जबाजारी आहेत आणि अल्पभूधारकांच्या बाबतीत कर्जाचा बोजा उत्पन्नाच्या तुलनेत सर्वाधिक आहे. म्हणजे कर्जबाजारीपण ही शेतकऱ्याची चूक नसून तोट्यात चालणाऱ्या शेतीचा अपरिहार्य परिणाम आहे. एक पीक बुडाले की जुने कर्ज फेडण्यासाठी नवे कर्ज, ते फेडण्यासाठी सावकाराचे दार आणि शेवटी जमीन गहाण - हे दुष्टचक्र विदर्भ-मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्यांच्या आकडेवारीत दरवर्षी नोंदले जाते. हे मूळ दुखणे कायम ठेवून केवळ कर्जमाफी जाहीर करत राहिले, तर तेच चक्र पुन्हा फिरते. २००८ ची केंद्रीय कर्जमाफी, २०१७ ची छत्रपती शिवाजी महाराज योजना, २०१९ ची महात्मा फुले योजना आणि आता २०२६ ची होळकर योजना - अठरा वर्षांत चौथी कर्जमाफी हेच सिद्ध करते की कर्जमाफी हे वेदनाशामक आहे, उपचार नव्हे.

### मग कायमस्वरूपी मार्ग कोणता?

इथे केरळचा अनुभव महाराष्ट्रासाठी दिशादर्शक आहे. केरळने २००६ मध्ये कायदा करून 'शेतकरी कर्जमुक्ती आयोग' (फार्मर्स डेट रिलीफ कमिशन) स्थापन केला. निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील हा कायमस्वरूपी, अर्धन्यायिक आयोग संकटग्रस्त शेतकऱ्याच्या अर्जावर त्याची प्रत्यक्ष परिस्थिती - पीकहानी, उत्पन्न, कुटुंबावरील आपत्ती - तपासून प्रकरणनिहाय कर्जसूट, व्याजमाफी, हप्त्यांची फेररचना किंवा वसुलीस स्थगिती ठरवतो. महत्त्वाचे म्हणजे बँकांबरोबरच खासगी सावकारी कर्जेही आयोगाच्या कक्षेत येतात - जी कोणत्याही सरसकट कर्जमाफीत कधीच येत नाहीत, आणि जिथे शेतकऱ्याची सर्वाधिक पिळवणूक होते. सरसकट योजनेत बडा थकबाकीदारही लाभ उचलतो आणि खरा गरजू निकषांच्या जाळ्यात अडकतो; आयोगाच्या प्रकरणनिहाय पद्धतीत मदत नेमकी संकटग्रस्ताकडे पोहोचते. आपत्ती आली की शेतकऱ्याला आंदोलनाची आणि सरकारला निवडणुकीच्या मुहूर्ताची वाट पाहावी लागत नाही; एक स्थायी संस्थात्मक यंत्रणा वर्षभर काम करते आणि वसुलीच्या तगाद्याने होणाऱ्या टोकाच्या पावलांना वेळीच आळा बसतो. वायनाडसारख्या आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांत या आयोगाने हजारो प्रकरणे निकाली काढून शेतकऱ्यांना दिलासा दिला. महाराष्ट्राने अशाच धर्तीवर वैधानिक कर्जमुक्ती आयोग स्थापन केला, तर दर पाच-सात वर्षांनी राजकीय सोयीनुसार होणाऱ्या, बँकांचेच भले करणाऱ्या सरसकट कर्जमाफ्यांच्या दुष्टचक्रातून बाहेर पडण्याचा मार्ग खुला होईल. सार्वत्रिक कर्जमुक्तीनंतर पुन्हा कर्जाचा डोंगर उभा राहू नये, यासाठी अशी स्थायी वैधानिक यंत्रणा हीच खरी हमी ठरेल.

याच चर्चेत स्वामिनाथन आयोगाच्या सी२+५०% सूत्राचा उल्लेख अटळ आहे. संपूर्ण उत्पादन खर्चावर पन्नास टक्के नफा धरून हमीभाव हे सूत्र किसान सभेसह सर्व शेतकरी संघटनांची न्याय्य मागणी आहे आणि ती तातडीने अमलात आलीच पाहिजे. पण ती एकमेव व कायमस्वरूपी रामबाण उपाय मानणे ही फसवणूक ठरेल, याचेही भान हवे. कारण पहिले, खरेदीची कायदेशीर हमी आणि पुरेशी सरकारी खरेदी यंत्रणा नसेल, तर कागदावरचा हमीभाव बाजारात मिळतच नाही - आजही बहुतांश शेतमाल हमीभावाखाली विकला जातो. दुसरे, भाव कितीही चांगला असला तरी पूर-दुष्काळात पीकच हाती लागले नाही, तर हमीभाव कोणत्या मालाला मिळणार? तिसरे, निविष्ठांच्या किमती कॉर्पोरेट मक्तेदारीच्या हाती असेपर्यंत खर्च वाढवून हमीभावातील नफा गिळला जाऊ शकतो. आणि चौथे, हमीभाव भविष्यातील उत्पन्न सुधारतो, पण आधीच डोक्यावर असलेल्या कर्जाच्या डोंगराला हातही लावत नाही. म्हणूनच हमीभावाची कायदेशीर हमी, कायमस्वरूपी कर्जमुक्ती आयोग, विश्वासार्ह पीकविमा, स्वस्त व पुरेसा संस्थात्मक पतपुरवठा आणि सिंचन-पायाभूत सुविधांतील सार्वजनिक गुंतवणूक अशा एकात्मिक धोरणाशिवाय शेतीचे संकट सुटणार नाही.

या योजनेत तत्काळ बदल झाले पाहिजेत. पात्रता ३० जून २०२६ पर्यंतच्या सर्व थकबाकीदारांपर्यंत वाढवा, व्याज पूर्ण माफ करून २ लाख रुपये केवळ मुद्दलावर मोजा, २०१९ च्या लाभार्थ्यांवरील ५० हजारांची अपमानास्पद मर्यादा रद्द करा, नूतनीकृत सहकारी कर्जे पात्र ठरवा, दोन लाखांवरील कर्जांना कॉर्पोरेटप्रमाणे सूट द्या आणि ॲग्रिस्टॅक सक्ती मागे घ्या. हा पर्दाफाश गावागावांत नेण्याचा निर्धार संघटनेने जाहीर केला आहे. अहिल्यादेवींचे नाव योजनेला देणे सोपे आहे; त्यांच्या लोकाभिमुख कारभाराचा वसा चालवणे अवघड. शेतकऱ्यांच्या नावाने बँकांची तिजोरी भरणारी योजना की शेतकऱ्याला कर्जाच्या दुष्टचक्रातून कायमचे बाहेर काढणारी संरचनात्मक धोरणे - ही निवड आता महाराष्ट्राला करायची आहे.(साभार म.टा.)

**-राजन क्षीरसागर**

# शेतकरी कर्जमाफी एक क्रूर चेष्टा की बँकांची छुपी वसुली मोहीम?

आजच्या कृषी व्यवस्थेचे विदारक वास्तव आणि बँकिंग क्षेत्रातील दांभिकता चव्हाट्यावर आणणारा आहे. आपण नेहमी वर्तमानपत्रात किंवा बातम्यांमध्ये वाचतो, 'शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आंदोलन सुरू!' पण कधी शांत डोक्याने विचार केला का, की हे आंदोलन नक्की कोणासाठी असते? शेतकऱ्याला खरोखरच त्याचा फायदा होतो की हे केवळ बँकांचे थकीत पैसे वसूल करण्याचे एक छुपे माध्यम आहे?

या पार्श्वभूमीवर, आजच्या कृषी आणि बँकिंग व्यवस्थेचे विदारक वास्तव मांडणारे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे..

### 'शेतकरी कर्जमाफी'चा खरा चेहरा बँकेची छुपी वसुली?

जेव्हा एखादे कर्जमाफीचे आंदोलन यशस्वी होते आणि सरकार कर्जमाफी जाहीर करते, तेव्हा सरकार बँकांना पैसे देते, शेतकऱ्याला नाही!

**कागदोपत्री खेळ:** शेतकरी फक्त कागदोपत्री 'निल' (Zero) होतो.

बँकांचे जे पैसे बुडणार होते (Bad Loans), ते प्रामाणिक थेट बँकांच्या खिशात सुरक्षित पोहोचतात.

शेतकऱ्याच्या हातात पुन्हा शून्य कर्जमाफीनंतर शेतकऱ्याला बँका पुन्हा नवीन कर्ज सहज देत नाहीत. म्हणजेच, हे एक प्रकारे 'बँकेचे कर्ज वसुली आंदोलन' आहे, ज्याचा चेहरा शेतकऱ्याचा वापरून केला जातो!

### 'शेतीचे कर्ज अनैतिक' का आहे?

'जो धंदा निसर्गाच्या भरवशावर चालतो, त्यावर चक्रवाढ व्याज आकारणे हीच मुळात एक अनैतिक संकल्पना आहे.'

### निसर्गाच्या जुगारावर चक्रवाढ व्याज कसे?

इतर उद्योगांना लागणारा कच्चा माल, वीज, पाणी आणि कारखान्यातील वातावरण मानवी नियंत्रणात असते. याउलट, शेती पूर्णपणे निसर्गावर (लहरी पाऊस, गारपीट, कडक ऊन, रोगराई) अवलंबून आहे. उत्पादन हातात येईल की नाही याची शाश्वती नसताना, त्यावर व्यावसायिक दराने व्याज आणि चक्रवाढ व्याज आकारणे हे पूर्णपणे अनैतिक आहे.

भांडवलदारांना 'NPA' ची सवलत, शेतकऱ्यांना फाशी!



देशातील मोठे उद्योगपती हजारो कोटींचे कर्ज बुडवून परदेशात पळून जातात, किंवा त्यांच्या कर्जाची पुनर्रचना करून त्यांना 'NPA' (Non-Performing Asset) म्हणून सोडून दिले जाते. पण एका शेतकऱ्याने केवळ काही हजारांचे कर्ज थकवले, तर त्याच्या सातबाऱ्यावर बँकेचा बोजा चढवला जातो. बँकेचे अधिकारी आणि दलाल दारात येऊन अपमान करतात. शेवटी याच आत्मसन्मानासाठी शेतकऱ्याला मृत्यूला कवळावे लागते.

### शेतमालाला भाव नाही, मग कर्ज कसे फिटणार?

शेतकऱ्याच्या मालाचे भाव बाजारपेठ ठरवत नाही, तर सरकार नियंत्रित करते. जेव्हा शेतकऱ्याच्या मालाला चांगला भाव मिळण्याची चिन्हे असतात, तेव्हा सरकार तातडीने निर्यातबंदी लागू करते.परदेशातून स्वस्त आयात करून देशांतर्गत भाव पाडते.

जर शेतकऱ्याला स्वतःच्या घामाच्या दामाचा भाव ठरवण्याचा अधिकारच नाही, तर तो बँकेचे कर्ज वेळेवर कसे फेडणार? हा सरळ-सरळ 'गळा दाबून अंबादास' करण्याचा प्रकार आहे.

### मग खरा मार्ग कोणता? 'कर्जमाफी' नव्हे, 'कर्जमुक्ती'!

'शेतकऱ्याला दरवर्षी मिळणारी, राजकीय पक्षांनी टाकलेली 'कर्जमाफीची भीक' नकोय. ती तात्पुरती मलमपट्टी आहे, मूळ रोगावरचा उपाय नाही. शेतकरी संघटनेची मागणी स्पष्ट आहे.

'कर्जमुक्त करणारी कायमस्वरूपी व्यवस्था हवी शेतकऱ्याच्या शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित 'न्याय्य रास्तभाव' (शरद जोशी यांच्या विचारसरणीनुसार चक्रवाढ नफ्यासह भाव) मिळाला पाहिजे.

'शेतीसाठी बिनव्याजी कर्ज पुरवठा शेतीला 'उद्योगाचा दर्जा' देऊन नैसर्गिक आपत्तीच्या काळात व्याजातून पूर्णपणे १००% सूट मिळायला हवी.

बँकिंग रचनेत आणि मानसिकतेत बदल बँकांनी शेतकऱ्याकडे 'गुन्हेगार किंवा थकीत कर्जदार' म्हणून न पाहता देशाचा 'अन्नदाता' म्हणून पाहिले पाहिजे.

### जाहीर आवाहन-

जोपर्यंत शेती उत्पादनाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव किंवा योग्य किंमत मिळत नाही, तोपर्यंत या कर्जमाफीच्या घोषणा म्हणजे केवळ राजकीय स्टंट आणि बँकांचे उखळ पांढरे करण्याचे साधन ठरतील. आता वेळ आली आहे कर्जमाफीच्या या भिकेविरुद्ध नाही, तर या संपूर्ण अनैतिक कर्ज आणि बाजार व्यवस्थेविरुद्ध एकजुटीने आवाज उठवण्याची!

'भीक नको, घेऊ घामाचे दाम!'

**विलास तुळशीराम ताथोड**
राज्य कार्यकारणी सदस्य, शरद जोशी द्वारा स्थापित शेतकरी संघटना, अकोला
मो. नं: ७०२०५८५२६१





आरोग्य विभागाच्या चमूने जिल्हा सामान्य रूग्णालय, जिल्हा स्त्री रूग्णालय व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे भेट देवून तेथील पाहणी केली. यावेळी रूग्णालय व रूग्णालय परिसरात प्रचंड घाण असल्याचे आढळून आले. त्याचबरोबर पाणी व्यवस्था व शौचायलयाचीही दयनीय अवस्थेबाबत तीव्र रोष व्यक्त केला. सदर रूग्णालयाचा स्वच्छतेबाबतचा कंत्राट अमरावती येथील हिंदुस्तान कंपनीकडे असून या कंपनीच्या अधिका-यांना नियमित स्वच्छतेविषयी ताकीद दिली.( छाया : प्रदीप इंगोले)

# जनता दरबाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अचलपूर/ वार्ताहर**

शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आ. बच्चू कडू यांच्या विदर्भ मील परिसरातील जनसंपर्क कार्यालयात संपन्न झालेल्या जनता दरबारात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला.



यावेळी अचलपूर तालुक्यातून नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यातून विविध भागातून नागरिकांनी शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आ.बच्चू कडू यांच्या कडे तक्रारी मांडल्या.

यावेळी शेतकरी ,नागरिक ,तरुण वर्ग,महिला मंडळी,ज्येष्ठ नागरिकांच्या विविध शासकीय कार्यालयाकडे प्रलंबित प्रकरणे तात्काळ आ.बच्चू कडू यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रलंबित नागरिकांच्या समस्या या जनता दरबाराच्या माध्यमातून निकाली लागल्या आहे. जनता दरबारात यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.कृषी विभाग, भूमिअभिलेख विभाग ,अचलपूर नगर परिषद, तहसील कार्यालय ,पंचायत समिती कार्यालय,महावितरण कार्यालय आदी विविध शासकीय विभागाशी प्रलंबित नागरिकांच्या तक्रारी या जनता दरबाराच्या माध्यमातून विधानपरिषद आ.बच्चू कडू यांनी मार्गी लावल्या.अचलपूर मतदार संघाचे माजी आमदार आणि राज्याचे माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी नेहमी सामान्य माणसाला न्याय देण्यासाठी दाखवलेली तत्परता हीच सामान्य माणसाचा आवाज म्हणून कडू यांना ओळखली जाते.यावेळी विधानपरिषद आमदार बच्चू कडू यांनी संबंधित अधिकाऱ्यांना मोबाईल द्वारे संपर्क करून जाब ही विचारला.यावेळी अचलपूर नगर परिषदेचे माजी बांधकाम सभापती बल्लू भाऊ जवंजाळ,रवी अग्रवाल ,माजी नगरसेवक प्रवीण पाटील,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नितीन आगे, नगरसेवक मनोज नंदवंशी, संतोष चव्हाण,सागर चांदणे, भास्कर मासोदकर, जे.डी. वानखेडे,हरीश खापरे,भूषण घडेकर,यश घुलक्षे ,जब्बार बाई, हर्ष गुप्ता आदी उपस्थित होते.

# सदोष मनुष्यवधाच्या गुन्हामधील आरोपीचा अटकपूर्व जामीन मंजूर

**अमरावती/ का.प्र.**

येवदा पोलीस स्टेशन हद्दीतील तालुका दर्यापूर येथे आरोपी विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११७ (२), ३५२ व १०५ गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यानंतर आरोपीच्या वकिलांनी जिल्हा व सत्र न्यायालय दर्यापूर येथे आरोपीच्या वतीने अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल केला.परंतु माननीय न्यायालय दर्यापूर यांनी गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असल्याने आरोपीचा अटकपूर्व जामीनाचा अर्ज नामंजूर केला. त्यानंतर आरोपीच्या वकिलांनी माननीय उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर, यांच्याकडे आरोपीचा अटकपूर्व जामीनाचा अर्ज केला होता.

आरोपीच्या वतीने ॲड. विक्रम सरवटकर व ॲड. दत्ताराम मुदगळे यांनी केलेला युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरत ११ जून २०२६ रोजी आरोपीला अटकपूर्व जामीन देण्याचा आदेश दिला.

मिळालेल्या माहितीनुसार, २५ फेब्रुवारी २०२६ रोजी तालुका दर्यापूर येथे फिर्यादीच्या पतीचे पार्किंगच्या वादावरून आरोपी सोबत भांडण झाले होते.भांडणाचे रूपांतर शिवीगाळ व धक्काबुक्की मध्ये झाले व त्यानंतर आरोपीने फिर्यादीच्या पतीला धक्का दिल्यामुळे ते खाली पडले व त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागला त्यानंतर फिर्यादीच्या पतीची प्रकृती बिघडली व त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असा आरोप फिर्यादी कडून करण्यात आला होता.या प्रकरणी पोलीस स्टेशन येवदा यांनी दिनांक १३ मार्च २०२६ रोजी भारतीय न्याय संहिता कलम ११७(२), ३५२, १०५ अंतर्गत गुन्हा नोंद केला.

### ॲड. विक्रम सरवटकर व ॲड. दत्ताराम मुदगळे यांचा यशस्वी युक्तिवाद

त्यानंतर आरोपीच्या वतीने ॲड. विक्रम सरवटकर व ॲड दत्ताराम मुदगळे यांनी उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांच्याकडे अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल करून प्रभावी युक्तिवाद केला व तथ्य मांडले. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी तो ग्राह्य धरत आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर केला.

या प्रकरणात ॲड. नंदकुमार मुलतैकर, राहुल कडूसकर, चेतन उर्फ गजानन चौके यांचेही सहकार्य लाभल्याची माहिती मिळाली आहे.

## हसत- खेळत योगा कार्यक्रम

**अमरावती-** योगाभ्यास ही आजच्या काळातील गरज बनला आहे. अनेकजण योगा करण्यासाठी खाली किंवा जमिनीवर बसू शकत नाहीत, अशा सर्वांसाठी शहरात पहिल्यांदाच खुर्चीवरील योगा व न्यूरो योग या आगळ्या वेगळ्या उपक्रमाचे आयोजन गुरुवारी (ता.१८) वॉलकट कंपाउन्ड परिसरातील जिल्हा मराठी पत्रकार भवन येथे करण्यात येत आहे. संजीवनी नॅचरोपॅथी, फिजिओथेरपी योगीक सायन्स फाउन्डेशन तसेच जिल्हा मराठी पत्रकारसंघाच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम सायंकाळी सहा वाजता होणार आहे. या कार्यक्रमात प्रशिक्षक डॉ. रोमा बजाज या खुर्चीवरील योगाभ्यासाचे प्रात्यक्षिक तसेच प्रशिक्षण देणार आहेत. सायंकाळी सहाला योग प्रात्यक्षीकांना सुरुवात केली जाणार असून सहभागी होवू इच्छिणाऱ्यांना आपल्या सोबत एक लाटणे, दुपट्टा, कपड्याची क्लिप, हेयरबॅण्ड आणण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या आगळ्या वेगळ्या चेअरयोगाचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल, संजिवनी नॅचरोपॅथी, फिजिओथेरपी योगीक सायन्स फाउन्डेशनच्या संचालिका डॉ. रोमा राजेश बजाज, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस प्रफुल्ल घवळे व सुधीर भारती यांनी केले आहे.

## ग्राहकांच्या तक्रारींमध्ये स्मार्ट मीटरमुळे मोठी घट

**अमरावती-** राज्यात महावितरणतर्फे आतापर्यंत १ कोटी २० लाख स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. स्मार्ट मीटरमुळे अचूक रिडिंग होते. राज्यात स्मार्ट मीटरचे प्रमाण वाढल्यानंतर ग्राहकांच्या वीजबिलाच्या तक्रारी खूप कमी झाल्या आहेत स्मार्ट मीटरमुळे मिळणाऱ्या माहितीच्या आधारे ग्राहकाला त्याच्या वीजवापरावर व वीजबिलावर नियंत्रण ठेवणे शक्य होते. स्मार्ट मीटरच्या ॲपद्वारे ग्राहकाला त्या घरात अथवा कार्यालयात अर्थिंगची समस्या अथवा वीजगळती होत असल्यास समजते. त्या माहितीचाही ग्राहकाला लाभ होतो.ग्राहकाने कोणत्या वेळेला किती वीज वापरली हे स्मार्ट मीटरमुळे समजते. त्या आधारे घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वापरलेल्या विजेसाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत मिळते. याशिवाय मोबाईल ॲपद्वारे बिल भरल्यास डिजिटल पेमेंटची सवलत आणि गो ग्रीनची दरमहा दहा रुपये सवलत मिळते.

## आरोग्य तपासणी शिबीर

**अमरावती-** महाराष्ट्र होमिओ फिमेल डॉक्टर्स असोसिएशन फॉउंडर प्रेसिडेंट डॉ. रुपाली गोसावी, जनरल सेक्रेटरी डॉ आरती नल्लू , स्टेट कोर कमिटी मेंबर डॉ स्वाती पडोळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र होमिओ फिमेल डॉक्टर्स असोसिएशन व संजीवन सोशल डेव्हलोपमेंट सोसायटी अमरावती अंतर्गत प्रभू येशू प्रार्थना भवन ( रोही चर्च)महादेव खोरी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.यावेळी संजय दिवे व अस्मिता दिवे यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ प्रिया मोहोड यांचे स्वागत केले.शिबिराला डॉ. वैशाली टेम्भे, सदस्य डॉ प्रज्ञा घाटोळ, डॉ. सुजाता भगत, डॉ. नम्रता नानवानी , डॉ. रुद्रायणी सांगेकर, डॉ सांची तितरे , डॉ.कुरेत खान उपस्थित होते.शिबिरात महिला, पुरुष, लहान मुले व वरिष्ठ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करून मोफत औषधी देखील देण्यात आली.शिबिराला नागरिकांच्या उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.



## TRULAB QUATTRO PCR मशीनचे प्रत्यापन

**अमरावती-** श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती व्दारा संचालीत डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील सुक्ष्मजीवशास्त्र विभागात TRULAB QUATTRO या PCR Test साठी लागणा-या मशीनचे प्रत्यापन महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रशासकीय अधिकारी डॉ. स्वप्नील मोहोड, सुक्ष्मजीवशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रमोद भिसे, प्रा.डॉ. मुक्ता देशमुख व इतर शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.शासनाच्या NTEP अंतर्गत ही मशिन प्रदान करण्यात आली आहे. डिसेंबर २०२० पासून सुक्ष्मजीवशास्त्र विभागात क्षयरोग निदानासाठी PCR Testing करण्यात येत आहे. नवीन TRULAB QUATTRO ज्यामध्ये Nuclic acid (DNA RNA) Amplification या तंत्राचा वापर करून PCR Test केल्या जाते. कमीत कमी वेळात ( ३ ते ६ तास) रोगाचे निदान करता येते.क्षयरोग निदाना बरोबरच HIV-AIDS, Hepatitis A, Hepatitis B, C, Swine flue, Covid, Human Papilloma Virus (HPV) व अशा अनेक संसर्गजन्य आजारांचे निदान या मशिनव्दारे करता येऊ शकते अशी माहिती सुक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. प्रमोद भिसे यांनी दिली.



# फांद्या कापल्या, पण जबाबदारी झटकली!

**महावितरणच्या गलथान कारभाराने नागरिक संतप्त**

**चांदुर रेल्वे/ वार्ताहर**



महावितरण कंपनीकडून शहरातील विविध भागांमध्ये वीज वाहिन्यांलगत असलेल्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात येते. मात्र, छाटणीनंतर त्या फांद्या जागेवरच टाकून दिल्या जातात किंवा थोड्या अंतरावर नाले, रस्त्याच्या कडेला अथवा सार्वजनिक ठिकाणी फेकल्या जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. महावितरणचा हा निष्काळजी व गलथान कारभार नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण करणारा ठरत आहे.

वीजपुरवठा सुरळीत राहावा आणि वाढलेल्या फांद्यांमुळे वीजवाहिन्यांना धोका निर्माण होऊ नये यासाठी ट्री-कटिंग करणे आवश्यक आहे. मात्र, फांद्यांची छाटणी केल्यानंतर त्यांची योग्य विल्हेवाट लावणे ही देखील महावितरणची जबाबदारी आहे. अनेक ठिकाणी फांद्यांचे ढीग पडून राहत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होतो, नाल्यांमध्ये अडथळे निर्माण होतात तसेच परिसराचे सौंदर्यही बिघडते.

जर महावितरणकडे या फांद्या उचलण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा नसेल, तर नगर परिषद अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय साधून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक पत्रव्यवहार व कार्यवाही करणे अपेक्षित आहे. नागरिकांची मागणी आहे की, ट्री-कटिंगनंतर उरलेला कचरा तातडीने हटवून शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी महावितरणने पार पाडावी.

## देवस्थान भूमी संरक्षण परिषदेत

# मंदिर सरकारीकरण आणि वक्फ बोर्डाच्या अतिक्रमणाविरोधात लढा देण्याचा निर्धार

**अमरावती/ का.प्र.**

येथील रामदेव बाबा मंदिर येथे 'देवस्थान भूमी संरक्षण परिषदेचे' आयोजन करण्यात आले होते.

परिषदेला अमरावतीचे खासदार डॉ. अनिल बोंडे,हिंदू जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड संघटक तसेच राष्ट्रीय मंदिर महासंघाचे संघटक सुनील घनवट यांच्यासह विदर्भातील दीडशेहून अधिक मंदिरांचे विश्वस्त उपस्थित होते.

शासनाने 'इनाम निर्मूलन कायद्याचे' प्रारूप स्थगित करणे हा हिंदूंच्या संघटित शक्तीचा विजय असून,पुढील लढा मंदिरांच्या जमिनी वक्फ बोर्डाच्या ताब्यातून मुक्त करण्याचा असेल, असा निर्धार या परिषदेत व्यक्त करण्यात आला.

यावेळी सुनील घनवट म्हणाले की, मंदिर महासंघाच्या स्थापनेपूर्वी प्रत्येक मंदिर केवळ स्वतःपुरताच विचार करत होते. मात्र, आज मंदिर संस्कृतीवर आघात झाल्यावर सर्व मंदिर विश्वस्त रस्त्यावर उतरत आहेत. याचाच अर्थ 'अभी देश बदल रहा है, हिंदू राष्ट्र की ओर बढ रहा है.' कोणत्याही एका मंदिराची समस्या ही केवळ त्या मंदिरापुरती मर्यादित नसून ती संपूर्ण हिंदू समाजाची समस्या आहे, या भावनेने आपण लढलो.

जर आपण हेच बळ पुढे कायम ठेवले, तर एक दिवस केंद्र सरकारला देशातील ४ लाख मंदिरे सरकारीकरणातून मुक्त करण्याची घोषणा करावीच लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.




परिषेदेला मार्गदर्शन करताना डॉ. अनिल बोंडे म्हणाले की, आपण मंदिर भूमीच्या रक्षणासाठी लढा देत असतानाच, मंदिरांचे प्रत्यक्ष रक्षण आणि सुरक्षा करणेही तितकेच आवश्यक आहे. याकडे सर्व मंदिर विश्वस्तांनी अत्यंत गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.

देवस्थान सेवा समितीचे अनूप जयसवाल यांनी 'महाराष्ट्र इनाम निर्मूलन अधिनियम' हा हिंदू मंदिरांसाठी कसा जाचक होता आणि तो रहित करणे का आवश्यक होते, यावर सविस्तर प्रकाश टाकला.

हिंदू जनजागृती समितीचे विदर्भ समन्वयक श्रीकांत पिसोळकर यांनी परिषदेची प्रास्ताविक भूमिका मांडली.

त्यांनी महाराष्ट्र मंदिर महासंघाने आतापर्यंत केलेल्या कार्याचा आणि मिळालेल्या ऐतिहासिक यशाचा आढावा घेतला.

हिंदु जनजागृती समिती आणि महाराष्ट्र मंदिर महासंघ तर्फे आयोजित देवस्थान भूमी संरक्षण परिषदेला श्रीकांत पिसोळकर, प्रदीप गर्गे आणि सचिन वैद्य तसेच अमरावती व अमरावती जिल्ह्यातील १५० हून अधिक मंदिरांचे प्रमुख विश्वस्त आणि प्रतिनिधी यांची उपस्थिती लाभली.

यावेळी बंडूजी महाराज, श्री बंडेश्वर भद्रा हनुमान मंदिर अमरावती,ॲड. राजेंद्र पांडे, अंबादेवी संस्थान अमरावती, विनीत पाकोडे ,पिंगळादेवी संस्थान, नेर पिंगळाईपूंजाजी नेमाडे, श्रीकृष्ण अवधूत महाराज संस्थान , सावंगा विठोबा,जयंत कद्रे, मुरलीधर महाराज देवस्थान देवस्थान, निलेश जटाळे, आशा मनीषा संस्थान, दर्यापूर,गजानन चिठोरे, कुरळ पु. आदी उपस्थीत होते.

# पंढरीच्या ओढीने घुईखेडवरून वारकरी मार्गस्थ; संत बेंडोजी बाबा दिंडीचे प्रस्थान

**१३७ वर्षांची अखंड परंपरा : ९१० किलोमीटरचा पायी प्रवास; २५ जुलैला पंढरपूरात होणार आगमन**

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

वारकरी संप्रदायाची श्रद्धा, भक्ती आणि परंपरा जपणारी घुईखेड येथील श्री संत बेंडोजी बाबा संस्थानची ऐतिहासिक पायी दिंडी १२ जून रोजी मोठ्या उत्साहात पंढरपूरकडे रवाना झाली. तब्बल १३७ वर्षांची अखंड परंपरा लाभलेल्या या दिंडीत घुईखेडसह परिसरातील शेकडो वारकरी सहभागी झाले असून २५ जुलै रोजी दिंडी पंढरपूर येथे पोहोचणार आहे.



नियमानुसार दिंडीने श्री संत बेंडोजी बाबा संस्थानातून प्रस्थान करून गावातील चंद्रभागा नदीपात्रात आगमन केले. येथे संत बेंडोजी महाराजांच्या पवित्र पादुकांचे विधिवत पूजन व आरती संस्थानचे खजिनदार दिनकरराव घुईखेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर टाळ-मृदंगाच्या गजरात, हरिनामाच्या जयघोषात आणि भजन-कीर्तनांच्या सुरावटीत दिंडीने पंढरीच्या दिशेने मार्गक्रमण सुरू केले. घरदार, संसार आणि दैनंदिन चिंता बाजूला ठेवून वारकरी भक्तिभावाने या वारीत सहभागी झाले आहेत. घुईखेड ते पंढरपूर हा सुमारे ९१० किलोमीटरचा प्रवास वारकरी पायी पूर्ण करणार आहेत. विशेष म्हणजे पैठण आणि आळंदी मार्गे होणाऱ्या या वारीत सहभागी होणारे वारकरी संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यासोबत आळंदी ते पंढरपूर असा आणखी सुमारे २६० किलोमीटरचा प्रवास करणार आहेत. एकूण ४७ दिवस चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यातील २१ मानाच्या दिंड्यांपैकी श्री संत बेंडोजी महाराज संस्थान, घुईखेडच्या दिंडीला १७वा मानाचा क्रमांक आहे.

विदर्भातून सहभागी होणारी ही एकमेव मानाची दिंडी असल्याने तिचे विशेष महत्त्व आहे. संस्थानचा इतिहास १३३७ सालापर्यंत पोहोचत असून वारकरी परंपरेची ही अखंड ज्योत आजही तेवती ठेवली आहे.

दिंडी २५ जून रोजी पैठण येथे पोहोचणार असून २६ जूनला तेथून प्रस्थान करून ७ जुलै रोजी आळंदी गाठणार आहे. ८ जुलैपासून संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यासह पुढील प्रवास सुरू होईल आणि २५ जुलै रोजी दिंडी पंढरपूर येथे दाखल होणार आहे. या कालावधीत विविध गावांमध्ये वारकऱ्यांसाठी निवास, चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. दिंडी प्रस्थान सोहळ्यास संस्थानचे विणेकरी बाबाराव गोडबोले, प्रशांत घुईखेडकर, संजय काकडे, नंदू काकडे, यशवंत काकडे, मिलिंद घुईखेडकर, विश्वेश्वर गावंडे, पांडुरंग भोयर, दिलीप येवले, प्रफुल चनेकार, मुकुंद काकडे, गणेश गावंडे, किशोर मेहर, गजानन कोल्हे, किशोर येवले, अनिल शेंडे, रवी गिरी, संगम तायडे, बाळू मिर्झापुरे, मनोहर कोल्हे, कैलास सावंतकर गजानन फिस्के, मारुती वरखडे, मधु बोबडे, संजय चनेकार, पार्थ फिस्के, दादाराव कुडे, प्रमोद ढवळे, बबन कोठाळे, सुरेश पडघान, ज्ञानेश्वर इंगोले, संतोष देशमुख, गिरीश काकडे, अनिल टेके, मारुती शिवणकर, सुधिर भारती यांच्यासह शेकडो वारकरी आणि भाविक उपस्थित होते. भक्ती, समर्पण आणि सामाजिक ऐक्याचे प्रतीक मानली जाणारी ही ऐतिहासिक दिंडी यंदाही उत्साहात मार्गस्थ झाली असून पंढरीच्या वाटेवर हरिनामाचा गजर अखंड सुरू राहणार आहे.

# संपामुळे उद्यापासून राज्यातील आरटीओ सेवा ठप्प होणार

**प्रलंबित मागण्यांवर शासनाची चालढकल**

**अमरावती/ का.प्र.**

मोटार वाहन आरटीओ विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासन व प्रशासनाकडून सातत्याने टोलवाटोलवी होत असल्याचा आरोप करत राज्यातील आरटीओ कर्मचाऱ्यांनी उद्या (दि. १६ जून) पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. या संपामुळे राज्यभरातील आरटीओ कार्यालयांमधील अनेक सेवा विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, विभागाचा आकृतीबंध मंजूर होऊन साडेतीन वर्षांचा कालावधी लोटला असतानाही सेवा प्रवेश नियम अद्याप तयार करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनेक कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहत असून त्यांचे आर्थिक तसेच सामाजिक नुकसान होत आहे. याशिवाय इतरही अनेक प्रलंबित प्रश्नांवर शासनाने कोणतीही ठोस कार्यवाही न केल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कर्मचाऱ्यांनी यापूर्वी २ जून रोजी दोन तासांचे धरणे-निदर्शने तसेच ९ जून रोजी एक दिवसीय लाक्षणिक संप पुकारला होता. मात्र त्यानंतरही शासन व प्रशासनाकडून कोणतीही सकारात्मक भूमिका घेण्यात आली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. कर्मचाऱ्यांच्या बहुतांश मागण्या प्रशासन स्तरावरच निकाली निघू शकतात. यासाठी संघटनेने वारंवार पाठपुरावा करून आवश्यक कागदपत्रे सादर केली असतानाही प्रशासन मार्गदर्शनाच्या नावाखाली प्रस्ताव शासनाकडे पाठवून वेळकाढूपणा करीत असल्याची टीका संघटनेकडून करण्यात आली आहे.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काही दिवसांपूर्वी बैठक घेतली होती. मात्र त्या बैठकीचे इतिवृत्त अद्याप उपलब्ध करून देण्यात आले नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष वाढला आहे.दरम्यान, संघटनेची तातडीची बैठक १३ जून रोजी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सविस्तर चर्चा करून बेमुदत संपाशिवाय अन्य कोणताही पर्याय शिल्लक नसल्याची भूमिका व्यक्त केली. त्यानुसार १६ जूनपासून राज्यातील सर्व आरटीओ कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असून त्याद्वारे शासनाविरोधातील आपला रोष व्यक्त करणार आहेत.

शासन व प्रशासनाने प्रलंबित मागण्यांबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा कर्मचारी आंदोलनातून माघार घेणार नाहीत, असा इशारा संघटनेचे प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत तातडीने प्रलंबित प्रश्न निकाली काढावेत, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही संघटनेच्या वतीने मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष प्रकाश पाटील, सरचिटणीस सुरेंद्र सरतापे, राज्य उपाध्यक्ष तथा अमरावती विभागाचे अध्यक्ष अनिल मानकर, संदीप खवले, गजानन तनपुरे, सुनील गुल्हाने, दीपक पोटे, अमोल खिरोडकर, राहुल शिरसाठ, किशोर देशमुख, अभिजीत गावंडे, अक्षय राठोड, अमोल गंगाखेडकर, प्रमोद राजनेकर,अमोल माटोडे, साजिद अली, श्वेता वैद्य, रोहिणी दातार,मीनल गिऱ्हे, लता कानडे, अश्विनी चव्हाण, अमोल गंगाखेडकर, उमेश तिवारी,हर्षदा चव्हात, वृषाली महल्ले, वैशाली निंभोरकर, स्मिता सिरमलवार, प्रीती डोंगरे, मनोज खोब्रागडे, जयसिंग राठोड, नितीन मुखे,अनिल मेश्राम, अरुण वाघमारे, संदीप अडागडे, राजेश राऊत, आशिष माथुरकर, देवेंद्र कळमकर, उज्वल ठाकरे, राजेश पाटील, रवींद्र रुद्रकार, संतोष घ्यार, सुनील सोळंकी, प्रवीण तायवाडे, समीक्षा वारकरी, किशोर आडे,मीना मडावी, विनोद पिंगे,रामकृष्ण खंडारे, गजानन धुर्वे,संदीप राठोड,निखिल भेंडारे,सोहन हेमने, डेविन जुमळे, नितीन भेंडारे, शारदा हेडाऊ, रस्मिता पवार, प्रवीण मुंगळे, देवानंद खंडारे, विशाल शिवनकर, स्वप्निल सहारे आदी राज्यातील कर्मचारी वर्गाने दिलेला आहे.

# स्मार्ट मीटर सक्तीविरोधात शिवसेनेचे महावितरण कार्यालयावर ठिय्या आंदोलन

## ग्राहकांची संमती घेतल्याशिवाय मीटर बदलू नका ; वाढीव वीजबिलांची चौकशी करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

***अकोला शहर व जिल्ह्यातील वीज ग्राहकांवर स्मार्ट मीटर लावण्याची सक्ती होत असल्याचा आरोप करत शिवसेनेच्या वतीने सोमवारी महावितरणच्या कार्यकारी अभियंता कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. ग्राहकांच्या हक्कांवर गदा आणणारा कोणताही निर्णय सहन केला जाणार नसल्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला.***



अलीकडील काळात अकोला शहर व जिल्ह्यातील अनेक वीज ग्राहकांना 'पुढील ४८ तासांत आपला वीज मीटर स्मार्ट मीटरमध्ये बदलण्यात येणार आहे' अशा आशयाचे संदेश पाठविले जात असल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्मार्ट मीटर बसविणे अनिवार्य नसताना ग्राहकांची संमती न घेता मीटर बदलण्याची प्रक्रिया सुरू असल्याच्या तक्रारी शिवसेनेकडे प्राप्त झाल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

यावेळी अनेक नागरिकांनी स्मार्ट मीटर बसविण्यानंतर वीजबिलांमध्ये वाढ झाल्याच्या तक्रारी नोंदविल्या असल्याचा दावा करण्यात आला. तसेच मीटर बसविणाऱ्या काही कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांशी अरेरावीची भाषा वापरली जात असल्याच्याही तक्रारी पुढे आल्याचे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले.

आंदोलनादरम्यान 'स्मार्ट मीटरची सक्ती बंद करा', 'वीज ग्राहकांवर अन्याय चालणार नाही', 'जय भवानी, जय शिवाजी', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो' अशा घोषणांनी महावितरण कार्यालय परिसर दुमदुमून गेला.

शिवसेनेने महावितरण प्रशासनाकडे ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया तात्काळ थांबविणे, दबाव निर्माण करणारे संदेश पाठविणे बंद करणे, स्मार्ट मीटरबाबत शासनाचे धोरण व ग्राहकांचे अधिकार स्पष्ट करणे तसेच वाढीव वीजबिलांच्या तक्रारींची स्वतंत्र चौकशी करणे, अशा प्रमुख मागण्या केल्या. यासंदर्भातील निवेदन महावितरणच्या प्रतिक्षा शंभरकर यांना देण्यात आले. शिवसेना नेते आमदार बच्चू कडू, शिवसेना उपनेते तथा माजी आमदार गोपीकिसन बाजोरिया, जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार राजन साळवी आणि जिल्हा विशेष प्रभारी ललित वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरप्रमुख राजेश मिश्रा व योगेश ढोर यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले.

यावेळी माजी नगरसेवक सागर भारुका, संतोष अनासने, रमेश गायकवाड, डॉ. अशोक ओळंबे, निशा ग्याराल यांच्यासह गजानन चव्हाण, पुणेश अग्रवाल, मुन्ना उकडे, गजानन बोराडे, राजेश पिंजरकर, दिनेश गडीकर, स्वप्निल देशमुख, समर्थ शर्मा, पवन पवार, देविदास बोदळे, अनंत साबदे, महेश बगैरे, गोटू अग्रवाल, सचिन भटकर, रंजनी आसोले, पंकज बाजोड, सचिन उज्जैनकर, ज्ञानेश्वर बोदळे, सुनील उंबरकर, गोपाल बनाईत, विजय भटकर, फिरोज खान पठाण, रवी मडावी, आदेश शिंगारे, आशिष वाघमारे, निलेश ठाकरे, विशाल धोटे, विकास रामटेके, भारती निम, सोनू मिश्रा, पवनेश अग्रवाल आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेना भविष्यातही सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या न्याय्य हक्कांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे अनिल मालगे यांनी दिली.

# 'प्रभात' मध्ये सीबीएसई शिक्षकांची संगणक व कृत्रिम बुध्दीमत्तेवर संशोधन पेपर्स कार्यशाळा उत्साहात

■ प्रतिनिधी | अकोला ■

सीबीएसई संलग्न शाळांमधील शिक्षकांसाठी पुण्याच्या 'सीबीएसई सेंटर ऑफ एक्सलन्स' यांच्या वतीने प्रभात किड्स स्कूल तर्फे आयोजित जिल्हास्तरीय शैक्षणिक संशोधन कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली. अशा 'कार्यशाळेचे आयोजन हे शिक्षणाची उत्तम गुणवत्ता विकसित करण्यासाठी, शिक्षकांच्या संशोधन वृत्तीला व कार्याला प्रेरणा देणारे आहे', असे विचार या कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक व परीक्षक म्हणून उपस्थित असलेले अकोल्याच्या श्री. शिवाजी महाविद्यालयातील विज्ञान विद्याशाखेचे प्रा.डॉ. नितीन मोहोड यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी व्यासपीठावर प्रभात किड्स स्कूलचे संस्थापक संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, प्राचार्या वृषाली वाघमारे, तज्ज्ञ परीक्षक प्रा.डॉ. दत्तात्रय विद्यासागर व प्रा. शारदा देशमुख उपस्थित होते. प्रभात तर्फे सर्व तज्ज्ञ परीक्षकांचा यथोचित सन्मान करण्यात आला.



आपल्या प्रास्तविकात प्राचार्या वृषाली वाघमारे म्हणाल्या की, 'जिल्हास्तरीय शैक्षणिक संशोधन विचारमंथन कार्यशाळा (डीएलडी) ही जिल्हास्तरीय शैक्षणिक समुदायाच्या उत्तम संशोधन कार्याला चालना देणारी आणि नावीन्यपूर्ण प्रयोगशीलतेला सशक्त करणारी आहे'.

'संगणकीय विचार प्रक्रिया आणि कृत्रिम बुध्दिमत्तेचे आकलन' या वर्तमान शैक्षणिक प्रणालीतील कार्यशाळेत जिल्ह्यातील सात सीबीएसई शाळांमधील शिक्षकांनी सक्रिय सहभाग नोंदविला आणि कार्यशाळेच्या 'थिम' च्या संदर्भात गुणवत्तापूर्ण संशोधन पेपर्सचे सादरीकरण केले. या सहभागींमध्ये सचिन खेर्डेकर व अभिषेक जोशी (ज्युबिली इंग्लिश हायस्कूल, कुंभारी); मीतल भट्ट (आर.डी.जी. पब्लिक स्कूल); रश्मी शेंडे व अंजलीदेवी तुपे (स्कूल ऑफ स्कॉलर्स, कौलखेड); शाकीब अहमद खान व कविता सुपतकर (नोएल स्कूल); रिना पिल्लेवार व पूनम नंद (कोठारी कॉन्व्हेंट); प्रिया आर. शर्मा व व भाग्यश्री झटाले (प्रभात किड्स स्कूल) आणि किशन झा व अश्विनी आढे (पोदार इंटरनॅशनल स्कूल) यांचा सहभाग होता. प्रस्तुत कार्यशाळेत मार्गदर्शन व मूल्यांकन प्रक्रियेत प्रा.डॉ. नितीन मोहोड, प्रा.डॉ. दत्तात्रय विद्यासागर आणि प्रा. शारदा देशमुख यांनी कार्य् केले. कार्यशाळेचे संयोजन नोडल ट्रेनिंग को-ऑर्डीनेअर प्रा. प्रशांत होळकर यांनी तर संचालन समीर कुळकर्णी यांनी केले.

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६६७/२०२६ — प्रोसेस नं.५४९६/२०२६

चौ.ता. १८/०६/२०२६ — दिनांक : २२/०४/२०२६

**अर्जदार :** १. मनिष पुरूषोत्तम देशमुख २. उर्वशी मनिष देशमुख ३. शाहु मनिष देशमुख सर्व रा. खेडकर समाज मंदिराजवळ, मोरेश्वर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : योगिता मनिष देशमुख

**पत्ता :-** रा. खेडकर समाज मंदिराजवळ, मोरेश्वर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत योगिता मनिष देशमुख यांचे दि. ०७/०३/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# खनिज विकास प्रतिष्ठानच्या बैठकीत विकास कामांवर चर्चा

## शैक्षणिक व पायाभूत सुविधांना प्राधान्य द्यावे समितीचे निर्देश

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा खनिज विकास प्रतिष्ठानच्या निधीतून शैक्षणिक व पायाभूत सुविधांची कामे राबवण्यात यावे, असे निर्देश जिल्हा खनिज विकास प्रतिष्ठानच्या बैठकीत आज देण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात ही बैठक झाली. खासदार अनुप धोत्रे, आमदार हरीश पिंपळे, आमदार नितीन देशमुख , आमदार साजिदखान पठाण, जिल्हाधिकारी वर्षा मीना, जिल्हा खनीकर्म अधिकारी विशाल धांडे आदी उपस्थित होते. खनिज विकास निधीतून निधीतून अधिकाधिक लोकहिताची कामे राबविण्याचे निर्देश आज झालेल्या बैठकीत देण्यात आले. बैठकीत प्राप्त २६८ विकास कामांच्या प्रस्तावांवर यावेळी चर्चा करण्यात आली. शैक्षणिक व पायाभूत सुविधांसाठी प्राधान्य द्यावे. शाळांमध्ये डिजिटल स्मार्ट वर्ग खोल्या निर्माण करण्याचा प्रस्ताव आहे. एकूण २० कोटी रु. निधीतून शैक्षणिक व पायाभूत सुविधांची कामे राबविण्यात येणार आहेत. शाळा दुरुस्ती, जलशुद्धीकरण यंत्रणा, रस्ते विकास आदी विवीध विकास कामांच्या प्रस्तावावर चर्चा झाली. व्यापक लोकहिताच्या व आवश्यक कामांना प्राधान्य द्यावे, असे आदेश समिती सदस्यांनी यावेळी दिले.

# शेतकरी मित्र मंडळाची आमसभा संपन्न



■ प्रतिनिधी | अकोला ■

कास्तकारांच्या विकासासाठी सेवारत असणाऱ्या शेतकरी मित्र मंडळाची आमसभा मोठ्या उत्साहात संपन्न झाली.स्थानीय रत्नम लॉन्स येथे शेतकरी मित्र मंडळाचे अध्यक्ष विनोद साखरकर यांच्या अध्यक्षतेत संपन्न झालेल्या या आमसभेत प्रमुख पाहुणे म्हणून कृषी विभागाच्या आत्म्याचे संचालक शेगोकार होते. तर मंचावर मंडळाचे कोषाध्यक्ष संचालक शिवहरी पारस्कर,मंडळाचे जेष्ठ संचालक सुरेश मुंदडा उपस्थित होते.सर्वप्रथम मंडळाचे संचालक अरविंद देशमुख यांनी उपस्थितांचे स्वागत केले. ज्येष्ठ संचालक सुरेश मुंदडा यांनी प्रास्ताविक करून संस्थेच्या सोळा वर्षाच्या स्थापनेपासून तर आतापर्यंत केलेल्या कार्याची माहिती दिली. संस्थेचे ब्रीद वाक्य संवादातून समृद्धी हे असून या संकल्पनेच्या माध्यमातून मंडळ कास्तकारात संवाद साधून मंडळाच्या माध्यमातून कृषी क्षेत्र समृद्ध व विकसित करण्याचा प्रयत्न असून कास्तकारांचा सामूहिक संवाद हा प्रगतीचा मार्ग असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळीसन २५-२६ चा वार्षिक कामकाजाचा ताळेबंद हिशोब संचालक सतीश देशमुख यांनी सादर करीतयावर चर्चा होऊन त्यानंतर एकमताने प्रस्तावाना मंजुरात देण्यात आली.यावेळी मंडळाचे संचालक सुनील मोडक यांनी आपल्या शेतात उत्कृष्ट खरबूज उत्पादन घेतल्याबद्दल त्यांचा सभेत कृषी विभाग व मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मोडक यांनी आपल्या खरबूज उत्पादनाची संपूर्ण माहिती सादर करीत कास्तकरांनी नगदी उत्पन्न देणाऱ्या पिकावर ही आपले लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले.आपल्या अध्यक्षीय मनोगतात मंडळाचे अध्यक्ष साकरकर यांनी आपले विचार व्यक्त करीत कृषी विद्यापीठाचे कुलगुरू यांना मंडळाच्या सदस्य कास्तकारांच्या मार्गदर्शनासाठी निमंत्रित करण्याचा प्रयत्न सुरू असून त्यांच्या मार्गदर्शनाचा भरपूर लाभ कास्तकारांना घेता येणार आहे.कास्ततकारांनी आधुनिक पद्धती व तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या शेतात अधिक उत्पन्न घेऊन आर्थिक समृद्धी निर्माण करण्याचे आवाहन केले. यावेळी आत्म्याचे संचालक शेगोकार यांनी उपस्थित कास्तकारांना मार्गदर्शन करीत एल निनो मुळे कापूस व अन्य पिकावर होणारा दुष्परिणाम व त्यावर कसा मार्ग काढावा याची कास्तकारांना जाणीव करून दिली.

# महाराणा प्रताप जयंती निमित्त रंगरंगोटी

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराणा प्रताप सेवा समिती आणि सकल राजपूत समाजाच्या संयुक्त विद्यमाने दि १७ जून रोजी महाराणा प्रताप जयंती आयोजित करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर शहरात अत्यंत जल्लोषात तयारी सुरू झाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या महाराणा प्रताप बागेची रंगरंगोटी, दुरुस्ती आणि विशेष म्हणजे महाराणा प्रताप यांच्या पुतळ्याला हार व पूजा करण्यासाठी आवश्यक असलेल्या व्यासपीठचे काम मनपा कडून अत्यंत वेगाने सुरू करण्यात आले आहे.

या महत्त्वपूर्ण कामासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे स्थायी समिती सभापती व माजी महापौर विजय अग्रवाल यांच्या प्रयत्नांमुळे व आयुक्त, महापौर, उपमहापौर, संबंधित विभागाचे नगरसेवक यांच्या सहकार्यामुळे हे काम तातडीने सुरू झाले आहे.या सेवेबद्दल समितीच्या वतीने मनपा प्रशासनाचे आभार मानले.

**Change In Name**

I Have Changed My Name From **ARYA GOPAL AGRAWAL** -TO- **AARYA GOPAL AGRAWAL** Passport No :- N8372481 My Residential Address in:- Balaji Niwas , Ram Nagar, Behind LRT College,Akola 444001

**Change In Name**

have change my mother name From **Sabera bano** -To- **Sabera parveen Mohammad Hanif** Address- Akola Naka Ansari colony Shelad Balapur, Akola, Maharashtra -444302 Passport No :- S2867753

**Change In Name**

I Have Changed My Name From **ANANTA GAYGOLE** -TO- **ANANTKUMAR BHIMRAO GAYGOLE** My Residential Address in:- Near Narsing Mandir Akot Akola 444101

**Change In Name**

I Have Changed My Name From **VIJAYA GAYGOLE** -TO- **VIJAYALAXMI ANANTKUMAR GAYGOLE** My Residential Address in:- Near Narsing Mandir Akot Akola 444101

**Change In Name**

I Have Changed My Name From **SAIYAD ISMAEL SAIYAD MUNAF** -TO- **SYED ISMAIL SYED MUNAF** Passport No :- M0788802 My Residential Address in:- Khangar Pura, Kalal ki Chal, Mominpura, Akola 444001

**Change In Name**

I Have Changed My Name From **SAMINA ANJUM SAIYAD ISMAEL** -TO - **SAMEENA ANJUM SYED ISMAIL** Passport No :- M0788802 My Residential Address in:- Khangar Pura, Kalal ki Chal, Mominpura, Akola 444001

**Change In Name**

Old Name- **ASHA ARJUN SHIRSAT** After Marriage. Changed To My New. NAME IS. New Name - **ASHA SANDIP PAHURKAR.** Add BHIM MAGAR OLD CITY. AKOLA 444001. Par NOTED REG. AS par Notary. No Reg Page -· No 56 sr No 298/26 Date 08/06/06/26

## अकोला महानगरपालिका, अकोला
## विद्युत विभाग

**निविदा सुचना क्र. ०१, (सन २०२६-२७)**

अकोला महानगरपालिकेच्या विद्युत विभागा मार्फत आमदार निधी (२०२५-२६) अंतर्गत प्रभाग क्र. २० खडकी छत्रपती शाहू नगर येथील छत्रपती शाहु महाराज उद्यान मधील खुल्या भुखंडावर सोलर हायमास्ट लाईट बसवणे. या कामा करीता सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) महाराष्ट्र शासन यांचे कडे नोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडुन निविदा मागविण्यात येत आहे. संबंधीत इच्छुकांनी विस्तृत माहीती करीता खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal https://amcakola.in

**शहर अभियंता**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमपा/विद्युत/४१/२०२६, विद्युत विभाग
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : १२/०६/२०२६

## जाहीर नोटीस

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७९५/२०२६ — प्रोसेस नं.७४१२/२०२६

चौ.ता. १५/०७/२०२६ — दिनांक : १०/०६/२०२६

**अर्जदार :** १. निर्मलाबाई अजितेस दास २. संजय अजितेस दास ३. सविता अजितेस दास ४. संदिप अजितेस दास ५. शेखर अजितेस दास सर्व रा. संजय नगर, हसन किराणा जवळ, नायगाव, अकोट फैल रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : अजितेस केदास दास

**पत्ता :-** रा. व्दारा निर्मलाबाई अजितेस दास रा. संजय नगर, हसन किराणा जवळ, नायगाव, अकोट फैल रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अजितेस केदास दास यांचे दि. १७/११/२०२० रोजी अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारचीहरकत असल्यास दिनांक १५/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार** अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ५७/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** नालंदा बुद्ध विहार वल्लभनगर ता. जि. अकोला

**अर्जदार :-** श्री.विजय यशवंतराव वानखडे रा. सांघवी ता.जि.अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत. १) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? अ) जंगम मिळकत (वर्णन) :- १०००/-संस्थेचे अध्यक्ष यांचे जवळ जमा आहे.

आ) स्थावर मिळकत (वर्णन) : मोजे-वल्लभनगर ता. जि. अकोला येथील मालमत्ता क्रमांक ४२८ क्षेत्र - 100x100=10000 चौ.फुट या पैकी 27x33=891 चौ.फुट या जागेवर नालंदा बुद्ध विहाराचे बांधकाम व खुली जागा तसेच(नवीन बांधकाम 20x25=500 व खुली जागा ८६०९ चौ.फुट) चतु:सीमा पुर्व :-सरकारी रस्ता पश्चीम :- सरकारी रस्ता उत्तर :- सरकारी रस्ता दक्षिण :-देवदास कालुजी वानखडे यांचे घर स्थावर मालमत्तेची किंमत : ३,००,०००/-(तीन लाख रुपये फक्त).

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक ०९/०६/२०२६ रोजी दिली.

शिक्का — **अधिक्षक** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९८/२०२६ — प्रोसेस नं.६२०/२०२६

चौ.ता. २०/०७/२०२६ — दिनांक : ११/०६/२०२६

**अर्जदार :** १. पंचफुला श्रीकृष्ण जांभळे -वय ६२ वर्षे, धंदा घरकाम २. लक्ष्मी बिहारीलाल बेठेकर -वय ४३ वर्षे, धंदा-शेती ३. गुलाबीबाई हिरामन मावसे- वय ७६ वर्षे, धंदा-घरकाम अर्जदार क्र. १ व ३ रा. पिंपरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क्र. २ रा. सावलीखेडा, ता. धारणी, जि. अमरावती

**.. विरूध्द..**

**गैरअर्जदारः -** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ३ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. १ व २ चे वडील व अर्जदार क. ३ चे पती मयत नामे हिरामन जाजु मावसे हे दि. २२/०३/२०२६ रोजी मौजे पिंपरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मयत झाले आहे त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २०/०७/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ११/०६/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का — **आदेशानुसार** सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, क स्तर, तेल्हारा

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९५/२०२६ — प्रोसेस नं.६०४/२०२६

चौ.ता. २०/०७/२०२६ — दिनांक : ०९/०६/२०२६

**अर्जदार :** १. लक्ष्मण हुबलाल सावळकर -वय ५२ वर्षे, धंदा- शेती २. मौजीलाल हुबलाल सावलकर -वय ५७ वर्षे, धंदा-शेती ३. भोरजनी रामकिसन कास्देकर -वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम ४. सुंदरबाई मांगीलाल जामुनकर- वय ६५ वर्षे, धंदा-घरकाम ५. लिला जागेश्वर पिंपळकार - वय ४८ वर्षे, धंदा-घरकाम अर्जदार क. १ व २ रा. बिरोटी, पोस्ट, सावलीखेडा, जि. अमरावती अर्जदार क्र. ३ रा. गोलाई, सावलीखेडा, जि. अमरावती अर्जदार क्र. ४ रा. दादरा, हिराबामबाई, जि. अमरावती अर्जदार क्र. ५ रा. बारी भैरवगड, ता. तेल्हारा, जि. अकोला.

**.. विरूध्द..**

**गैरअर्जदारः -** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ५ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार यांचे वडील मयत नामे हुबलाल काल्या सावलकर हे दि. २३/०४/२०२० रोजी मौजे बारूखेडा, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मयत झाले आहे त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २०/०७/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०९/०६/ २०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का — **आदेशानुसार** सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, क स्तर, तेल्हारा

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९४/२०२६ — प्रोसेस नं.६०३/२०२६

चौ.ता. २०/०७/२०२६ — दिनांक : ०९/०६/२०२६

**अर्जदार :** १. रामफल जयराम जांबेकर -वय ५० वर्षे, धंदा-शेती २. बुलई मोती जांबेकर -वय ७० वर्षे, धंदा-घरकाम ३. सलिता मिश्रलाल भिलावेकर -वय ४० वर्षे, धंदा - घरकाम ४. प्रल्हाद जयराम जांबेकर -वय ३८ वर्षे, धंदा-शेती ५. प्रकाश मोतीराम जांबेकर- वय ३९ वर्षे, धंदा-शेती अर्जदार क्र. १ रा. धाराकोट, धारणी, जि. अमरावती, ह.मु. बोरव्हा, ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क्र. २ रा. धोधरा, ता. धारणी, जि. अमरावती अर्जदार क. ३ रा. बिजुधारवडी, ता. धारणी, जि. अमरावती अर्जदार क. ४ रा. धाराकोट, धारणी, जि. अमरावती अर्जदार क. ५ रा. धोधरा, पो. तितंबा, ता. धारणी, जि. अमरावती

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ५ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. १,३,४ व ५ चे आजोबा व अर्जदार क्र. २ चे सासरे मयत नामे खंगरू चिनु जांभेकर (कोरकु) हे दि. ०२/०९/१९७७ रोजी मौजे बोरव्हा, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मयत झाले आहे त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २०/०७/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०९/०६/ २०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का — **आदेशानुसार** सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, क स्तर, तेल्हारा

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १८९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# जांभळांचा अभूतपूर्व सडा;निसर्ग देतोय दुष्काळाचा,धोक्याचा इशारा

**आजनसरा/जनमाध्यम**

यंदा परिसरातील बाजारपेठा, रस्त्याकडेला असलेली झाडे आणि शिवारातील माळराने जांभळांनी अक्षरशः निळसर-जांभळ्या रंगाने नटली आहेत. गेल्या अनेक दशकांत न पाहिलेला जांभळांचा हा सडा नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. मागील वर्षी तुरळक फळे देणारी झाडेसुद्धा यंदा फळांनी अक्षरश लदबदून गेली आहेत. मात्र हा केवळ निसर्गाचा चमत्कार नसून येणाऱ्या दुष्काळाचा गंभीर इशारा असल्याची चर्चा जाणकारांमध्ये सुरू आहे.

वनस्पतीशास्त्रात या प्रक्रियेला मास्टिंग किंवा स्ट्रेस फ्रुटिंग असे संबोधले जाते. जांभळाच्या झाडाची मुळे जमिनीत तब्बल २० ते ३० फूट खोलवर जातात. भूगर्भातील पाण्याची पातळी झपाट्याने खाली गेली की झाडावर पाण्याचा तीव्र ताण निर्माण होतो. अशा वेळी झाड स्वतःच्या



अस्तित्वासाठी झागडत बचावात्मक स्थिती'त प्रवेश करते. नवीन पालवी, फांद्या वाढविण्याऐवजी संपूर्ण ऊर्जा फक्त फळे आणि बिया निर्माण करण्यावर खर्च केली जाते. त्यामुळे झाडांवर प्रचंड प्रमाणात फळधारणा दिसून येते. यालाच तज्ज्ञ सुसाईड फ्रुटिंग किंवा बंपर क्रॉप असेही म्हणतात.

ज्या वर्षी जांभळांचा असा सडा पडतो, त्या वर्षी दुष्काळ पडतो, हे ग्रामीण भागातील पूर्वजांचे निरीक्षण आज विज्ञानानेही मान्य केल्याचे जाणकार सांगतात. हवामानातील बदल, जमिनीतील ओलाव्याची घट आणि भूजल पातळीतील ताण झाडांना मानवापेक्षा खूप आधी जाणवतो. त्यामुळे निसर्ग आधीच संकटाची चाहूल देत असल्याचे चित्र आहे.

तज्ज्ञांच्या मते, यंदाची जांभळे आकाराने लहान, तुरट आणि कमी रसाळ असतील तर तो स्ट्रेस फ्रुटिंग चा स्पष्ट संकेत मानला जातो. याचा अर्थ आगामी काळात पाणीटंचाई आणि कडक उन्हाळ्याचा सामना करावा लागू शकतो. मात्र फळे मोठी, गोड आणि रसाळ असतील तर ती दर काही वर्षांनी येणाऱ्या नैसर्गिक मास्टिंग सायकल चा भाग असू शकतात.एकीकडे जांभळांचा हा सडा डोळ्यांना सुखावणारा असला, तरी दुसरीकडे निसर्गाचा गंभीर इशारा म्हणून त्याकडे पाहण्याची गरज आहे. स्वतःचे अस्तित्व धोक्यात आले तरी पुढच्या पिढीसाठी बीज जपणाऱ्या या वृक्षांचा संदेश स्पष्ट आहे , पाणी जपा, निसर्ग वाचवा; अन्यथा उद्याचा दुष्काळ दारात उभा आहे.

## चीनमध्ये पंकज टाकोणे यांची वर्ल्ड स्कूल गेम्ससाठी सहाय्यक प्रशिक्षकपदी निवड



**वर्धा/जनमाध्यम**

कर्तव्य आणि क्रीडा यांचा सुंदर मेळ साधत वर्धा पोलिस दलातील पोलीस कर्मचारी पंकज टाकोणे यांनी आणखी एक मानाचा टप्पा गाठला आहे. चीनमध्ये होणाऱ्या प्रतिष्ठित वर्ल्ड स्कूल गेम्स चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी भारतीय व्हॉलीबॉल संघाच्या सहाय्यक प्रशिक्षकपदी त्यांची निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीमुळे वर्धा जिल्हा पोलिस दलासह संपूर्ण जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

३० जून ते १० जुलै २०२६ दरम्यान शेंगलू (चीन) येथे ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा रंगणार आहे. पोलिस सेवेत कार्यरत असतानाच व्हॉलीबॉल क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पंकज टाकोणे यांनी राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी छाप निर्माण केली आहे. शिस्त, मेहनत आणि खेळावरील निष्ठेच्या बळावर त्यांनी ही मानाची संधी मिळवली आहे. ग्रामीण भागातील होतकरू खेळाडूंना घडविण्यातही त्यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते.

## जि.प. शिक्षण विभागाला मिळणार नवीन ४३ केंद्र प्रमुख

### विभागीय स्पर्धा परीक्षेतून गुणवत्ताधारक शिक्षकांची होणार नियुक्ती

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्हा परिषद शिक्षण विभागांतर्गत एकूण ८७ केंद्र प्रमुख पदे असून प्रत्येक केंद्रासाठी एक केंद्र प्रमुख कार्यरत असतो. यापैकी ४४ केंद्र प्रमुख पदे सेवाज्येष्ठतेनुसार भरली जातात. तर उर्वरित ४३ पदे विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे गुणवत्ताधारक शिक्षकांमधून भरली जाणार आहे.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार केंद्र प्रमुख पदभरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. १० जून २०२६ रोजी जिल्हा परिषद शिक्षण विभाग वर्धा येथे १०२ उमेदवारांची कागदपत्र पडताळणी प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. संबंधित उमेदवारांच्या शैक्षणिक व सेवा विषयक कागदपत्रांची सखोल तपासणी करण्यात आली. कागदपत्र पडताळणीनंतर पात्र, ठरलेल्या उमेदवारांची अंतिम यादी जाहीर करण्यात आली. १५ जून २०२६ रोजी समुपदेशन प्रक्रियेद्वारे ४३ केंद्र प्रमुख पदांसाठी नियुक्ती देण्यात येणार आहे. या प्रक्रियेमुळे जिल्ह्यातील शैक्षणिक व्यवस्थापन अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

**शैक्षणिक क्षेत्राला अनुभवी, सक्षम नेतृत्व**

विभागीय स्पर्धा परीक्षेतून गुणवत्ताधारक शिक्षकांना केंद्र प्रमुख म्हणून संधी मिळत असल्याने जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राला अनुभवी व सक्षम नेतृत्व प्राप्त होईल. यामुळे शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासकीय कार्यक्षमता, शिक्षकांमधील प्रेरणा तसेच शाळांमधील समन्वयामध्ये लक्षणीय सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**विद्यार्थी गुणवत्ता समृद्ध होईल**

वर्धा जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने अत्यंत सुरेख व प्रभावी असे नियोजन करीत ही प्रक्रिया कालमर्यादीत वेळत राबवत महाराष्ट्रामध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या नेतृत्वात शिक्षण विभागाने केलेल्या सुरेख नियोजनामुळे वर्धा जिल्हा परिषदेला आता नव्या दमाचे तरुण ४३ क्षेत्रीय अधिकारी मिळत आहे. यामुळे संपूर्ण जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात गतिमानता प्राप्त होईल व त्यामुळे विद्यार्थी गुणवत्ता समृद्ध होईल असा विश्वास शिक्षक संघटना प्रतिनिधी, शिक्षक व पालक वर्गाकडून व्यक्त केला जात आहे.

## रमेश निमसडकरांचा महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित

**वर्धा/जनमाध्यम**



सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ऑल इंडिया समता सैनिक दलाचे विदर्भ सचिव रमेश निमसडकर यांना परभणी येथे महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. जय हिंद सेवाभावी संस्थेच्या वतीने आयोजित या सोहळ्यात त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

ऑल इंडिया समता सैनिक दल च्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून रमेश निमसडकर हे ग्रामीण भागातील विद्यार्थी, महिला, दलित, पीडित, शोषित, आदिवासी तसेच पारधी बेड्यातील मुलांसाठी सातत्याने कार्यरत आहेत. शिक्षण, प्रबोधन आणि सामाजिक जागृतीच्या माध्यमातून महामानवांच्या विचारांचे बीज पेरण्याचे काम त्यांनी खेड्यापाड्यात जाऊन केले आहे.परभणी येथील ज्ञानोपासक महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्याला अध्यक्ष म्हणून सत्तार इनामदार उपस्थित होते. उद्घाटक म्हणून माजी मंत्री गणेश दुधगावकर यांनी उपस्थिती लावली. प्रमुख अतिथी म्हणून परभणीचे उपमहापौर गणेश देशमुख, समाजचळवळीचे अभ्यासक आर. डी. मगर तसेच सुप्रसिद्ध साहित्यिक व कवी इमरान राही उपस्थित होते.

विद्यार्थ्यांसाठी शिबिरे, विचारवेध प्रज्ञा स्पर्धा परीक्षा, करिअर मार्गदर्शन, शालोपयोगी साहित्य वितरण तसेच तत्वज्ञ आणि विचारवंतांच्या मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करून शिक्षणाचा पाया भक्कम करण्यासाठी रमेश निमसडकर सातत्याने कार्यरत आहेत.हा पुरस्कार मिळाल्याबद्दल मुख्याध्यापक अनिल खडतकर, आदर्श शिक्षक सुनील बाभळे, प्राचार्य विनोद जवादे, ॲड. निखिल बुरबुरे, आंबेडकरी विचारवंत अशोक बुरबुरे, रचना नगराळे, डॉ. माधवी पाटील, प्रणिता खैरकर, वैशाली भगत, महेंद्र मुनेश्वर, रंजना वासे, उज्वला इंगोले यांच्यासह विविध सामाजिक, शैक्षणिक व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले.

## विरूळ ग्रामपंचायतीत जुनेच आरक्षण कायम

**विरूळ आकाजी/ जनमाध्यम**



ग्रामपंचायतीच्या आगामी निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या आरक्षण सोडतीत मागील पंचवार्षिकमधीलच आरक्षण कायम राहिल्याने अनेक इच्छुक उमेदवारांचा हिरमोड झाला आहे. आरक्षण बदलण्याची अपेक्षा असलेल्या अनेकांनी नाराजी व्यक्त केली असून गावातील राजकीय वातावरण मात्र चांगलेच तापले आहे.

ग्रामपंचायत कार्यालयात १२ जून रोजी वार्डनिहाय आरक्षण सोडतीचा कार्यक्रम पार पडला. पंचायत समितीचे विस्तार अधिकारी गोपाल चौधरी यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. मात्र, नव्याने संधी मिळेल, या आशेवर तयारी करणाऱ्या अनेक इच्छुकांना जुनेच आरक्षण कायम राहिल्याने निवडणुकीच्या रिंगणाबाहेर राहण्याची वेळ आली आहे.दरम्यान, काही दिवसांत ग्रामपंचायत निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता असल्याने सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. सरपंचपद महिला आरक्षणासाठी राखीव झाल्याने विविध गटांकडून सक्षम महिला उमेदवाराच्या शोधाला वेग आला आहे.गावातील निवडणूक यंदा प्रतिष्ठेची ठरणार असून खासदार गट आणि आमदार गट यांच्यात थेट सामना रंगण्याची चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे विरूळच्या राजकारणात आगामी काळात चुरस वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## शिवविचारांच्या व्यासपीठावर प्रयासी डंभारेची बाजी



**वर्धा/जनमाध्यम**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर रुजावेत या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज राज्यभिषेक सोहळा समितीतर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मातोश्री सभागृह, वर्धा येथे ५ जून २०२६ रोजी झालेल्या या स्पर्धेत विविध वयोगटातील स्पर्धकांनी प्रभावी वक्तृत्वाची छाप पाडली.

७ ते १७ वयोगटात जयभीम धम्मशाळेची विद्यार्थिनी प्रयासी डंभारे हिने प्रथम क्रमांक पटकावत सर्वांचे लक्ष वेधले, तर मैत्री रामटेके हिने द्वितीय क्रमांक मिळविला. १८ ते २५ वयोगटात बजाज विज्ञान महाविद्यालयाची विद्यार्थिनी भूमिका चौबे हिने प्रथम पुरस्कारावर नाव कोरले.स्पर्धेचे परीक्षण प्रसिद्ध निवेदक साहिल दरणे आणि कौस्तुभ पाचडे यांनी केले. वक्तृत्वातील आशय, सादरीकरण आणि शिवचरित्रावरील अभ्यास या निकषांवर स्पर्धकांचे मूल्यमापन करण्यात आले.स्पर्धेचा पुरस्कार वितरण सोहळा १४ जून २०२६ रोजी मातोश्री सभागृहात उत्साहात पार पडला. यावेळी जगदंब ढोल ताशा पथकाचे संस्थापक उज्वल ठाकरे, शिवसंकल्प बहुद्देशीय संस्थेचे संस्थापक प्रतिक पवार, ओम भेदुरकर, साहिल दरणे, कार्तिक खडतकर, सोनाली शेटे आणि प्रसाद कोटगीरवार आदी मान्यवर उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव'शिबिरातून आरोग्य तपासणी



**आर्वी/जनमाध्यम**

ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहावे, विविध आजारांवर वेळेत उपाययोजना व्हाव्यात तसेच शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ प्रत्येक घरापर्यंत पोहोचावा या उद्देशाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानांतर्गत आदर्श ग्राम संसद मिर्झापूर नेरी येथे विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. या ग्रामसभेला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच बाळासाहेब सोनटक्के उपस्थित होते. यावेळी अभ्रक लिंग तपासणी व मुलगा हवा हा हट्ट टाळण्याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच अनारोग्यदायी खाद्यपदार्थ टाळून भरड धान्याचा आहारात समावेश करण्याचे आवाहन करण्यात आले.पावसाळ्यापूर्वी विशेष आरोग्य शिबिर घेऊन राष्ट्रीय डेंगू दिन साजरा करणे, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग व कर्करोगाबाबत जनजागृती करणे, तीस वर्षांवरील व्यक्तींचे मुख, स्तन व गर्भाशय ग्रीवाच्या कर्करोगाचे स्क्रीनिंग करणे, आरबीएसके पथकाद्वारे अंगणवाडीतील बालकांची आरोग्य तपासणी करणे आदी महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.ग्रामसभेत धुरमुक्त गाव संकल्पना, कचऱ्याचे वर्गीकरण, ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत निर्मिती तसेच किशोरवयीन मुली व महिलांच्या हिमोग्लोबिन तपासणीवरही भर देण्यात आला.

# शॉर्टसर्किटने गरीब शेतकऱ्याच्या संसाराची राख

### मोटारपंप, स्प्रिंकलर पाईप, खते-बियाणे जळून खाक; लाखोंचे नुकसान

**साहूर/जनमाध्यम**

मौजा धाडी येथील गरीब शेतकरी माणिकसिंग चरणसिंग भादा यांच्या शेतातील गोठ्याला रविवारी दुपारी भीषण आग लागून मोठे नुकसान झाले. या आगीत मोटारपंप, स्प्रिंकलरचे पाईप, रासायनिक खते, बियाणे तसेच इतर शेती साहित्य जळून खाक झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसून जनावरेही सुरक्षित असल्याची माहिती मिळाली आहे.



ही घटना रविवारी दुपारी पावणेदोन वाजताच्या सुमारास घडली. प्राथमिक माहितीनुसार, इलेक्ट्रिक शॉर्टसर्किटमुळे गोठ्याला आग लागली. सुरुवातीला लागलेली छोटी आग काही क्षणांतच भडकली आणि आगीने रौद्ररूप धारण केले. गोठ्यात साठवून ठेवलेले मोटारपंप, सुमारे १०० स्प्रिंकलर पाईप, बियाणे, रासायनिक खते व इतर शेती उपयोगी साहित्य पूर्णतः जळून खाक झाले.

या आगीत शेतकरी माणिकसिंग भादा यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. रविवार असल्याने अनेक प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी पोहोचू शकले नसल्याचे पीडित शेतकऱ्याने सांगितले.दरम्यान महसूल विभागाने तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करावा, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अहवाल सादर करून नुकसानभरपाई त्वरित मंजूर करावी, अशी मागणी शेतकरी माणिकसिंग भादा यांनी केली आहे.

## संक्षिप्त

### बहिणीशी संवादावरून तरुणास मारहाण

**वर्धा** - समुद्रपूर तालुक्यातील तरोडा येथे बहिणीशी का बोलतो, या कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणास बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यश केजू आत्राम (रा. तरोडा) हा गावात असताना आरोपी अथर्व तिमांडे याने त्याच्याशी वाद घातला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि यश याला मारहाण करण्यात आली. घटनेनंतर जखमी तरुणाने पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

### घरात घुसून महिलेस मारहाण

**वर्धा** -पुलगाव शहरातील सुभाषनगर परिसरात घरात जबरदस्ती प्रवेश करून एका महिलेस मारहाण केल्याची घटना घडली. किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून आरोपीने महिलेस नखाने ओरबडून जखमी केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित २८ वर्षीय महिला आपल्या घरी असताना आरोपी आकाश चंडाले (रा. रामटेके ले-आऊट, पुलगाव) हा घरात घुसला. त्यानंतर दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. वाद वाढताच आरोपीने महिलेला शिवीगाळ करून मारहाण केली तसेच नखाने ओरबडून जखमी केले. या घटनेनंतर पीडित महिलेने पुलगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.

### गांजा ओढणाऱ्या युवकावर पोलिसांची कारवाई

**वर्धा** - हिंगणघाट शहरातील संत चोखोबा वॉर्ड परिसरात गांजा सेवन करणाऱ्या युवकाविरुद्ध पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईमुळे परिसरातील अवैध नशाविरोधी मोहिमेला गती मिळाली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख युसूफ शेख करीम शेख (रा. संत चोखोबा वॉर्ड, हिंगणघाट) हा सार्वजनिक ठिकाणी गांजा ओढत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपीस ताब्यात घेतले. चौकशीत त्याच्याकडे गांजाचे सेवन केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्याच्याविरुद्ध हिंगणघाट पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.अवैध अमली पदार्थांविरोधात पोलिसांची मोहीम पुढेही सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले.

### हद्दपार आरोपी आर्वी पोलिसांच्या ताब्यात

**आर्वी** - हद्दपारीचा आदेश असतानाही प्रतिबंधित क्षेत्रात वावर करणाऱ्या आरोपीस आर्वी पोलिसांनी अटक केली. या कारवाईमुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासन सतर्क असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अक्षय रमेश सत्पाळ (रा. खडकपुरा वॉर्ड, आर्वी) याच्यावर यापूर्वी हद्दपारीची कारवाई करण्यात आली होती. मात्र, कोणतीही अधिकृत परवानगी न घेता तो प्रतिबंधित क्षेत्रात फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपीस ताब्यात घेतले.या प्रकरणी आरोपीविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरात शांतता अबाधित राखण्यासाठी अशा कारवाया सातत्याने सुरू राहतील, असे पोलिसांनी सांगितले.

### आर्वी नाका भागात जुगार अड्डयावर छापा

**वर्धा** - आर्वी नाका परिसरातील झोपडपट्टी भागात सुरू असलेल्या जुगार अड्डयावर शहर पोलिसांनी धडक कारवाई करून रोख रकमेसह ६७ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे अवैध धंदे चालविणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी दादाराव मुळे यांच्या घरावर छापा टाकला. यावेळी काही जण जुगार खेळताना आढळून आले. कारवाईदरम्यान पोलिसांनी रोख ३ हजार २०० रुपये, मोबाईल फोन, एमएच ३२ एटी १९८९ क्रमांकाची दुचाकी व अन्य साहित्य जप्त केले.या प्रकरणी रुपेश प्रभाकर कळने, राजेश मुलायमसिंग चंदेल, दादाराव मुळे व बाबाराव मुळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## जाहीरनामा

**कोर्ट विद्यमान श्री समर्थ क्षिरसागर तहसिलदार, तथा तालुका दंडाधिकारी यांचे न्यायालय देवळी**

जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३)
अन्वये ज. मृ.नो.र.प्र.क्र. /२०२५-२६

ज्याअर्थी अर्जदार **श्री दिलीप गुलाबराव फुलमाळी रा. दिघी (बो.) ता. देवळी** जि. वर्धा यांचा **जन्म १५/०७/१९६९ रोजी मौजा दिघी (बो.) ता. देवळी येथे झाला असून जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३)** आणि महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम व फोजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २० चे पोटकलम (१) अंतर्गत अर्जदार यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत दिघी (बो.) ता. देवळी येथे उपलब्ध नसल्याने ग्रामपंचायत दिघी (बो.) ता. देवळी यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तिकेमध्ये नोंद घेण्याचा आदेश होणेबाबत त्यांचेव्दारे प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

त्याअर्थी सदर व्यक्तीच्या जन्माच्या नोंदीबाबत हितसंबंधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकती असल्यास ते त्यांनी निश्चित केलेल्या तारखेस स्वतः अथवा विधी व्यवसायीमार्फत किंवा मान्यता प्राप्त अभिकर्त्यांमार्फत हजर राहून १५ दिवसाचे आत सादर करावे. उक्त तारखेनंतर व ठिकाणी अशा रितीने हजर राहण्यास व हरकती निवेदन करण्यास कसूर केल्यास त्यानंतर प्राप्त कोणत्याही हरकती व आक्षेप विचारात घेण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १५/६/२०२६

**तहसिलदार**
**देवळी**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १९९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# १० महिन्यांत ५६८ वाहनचालकांवर कारवाई

## मॉडीफाय वाहनांवर आरटीओची धडक मोहीम

**अमरावती/प्रतिनिधीः-** वाहनांच्या मूळ रचनेत अनधिकृत बदल करून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांविरोधात अमरावती प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) धडक कारवाई मोहीम सुरू केली आहे. गेल्या दहा महिन्यांत मॉडिफाईड वाहने, कर्कश हॉर्न, सायरन आणि फटाका सायलेन्सर वापरणाऱ्या एकूण ५६८ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

आरटीओ प्रशासनाच्या माहितीनुसार, वाहन उत्पादक कंपनीकडून वाहन बाजारात आणताना त्याची रचना, रंग, आकार आणि तांत्रिक वैशिष्ट्ये निश्चित करण्यात आलेली असतात. या मूळ रचनेत परवानगीशिवाय बदल करणे हे मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन मानले जाते. मात्र, शहरात अनेक वाहनधारक दुचाकींचे सायलेन्सर बदलणे, वाहनांचा रंग बदलणे, मडगार्ड काढून टाकणे तसेच विविध आकर्षक पण नियमबाह्य फेरबदल करून वाहने रस्त्यावर चालवत असल्याचे आढळून आले आहे. विशेषतः पोलिसांच्या वाहनांप्रमाणे सायरन बसविणे, कर्कश आवाजाचे हॉर्न वापरणे आणि फटाका सायलेन्सर लावणे यामुळे ध्वनी प्रदूषण वाढण्याबरोबरच वाहतुकीत अडथळा निर्माण होत असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. अशा प्रकारांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेलाही



धोका निर्माण होत असल्याने आरटीओने विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. गेल्या दहा महिन्यांतील कारवाईत सुधारित (मॉडिफाईड) वाहनांवर ९७, कर्कश हॉर्न वापरणाऱ्या वाहनांवर २५१, सायरन बसवलेल्या वाहनांवर १५८ तर फटाका सायलेन्सर वापरणाऱ्या ६२ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहन तपासणी मोहिमेदरम्यान नियमबाह्य फेरबदल आढळून आल्यास मोटार वाहन निरीक्षकांकडून तत्काळ कायदेशीर कारवाई केली जात असल्याचे आरटीओने स्पष्ट केले आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी वाहनधारकांना इशारा देताना वाहनांमध्ये कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बदल टाळण्याचे आवाहन केले आहे. अन्यथा संबंधितांवर मोटार वाहन कायद्यानुसार कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. रस्ते सुरक्षा, वाहतूक शिस्त आणि ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी ही मोहीम आगामी काळात आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचे आरटीओ प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# कौटुंबिक वाद विकोपाला; मुलगा आणि सुनेकडून आईला मारहाण

## बडनेरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** कौटुंबिक वादातून स्वतःच्या आईलाच मारहाण केल्याची धक्कादायक घटना बडनेरा येथील अशोकनगर परिसरात उघडकीस आली आहे. या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी मुलगा आणि सुनेविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ५५ वर्षीय महिलेचा मुलगा आणि ३१ वर्षीय सून यांच्यात नेहमीच वाद होत असत. या वादामुळे काही दिवसांपूर्वी सून माहेरी निघून गेली होती. शनिवारी (दि. १३ जून) सकाळी साडेदहा वाजताच्या



सुमारास ती पुन्हा घरी परतल्यानंतर सासूने तिला, तू नेहमी माझ्या मुलासोबत भांडतेस, मग पुन्हा परत का आलीस? असा जाब विचारला. या प्रश्नावरून वातावरण तापले आणि मुलगा स्वतःच्या आईवरच संतापला. त्याने आईला घरातून निघून जाण्यास सांगितले. मात्र, हे घर माझे आहे, असे सांगत महिलेने विरोध दर्शविल्यानंतर आरोपी मुलाने तिचे केस पकडून जोरात ढकलले. त्यामुळे तिच्या उजव्या हाताला दुखापत झाली. दरम्यान, सुनेनेही सासूचे केस पकडून तिच्या डोक्यावर लाटण्याने वार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या मारहाणीमुळे जखमी झालेल्या महिलेने बडनेरा पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी मुलगा आणि सुनेविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला असून घटनेचा पुढील तपास सुरू आहे. कौटुंबिक वादातून आईवरच हात उगारल्याच्या या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# चालत्या रेल्वेतून उडी घेतल्याने पश्चिम बंगालचा युवक जखमी

## -दापोरी स्थानकाजवळील घटना

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** दापोरी रेल्वे स्थानकाजवळ चालत्या रेल्वेतून उडी मारल्याने पश्चिम बंगालमधील एका २५ वर्षीय युवकाला गंभीर दुखापत झाल्याची घटना शनिवारी (१४ जून) रात्री घडली. जखमी युवकावर सध्या जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

माहितीनुसार, भूपेश भागीरथ सरदार (वय २५, रा. पश्चिम बंगाल) हा युवक रेल्वे प्रवासादरम्यान चालत्या गाडीतून खाली पडला अथवा उडी मारल्याने गंभीर जखमी झाला. घटनेची माहिती मिळताच रेल्वे सुरक्षा बलाचे (आरपीएफ) कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी बचावकार्य सुरू केले. जखमी युवकाला प्रथम चांदूर रेल्वे उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार करण्यात आल्यानंतर त्याची प्रकृती गंभीर असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे आरपीएफ कर्मचाऱ्यांनी रात्री सुमारे १ वाजताच्या सुमारास उडी का मारली अथवा तो अपघाताने खाली पडला का, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. या घटनेचा



त्याला पुढील उपचारासाठी अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविले. सध्या युवकावर वैद्यकीय उपचार सुरू असून डॉक्टरांकडून त्याच्या प्रकृतीवर लक्ष ठेवण्यात येत आहे. दरम्यान, युवकाने चालत्या रेल्वेतून रेल्वे सुरक्षा बलाकडून तपास सुरू असून, घटनेमागील नेमके कारण शोधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. रेल्वे प्रवाशांनी प्रवासादरम्यान सुरक्षिततेचे नियम पाळावेत, असे आवाहनही यानिमित्ताने करण्यात आले आहे.

## परिशिष्ट-१ (प्रथम वेळ)

**महाराष्ट्र शासन**
**उपविभागीय कृषी अधिकारी यांचे कार्यालय,**
**पत्ता - तालुका फळ रोपवाटीका, परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती**
**ई-मेल - sdapacjp@gmail.com    दूरध्वनी कमांक - ०७२२३-२२०१५९**

### ई-निविदा सूचना कमांक बी-१-०४ ते ०५, सन २०२६-२०२७ (जलयुक्त शिवार २.०)

उपविभागीय कृषी अधिकारी अचलपूर महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाकडून खाली दर्शविल्याप्रमाणे कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahaetenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषी अधिकारी, अचलपूर/जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अमरावती यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| निविदा क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत रु. | ई-निविदा उपलब्ध कालावधी | निविदापुर्व बैठक दिनांक व वेळ | ई-निविदा उघडणे दिनांक | निविदा फॉर्म रक्कम | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| B1-04 | नविन सिमेंट कॉंक्रीट बांध खोलीकरणासह तयार करणे मौजे बाजारढाणा गट नं.१/१, १/२, ता.धारणी जि.अमरावती | २२४५२४९ | १३.०६.२०२६ ते २७.०६.२०२६ | दिनांक १८.०६.२०२६ सकाळी ११ वाजता उ.वि.कृ.अ. अचलपूर कार्यालय | २९.०६.२०२६ | ५६० | २२४५२ |
| B1-05 | नविन सिमेंट कॉंक्रीट बांध खोलीकरणासह तयार करणे मौजे धारणमहू गट नं.२/१ ३/१, ३/२ ता.धारणी जि.अमरावती | ४२२२३७८ | | | | ५६० | ४२२२४ |

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) http://mahaetenders.gov.in
(सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वपेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

२) उपविभागीय कृषी अधिकारी, अचलपूर कार्यालयातील सूचना फलक

स्वाक्षरी/-
उपविभागीय कृषी अधिकारी,
अचलपूर, जि.अमरावती

(वि.मा.का./अम/जाही/२५१/२०२६-२०२७)

## SRM e-Tender Notice No. T-06 (1st call)

MAHATRANSCO

MSETCL invites online bids for following e-tender. The Tender details are available at https://srmetender.mahatransco.in

| SRM Tender No. | Particulars of Tender | Estimated cost & EMD Amount | Download of Tender Document | Due Date | Technical & Commercial bid opening |
|---|---|---|---|---|---|
| SE/O&M/C/AMT/Bird Guard/Tech/2026-27/T-06 (1st Call) **RFx - 7000040327** | Work of Providing & Fixing of non-conductive Turbo Wind Driven Conical Bird Guards at various EHV lines under EHV O&M Division Amravati | 49,12,505/- & EMD Amount Rs. 49,125/- | From 13.06.2026 to 28.06.2026 (23:59 hrs) | 28.06.2026 upto 23.59 hrs. | 29.06.2026, 11:00 hrs. & 29.06.2026, 15:00 hrs. resp. (If possible). |

**Note:** Vendor's are requested to check our Mahatransco site for further tender refloating / updating, time to time.

**Contact No:** The O/o, The Superintending Engineer, EHV O&M, Circle Amravati- 0721-2661097.
The payment of Tender fee & EMD fee by online only.

Sd/-
**Superintending Engineer**
**EHV O&M Circle, Amravati.**

## जाहीर नोटीस

आम जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **प्रिती मंगेश रायबोले, रा.देवरी, पो.चमक, ता.अचलपूर, जि.अमरावती** यांनी **सैय्यद मन्सुर सैय्यद आलम, रा.बिसमिल्ला नगर, अमरावती, ता.जि.अमरावती** यांचे मालकीची व ताब्यातील मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन**

नोंदणी पोट तुकडी, अमरावती मौजा वडाळी, ता.जि. अमरावती येथील खसरा क्र.२६/३, २९/१, पं.ह.नं.५, हिल टॉप कॉलनी मधील प्लॉट नं. ८३ याची साईज ३० X ५० असून याचे एकूण क्षेत्रफळ १५०० चौ.फुट असून आहे, एम.बी.आर. पावती क्र.२२९ आहे, ज्याची चर्तुःसिमा :-

पुर्वेस - प्लॉट क्र.८२
पश्चिमेस - प्लॉट क्र.८४
उत्तरेस - रोड
दक्षिणेस - प्लॉट नं.१०७

सबब वरील वर्णन केलेल्या मालमत्ते बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध, कर्ज, गहाण, बोझा, बक्षिस, वारसा हक्क इत्यादी कोणत्याही प्रकारे हितसंबंध, पुर्वीचा करार, व्यवहार अथवा आक्षेप असल्यास त्यांनी खालील दिलेल्या पत्यावर ही जाहीर नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाचे आंत लेखी पुराव्यासहीत समक्ष संपर्क करावा व लेखी पोच घ्यावी. अन्यथा वरील मुदतीनंतर माझे पक्षकार मालमत्तेचे खरेदीखत नोंदवून घेतील. त्यानंतर कोणाचाही कुठल्याही प्रकारची हरकत अगर उजर चालणार नाही. कृपया आम जनतेने याची नोंद घ्यावी.

करिता सदरची जाहीर नोटीस

**दिनांक ११/०६/२०२६**
**अमरावती**

**शिक्का व सही**
**ॲड आदित्य देशमुख**
**मो.-९८५००९०१६८**

**2 BHK FLAT FOR SALE**

**भाग्य नगर**
**गणेडीवाल लेआउट**
**कॅम्प-अमरावती**
**-संपर्क-**
**9422190814**
**9518527395**

## जाहीर नोटीस

आम जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **प्रिती साहेबराव मोहेकर, रा.जसापुर, जि. अमरावती** यांनी **सैय्यद मन्सुर सैय्यद आलम, रा.बिसमिल्ला नगर, अमरावती, ता.जि.अमरावती** यांचे मालकीची व ताब्यातील मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन**

नोंदणी पोट तुकडी, अमरावती मौजा वडाळी, ता.जि. अमरावती येथील खसरा क्र.२६/३, २९/१, पं.ह.नं.५, हिल टॉप कॉलनी मधील प्लॉट नं. ८२ याची साईज ३० X ५० असून याचे एकूण क्षेत्रफळ १५०० चौ.फुट असून आहे, एम.बी.आर. पावती क्र.२२९ आहे, ज्याची चर्तुःसिमा :-

पुर्वेस - प्लॉट क्र.८१
पश्चिमेस - प्लॉट क्र.८३
उत्तरेस - रोड
दक्षिणेस - प्लॉट नं.१०६

सबब वरील वर्णन केलेल्या मालमत्ते बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध, कर्ज, गहाण, बोझा, बक्षिस, वारसा हक्क इत्यादी कोणत्याही प्रकारे हितसंबंध, पुर्वीचा करार, व्यवहार अथवा आक्षेप असल्यास त्यांनी खालील दिलेल्या पत्यावर ही जाहीर नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाचे आंत लेखी पुराव्यासहीत समक्ष संपर्क करावा व लेखी पोच घ्यावी. अन्यथा वरील मुदतीनंतर माझे पक्षकार मालमत्तेचे खरेदीखत नोंदवून घेतील. त्यानंतर कोणाचाही कुठल्याही प्रकारची हरकत अगर उजर चालणार नाही. कृपया आम जनतेने याची नोंद घ्यावी.

करिता सदरची जाहीर नोटीस

**दिनांक ११/०६/२०२६**
**अमरावती**

**शिक्का व सही**
**ॲड आदित्य देशमुख**
**मो.-९८५००९०१६८**

## वि.दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, यांचे न्यायालयातील

कि.दि.अ.क्र.१५९/२०२६    ने.ता.१३.०७.२०२६

**अर्जदार :**
१. चंद्रभागा विठोबा लोमटे (पत्नी), वय ७४ वर्षे, व्यवसाय - गृहिणी रा.सातरगांव, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती
२. भागीरथी माणिकराव बोरकर (मुलगी) वय ५८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी रा.ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती
३. पुरुषोत्तम विठोबा लोमटे (मुलगा), वय ५५ वर्षे, व्यवसाय - शेती रा.सातरगांव, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती
४. गोविंदराव विठोबा लोमटे (मुलगा), वय ५४ वर्षे, व्यवसाय - शेती रा.सातरगांव, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती
५. जीवन विठोबा लोमटे (मुलगा), वय ५७ वर्षे, व्यवसाय - शेती रा.सातरगांव, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील नमुद अर्जदारांनी या न्यायालयात मुंबई अधिनियम (८) १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज सादर केला आहे. अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ५ यांचे वडील **श्री.विठोबा महादेव लोमटे** हे दिनांक ३.११.२०१९ रोजी सातरगांव, ता.नांदगावं खंडे., जि.अमरावती येथे मरण पावले. तसेच अर्जदारांनी नमुद केल्याप्रमाणे मृतकाच्या पश्चात वरील अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असून त्यांना वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. म्हणून या न्यायालयात जी कोणी व्यक्ती वरील वारस प्रमाणपत्र देण्यास हरकत घेऊ इच्छित असेल, त्याने आपल्या हरकती दिनांक १८.०७.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात स्वतः हजर राहून किंवा योग्य वकीलामार्फत लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा कोणतीही हरकत नसल्याचे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०१२/२०२६
**श्रीमती अनुराधा अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२२.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Anuradha Krushnarao Linge, Age 75 Yrs. Occu.: Housewife
2. Shri Ravindra Krushnarao Linge, Age 56 Yrs. Occu.: Business
Both R/o Adwait, Harsahraj Colony, V.M.V.Road, Amravati.
3. Sau.Sakshi Sanjay Lohakare, Age 55 Yrs. Occu.: Housewife
R/o Plot No.41, P & T Colony, Ranapratap Nagar, Nagpur

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत कृष्णराव अंबादास लिंगे** हे दिनांक 17.05.2020 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अनुराधा अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अनुराधा अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०४३/२०२६
**नारायण व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०३.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Narayan Tulshiram Shelke, Age 54 Yrs. Occu.: Farmer
2. Sanjay Tulshiram Shelke Age 53 Yrs. Occu.: Farmer
Both R/o Chanduri Post Kawatha Bahade Chanduri, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत तुळशिरामजी गणपतराव शेळके** हे दिनांक 24.02.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **नारायण व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **नारायण व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२५.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 87/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **उत्थान चॅरिटेबल ट्रस्ट, न्यू अंबिका नगर, तपोवन, अमरावती ता. जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **शुभम दिलीपराव वानखडे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत -** रु.५,०००/- मात्र (अक्षरी रुपये पाच हजार मात्र फक्त)
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०४.०६.२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

## जाहीर नोटीस

## जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, अमरावती

क्र.न.भू.-१/अपील अर्ज क्र.२४८२/२०२४    अमरावती दिनांक २६.०५.२०२६

प्रति,
श्री.नरेंद्र नामदेवराव मोरे,
रा.पखिडे लेआऊट, विजय नगर नागपूर-४४००१६    **अपिलार्थी**

-- विरुध्द --

१. उपअधीक्षक भूमि अभिलेख, अंजनगांव सुर्जी.
२. केशव सुखदेवराव मेश्राम,
३. गजानन सुखदेवराव मेश्राम
अ.क्र.२ व ३ रा.कसबेगव्हाण, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती
४. रविंद्र सुखदेवराव मेश्राम (मयत)
४अ) किरण रविंद्र मेश्राम
४ब) अक्षय रविंद्र मेश्राम
४क) अजय रविंद्र मेश्राम,
अ.क्र.४अ) ते ४ब) रा.द्वारा गौतम प्रेमनाथ घरडे,
रा.राहुल नगर, बिच्छु टेकडी, अमरावती    **उत्तरार्थी**

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजे कसबेगव्हाण, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती येथील शिट नं.३, प्लॉट नं.६२७ चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरवादी नं.२ व ३ तसेच उत्तरवादी नं.४ तर्फे ४अ) ते ४क) हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसल्यामुळे उत्तरार्थी यांना याद्वारे कळविण्यात येते की, दिनांक १७.०६.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिलकामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक २६.०५.२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिले आहे.

शिक्का

**(महेशकुमार शिंदे)**
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख,
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २७८**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

मंगळवार, दि. १६ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# 14 दिवसांत 78 आरोपींच्या आवळल्या मुसक्या..!

## हातभट्टी दारूविक्रेत्यांवर राज्य उत्पादन शुल्कची कारवाई; ९० गुन्हे दाखल, १० लाखांचा मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १५ : जिल्ह्यात अवैध हातभट्टी दारूच्या वाढत्या विळख्याला चाप लावण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने राबविलेल्या विशेष धडक मोहिमेत अवघ्या १४ दिवसांत तब्बल ९० गुन्हे दाखल करून ७८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत १० लाख ४३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, अवैध दारू व्यवसायाच्या मुळावर घाव घालण्याचा प्रशासनाचा निर्धार पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.**



१ ते १४ जून या कालावधीत जिल्ह्यातील विविध भागांमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकांनी एकाच वेळी धडक छापेमारी मोहीम राबविली. जंगल परिसर, नदीकाठ, शेतशिवार आणि दुर्गम भागांमध्ये सुरू असलेल्या हातभट्ट्यांवर छापे टाकून अवैध दारू निर्मितीचे अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले. कारवाईदरम्यान २२ हजार ६२५ लिटर मोहा रसायन नष्ट, ८५० लिटर हातभट्टी दारू आणि ८४ लिटर देशी दारू जप्त करण्यात आली. विशेष म्हणजे, अनेक ठिकाणी अवैध दारू उत्पादकांनी कारवाईची चाहूल लागताच पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, अधिकाऱ्यांनी जीवाची पर्वा न करता पाठलाग करून आरोपींना ताब्यात घेतले. अनेक कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी दुर्गम भागात प्रतिकूल परिस्थितीत काम करत ही मोहीम यशस्वी केली. ग्रामीण भागात हातभट्टी दारूमुळे विषबाधा, आरोग्याच्या समस्या, कौटुंबिक कलह, आर्थिक अधोगती आणि गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे. निकृष्ट व बनावट दारूची विक्री करून नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अवैध दारू माफियां विरोधात उत्पादन शुल्क विभागाने घेतलेली आक्रमक भूमिका सर्वसामान्य नागरिकांसाठी दिलासादायक ठरली आहे. या मोहिमेचे नेतृत्व अमरावती विभागाचे उपआयुक्त डॉ. पराग नवलकर आणि यवतमाळचे अधीक्षक नितेश शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. निरीक्षक पी.एस. बोढारे, धर्मेंद्र त्रिपाठी, नागूलवार, वलके, तायकर, प्रवीण मसराम, अविनाश पेंदोर, अमोल बोथले, राम पवार, अक्षय व्यवहारे, महेश खोब्रागडे, संगीत दुधे, मनवर शेंडे, स्नेहा बाळबुधे, मनोज शेंडे, पठाण आणि गजानन आयतवार आदी अधिकाऱ्यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. राज्य उत्पादन शुल्क विभागाने स्पष्ट केले आहे की, अवैध हातभट्टी दारूविरोधातील कारवाई ही केवळ मोहीम नसून सामाजिक आरोग्य आणि कायदा-सुव्यवस्था टिकविण्यासाठीची सातत्यपूर्ण लढाई आहे. त्यामुळे आगामी काळातही अशाच धडक कारवाया सुरू राहणार असून, अवैध दारू माफियांवर कायद्याचा फास आणखी घट्ट केला जाणार असल्याचे संकेत विभागाकडून देण्यात आले आहेत.

# 'कामगारांची सुरक्षा प्रथम'..! आरसीसीपीएलच्या त्रिपक्षीय बैठकीत सुरक्षित खाण व्यवस्थापनाचा निर्धार



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी , दि. १५ :** आरसीसीपीएल (एम. पी. बिर्ला समूह) अंतर्गत कार्यरत असलेल्या मुकुटबन लाईमस्टोन अँड डोलोमाईट माईन्स आणि परसोडा लाईमस्टोन माईनची पहिली त्रिपक्षीय सुरक्षा समिती बैठक नुकतीच नागपूर येथे पार पडली. खाण क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी आणि कामगारांच्या सुरक्षा, आरोग्य व कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या उद्देशाने या बैठकीचे आयोजन करण्यात आले.

बैठकीस मुख्य अतिथी म्हणून नागपूर पश्चिम क्षेत्राचे खाण सुरक्षा उपमहानिदेशक रामअवतार मीना उपस्थित होते. यावेळी आरसीसीपीएलचे चीफ ऑफ मॅन्युफॅक्चरिंग अँड प्रोजेक्ट्स रजत कुमार प्रस्ती, डीजीएमएसचे वरिष्ठ अधिकारी, कंपनीचे युनिट हेड सुनील सूद, कॉर्पोरेट मायनिंग हेड सूरज गुप्ता, एचओडी माईन्स के. के. राठोड तसेच कामगार प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत रामअवतार मीना यांनी 'ऑक्युपेशनल सेफ्टी, हेल्थ अँड वर्किंग कंडिशन्स (सेंट्रल) रूल्स, २०२६' मधील तरतुदींचा उल्लेख करत खाण उद्योगात सुरक्षा संस्कृती अधिक बळकट करण्याची गरज अधोरेखित केली. "खाणीत काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याची सुरक्षा ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून नैतिक आणि मानवी कर्तव्य आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी रजत कुमार प्रस्ती यांनी कंपनीच्या वतीने कर्मचाऱ्यांचे कल्याण आणि सुरक्षित कार्यपरिस्थिती निर्माण करण्यासाठी आरसीसीपीएल पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे सांगितले. खाणींमध्ये सुरक्षा मानकांचे काटेकोर पालन करून कामगारांच्या हितरक्षणासाठी सर्व आवश्यक उपाययोजना वेळेत राबविण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# केंद्रप्रमुख भरतीचा मार्ग मोकळा..!

## जि.प. शाळांना नवी ऊर्जा, २५०० शिक्षक भरतीची संधी!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १५ :** गेल्या तीन वर्षांपासून विविध तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे रखडलेल्या केंद्रप्रमुख भरती प्रक्रियेला अखेर गती मिळाली असून, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर कागदपत्र पडताळणीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आता लवकरच समुपदेशना द्वारे अंतिम नियुक्त्या करण्यात येणार असल्याने राज्यातील जिल्हा परिषद शाळांच्या शैक्षणिक व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार आहे.

या भरती द्वारे राज्यातील ३४ जिल्हा परिषदांमध्ये तब्बल २,४१० केंद्र प्रमुखांची नियुक्ती होणार आहे. केंद्रप्रमुख हे शाळा आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा मानले जातात. एका केंद्रप्रमुखा कडे साधारण १३ ते १६ शाळांची शैक्षणिक व प्रशासकीय जबाबदारी असते. अनेक वर्षे ही पदे रिक्त असल्याने शाळांच्या प्रबंधन परिणाम होत होता. नव्या नियुक्ती मुळे शाळांच्या कामकाजात गती येऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी सह बळ मिळणार आहे. यवतमाळ जिल्ह्यात ८९ केंद्र प्रमुखांची नियुक्ती होणार असून, त्यामध्ये पीएच.डी., नेट, सेट उत्तीर्ण तसेच संशोधन क्षेत्रातील अनुभवी शिक्षकांचा समावेश असल्याने शैक्षणिक गुणवत्तावाढीस हातभार लागण्याची अपेक्षा आहे.दरम्यान, विद्यमान शिक्षक केंद्रप्रमुख पदावर रुजू झाल्यानंतर त्यांच्या जागा रिक्त होणार आहेत. त्यामुळे 'पवित्र पोर्टल'मार्फत सुमारे २,५०० नव्या शिक्षक भरतीचा मार्ग खुला होणार आहे. २०२३ पासून नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या डी.एल.एड. आणि बी.एड. पात्र उमेदवारांसाठी ही मोठी संधी मानली जात आहे. या निर्णयाचे शिक्षक संघटनांनी स्वागत केले असून, ग्रामीण शिक्षण व्यवस्थेला नवसंजीवनी मिळून शाळांची गुणवत्ता आणि प्रशासन दोन्ही अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# शेतमजूर व अल्पभूधारक कुटुंबाना शेळीचे वाटप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. १५ :** विकासगंगा समाजसेवी संस्थे द्वारा यवतमाळ तालुक्यातील १० गावातील शेतमजूर व अल्पभूधारक कुटुंबांची उपजीविका मजबूत करण्यासाठी अझीम प्रेमजी फाऊंडेशनच्या सहयोगाने ७६८ कुटुंबांतील महिलांना शेळीचे वाटप करण्यात आले. यावेळी तालुक्यातील गाव सुकळी येथे रमाकांत कुलकर्णी (बापू) (महाराष्ट्र लोक विकास मंच) यांनी उपस्थित राहून लाभार्थी महिलाना मार्गदर्शन केले.

नेमके याच वेळी एका शेळीने पिल्लास जन्म दिल्याने शेळी मिळालेल्या लाभार्थी महिलेच्या व तिच्या मुलाच्या चेहऱ्यावर अतिशय आनंद झळकत होता. गेल्या ३० वर्षापासून ग्रामीणांची उपजीविका मजबूत करण्यासाठी



विकासगंगा संस्था सातत्याने प्रयत्न करत असून भूमीहीन व अल्पभूधारक शेतकरी कुटुंबाच्या जगण्याचा आधार निर्माण करण्याचे कार्य सुरू आहे.शेतीला पूरक असा व्यवसाय करता यावा आणि शेतकरी व शेतमजूरांची आर्थिक बाजू मजबूत व्हावी यामागील उद्देश असून विकासगंगा समाजसेवी संस्था यासाठी मागील अनेक वर्षांपासून कार्य करीत आहे.

# सर्वोच्च न्यायालयात 'समाधान समारोह २०२६ विशेष लोकअदालतीचे आयोजन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १५ :** सर्वसामान्यांना सहज, सुलभ आणि जलद न्याय मिळावा तसेच परस्पर सामंजस्य व सहमतीच्या माध्यमातून प्रकरणांचा निपटारा व्हावा या उद्देशाने भारताच्या सर्वोच्च न्यायालयातर्फे 'समाधान समारोह २०२६ विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २१, २२ व २३ ऑगस्ट २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात या विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात येणार असून, त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयातील तडजोडपात्र प्रलंबित प्रकरणांचा समावेश राहणार आहे.

या प्रकरणांमध्ये लोकअदालतीपूर्वी सामंजस्याने तडजोड घडवून आणण्यासाठी राज्य, जिल्हा, तालुका तसेच उच्च न्यायालय विधी सेवा प्राधिकरणांच्या मध्यस्थता केंद्रांमध्ये पूर्वबैठकांचे आयोजन करण्यात येणार आहे.संबंधित सर्व घटकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समिती आणि उच्च न्यायालय विधी सेवा प्राधिकरणांच्या मध्यस्थता केंद्रांमध्ये प्रशिक्षित मध्यस्थ, सचिव आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिकारी पक्षकारांना आवश्यक सहकार्य करणार आहेत. सामंजस्य व तडजोड बैठकींमध्ये पक्षकारांना प्रत्यक्ष किंवा आभासी पद्धतीने सहभागी होता येणार आहे. 'समाधान समारोह २०२६ विशेष लोकअदालतीमध्ये सहभाग नोंदविण्यास इच्छुकांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, यवतमाळ येथे संपर्क साधावा, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आले आहे.

# थोडक्यात

## जंगलात गळफास घेऊन इसमाने संपवले जीवन

**बाभुळगाव :** तालुक्यातील मादणी गावातील मदनेश्वर आश्रम शाळेच्या



मागील वनविभागाच्या जंगलात १४ जून रोजी सकाळी पांडुरंग विठ्ठल कुंभेकार (४०) रा. मादणी यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला.

घटनेबाबत पांडुरंगचे धाकटे भाऊ राम विठ्ठल कुंभेकार यांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, पांडुरंगला अनेक वर्षांपासून दारूचे व्यसन होते. १३ जून रोजी दुपारी सुमारे १ वाजता दारूच्या नशेतच तो घरातून निघून गेला आणि त्या दिवशी मध्यरात्रीपर्यंत तो न सापडल्याने कुटुंबीय चिंतित होते. मात्र दुसऱ्या दिवशी, १४ जून रोजी सकाळी ६ वाजताच्या सुमारास स्थानिकांकडून आश्रम शाळेमागच्या जंगलात टेंभुर्णीच्या झाडाला पांढऱ्या शेल्याने गळफास घेतलेला पांडुरंगचा मृतदेह आढळल्याची माहिती मिळाली. त्यानुसार मृतकाचा भाऊ राम व इतर नातेवाईक घटनास्थळी धावून गेले आणि पोलिसांना परिस्तिथीविषयी माहिती दिली. (ता.प्र.)

## आदिवासी विकासमंत्र्यांचा नागरिकांशी संवाद दौरा

**बाभूळगाव :** आदिवासी विकास मंत्री प्राचार्य डॉ. अशोक उईके यांनी



जनसंपर्क अभियानाअंतर्गत दाभा, मालापूर, गणोरी, कोटंबा आदी गावांना भेट दिली. बाभूळगाव येथील दौऱ्यात त्यांनी प्रवीण दयाचंदजी तातेड, डॉ. सारिका कापसे, डॉ. रिखबचंद जैन, डॉ. भास्कर गलाट, अरुण नवाडे, लिंबा कुलाल, भगरत प्रसाद गुप्ता, प्रताप देशमुख आदींच्या घरी भेटी देऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी विजय वर्मा, अमित दोडके, दिनेश वर्मा, गौरव तातेड, भारत इंगोले, शुभम तिखे, सुभाष मोटके, सागर काळे, विवेक बुरेवार आदी उपस्थित होते.

## तडीपार आरोपी जुगाराच्या अड्ड्यावर गजाआड !

**दिग्रसमध्ये एलसीबीचा छापा ६.८० लाखांचा मुद्देमाल जप्त**

**यवतमाळ :** दिग्रस तालुक्यातील झिरपुडवाडी येथील शेत शिवारात सुरू



असलेल्या जुगाराच्या अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने धाड टाकून तडीपार आरोपी सह पाच जुगाऱ्यां विरुद्ध गुन्हा दाखल केला. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल, दुचाकी आणि चारचाकी सह एकूण ६ लाख ८० हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दिग्रस पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना झिरपुडवाडी येथील शेतात लिंबाच्या झाडाखाली 'एक्का बादशहा' नावाचा जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार छापा टाकण्यात आला. पोलिसांना पाहून तीन जुगारी पसार झाले, तर जीवन धनू राठोड (रा. आरंभी) आणि गणेश दयाराम आडे (रा. देवगाव) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत जीवन राठोड हा उपविभागीय दंडाधिकारी, पुसद यांच्या आदेशाने दोन वर्षांसाठी यवतमाळ जिल्ह्यातून तडीपार करण्यात आलेला आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. तडीपार आदेशाचे उल्लंघन करून तो जुगार खेळताना आढळल्याने त्याच्याविरुद्ध अतिरिक्त गुन्हा दाखल करण्यात आला.पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप. नि. शिवशंकर कायंदे व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली.

# पेसा मोबिलायझर्सची पदकपात रद्द करण्याची मागणी..!

## संघर्ष समितीचे आमदार व गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. १५ :** पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यरत असलेल्या ग्रामसभा मोबिलायझर्सची मंजूर पदे कमी करण्याच्या शासन निर्णयाविरोधात पेसा ग्रामसभा मोबिलायझर्स कर्मचारी संघर्ष समिती, यवतमाळ यांच्या वतीने सोमवार (दि. १५ जून) रोजी आर्णी-केळापूरचे राजू तोडसाम तसेच पांढरकवडा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

समितीच्या म्हणण्यानुसार, २०१६ च्या शासन निर्णयानुसार प्रत्येक पेसा ग्रामपंचायतीसाठी एक ग्रामसभा मोबिलायझर नियुक्त करण्यात आला होता. मात्र, नव्या निर्णयानुसार तीन ग्रामपंचायतींसाठी एकच मोबिलायझर नियुक्त करण्याचा प्रस्ताव असून हा निर्णय अन्यायकारक व आदिवासी भागांच्या हिताविरुद्ध असल्याचा आरोप करण्यात आला आहे.संघर्ष समितीच्या अध्यक्षा कॉ. ज्योत्स्ना



महेश उईके यांनी सांगितले की, आदिवासी भागातील भौगोलिक परिस्थिती अत्यंत दुर्गम असून २०१७-१८ पासून मोबिलायझर्स अत्यल्प मानधनावर काम करत आहेत. अशा परिस्थितीत पदे वाढविण्या ऐवजी कमी करणे म्हणजे पेसा कायद्याच्या अंमलबजावणीला कमकुवत करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी म्हटले. निवेदनात शासनाने हा निर्णय तात्काळ रद्द करून प्रत्येक ग्रामपंचायतीस एक मोबिलायझर कायम ठेवावा तसेच मोबिलायझर्सच्या मानधनात वाढ करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच हा निर्णय आदिवासी स्वशासनाच्या संकल्पनेला धक्का देणारा असून आदिवासी विकास प्रक्रियेत अडथळे निर्माण करणारा असल्याचा आरोपही करण्यात आला. दरम्यान, शासनाने हा निर्णय मागे न घेतल्यास पेसा मोबिलायझर संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्य तसेच इतर समविचारी संघटना, संस्था व राजकीय पक्षांच्या सहकार्याने तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला. यावेळी संघर्ष समितीच्या अध्यक्षा कॉ. ज्योत्स्ना उईके, उपाध्यक्षा कॉ.मीना उईके, खुलना तोडसाम, सुवर्णा धुर्वे, ज्योत्स्ना सोयाम, अर्चना मडावी, माला सोयाम, ज्योत्स्ना सोयाम, सुनिता सुरपाम, लक्ष्मी गेडाम, मंगला जुमनाके, लता जुमनाके यांच्यासह अनेक मोबिलायझर्स उपस्थित होते.

# महागाव नगर पंचायतीचा कारभार 'कचराकोंडीत'..!

## चार महिन्यांपासून विकासकामे ठप्प, लोक आंदोलनाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव :** महागाव नगर पंचायतीचा कारभार पूर्णपणे ठप्प झाला असून गेल्या चार महिन्यांपासून शहरात एकही नवीन विकासकाम सुरू नसल्याचा गंभीर आरोप शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा नगरसेवक शैलेश कोपरकर यांनी केला आहे. शहरात स्वच्छतेचा बोजवारा उडाला असून सर्वत्र कचऱ्याचे ढीग साचल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीवेळी विकासाची मोठी आश्वासने देणारे भाजपचे नेते आता शहरातील गंभीर प्रश्नांवर मौन बाळगून असल्याचा आरोप कोपरकर यांनी केला. रस्ते, पाणीपुरवठा, घनकचरा



व्यवस्थापन आणि स्वच्छतेचे प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत असून नगरपंचायत प्रशासन व सत्ताधारी नागरिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करीत असल्याचे त्यांनी म्हटले. विशेष म्हणजे नगराध्यक्षांचा प्रभाग असलेल्या प्रभाग क्रमांक एक मध्येच कचऱ्याचे ढीग, सांडपाणी आणि अस्वच्छतेचे चित्र दिसत आहे. नगरपंचायतीच्या मुख्य कार्यालय परिसरातच स्वच्छतेचा अभाव असल्याने इतर प्रभागांची स्थिती किती गंभीर असेल, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. काँग्रेसच्या काळात मंजूर झालेली काही विकासकामे जाणूनबुजून रखडवून ठेवण्यात आल्याचा आरोपही कोपरकर यांनी केला. सत्ताधाऱ्यांच्या निष्क्रियते मुळे शहराचे सौंदर्य धोक्यात आले असून रोगराई पसरण्याचा धोका वाढला आहे. नगरपंचायत प्रशासनाने तातडीने स्वच्छता मोहीम राबवून कचऱ्याचे ढीग हटवावेत, रखडलेली विकासकामे सुरू करावीत, अन्यथा तीव्र लोक आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शैलेश कोपरकर यांनी दिला आहे.

# एफडीएच्या 'एन्ट्री'च्या चर्चेने फुलसावंगी थरारले!

## शटर डाउन किराणा, हॉटेल्स, पानठेले तडकाफडकी बंद, बाजारपेठेत 'दाल में कुछ काला'ची चर्चा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ मनीष ढाले

**फुलसावंगी, दि. १५ :** जिल्हा अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाचे पथक कारवाईसाठी फुलसावंगीकडे येत असल्याची केवळ चर्चा पसरताच संपूर्ण शहरात एकच खळबळ उडाली. प्रत्यक्षात पथक गावात पोहोचले की नाही, याची कोणतीही खात्री नसतानाही अनेक किराणा दुकानदार, हॉटेल व्यावसायिक आणि पानठेले चालकांनी घाईघाईने दुकाने बंद करून अक्षरशः पळ काढल्याचे चित्र सोमवारी दुपारी पाहायला मिळाले.

गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात प्रतिबंधित अन्नपदार्थ, भेसळयुक्त खाद्यपदार्थ आणि विनापरवाना सुरू असलेल्या



व्यवसायांवर एफडीएकडून धडक कारवाया सुरू आहेत. याच पार्श्वभूमीवर फुलसावंगीत दुपारच्या सुमारास 'एफडीएचे पथक गावात धडकणार' अशी बातमी वाऱ्यासारखी पसरली. या चर्चेने व्यापाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. मुख्य बाजारपेठेतील अनेक किराणा दुकाने, हॉटेल्स आणि पानठेले काही मिनिटांतच कुलूपबंद करण्यात आले. नेहमी ग्राहकांनी गजबजलेल्या चौकांमध्ये अचानक शांतता पसरली. ग्राहकांना नेमके काय घडत आहे, याचा अंदाज येण्यापूर्वीच अनेक व्यावसायिकांनी दुकाने बंद करून माघार घेतल्याने नागरिकांमध्ये आश्चर्य आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. विशेष म्हणजे, केवळ एका चर्चेने एवढ्या मोठ्या प्रमाणावर व्यापाऱ्यांनी दुकाने बंद करण्याचा निर्णय का घेतला, यावर आता नागरिकांमधून प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. जर सर्व व्यवहार नियमांनुसार सुरू असतील, तर एफडीएच्या संभाव्य भेटीच्या चर्चेने एवढी धास्ती का निर्माण झाली? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. या घटनेनंतर फुलसावंगीच्या बाजारपेठेतील अन्नसुरक्षा, परवानग्या, स्वच्छता आणि नियमपालनाबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. केवळ अफवेने बाजारपेठ ठप्प होणे ही सामान्य घटना नसून, त्यामागे काहीतरी संशयास्पद असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. परिणामी, "एफडीएचे पथक आले की नाही, यापेक्षा त्यांच्या येण्याच्या चर्चेनेच व्यापारी पळाले, हेच सर्वाधिक बोलके आहे," अशी प्रतिक्रिया फुलसावंगीकरांमध्ये उमटत असून, 'दाल में कुछ काला है' या म्हणीची प्रचिती या घटनेतून आल्याची चर्चा दिवसभर रंगत होती.

# नॅशनल शुगर युनिट २ चा विदर्भात उच्चांकी रु २९१३ प्रतिटन अंतिम ऊस दर.. बी बी ठोंबरे

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ किरण नरवाडे

**महागाव, दि. १५ :** गुंज, नॅचरल शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड युनिट नंबर २ सवना या कारखान्याच्या १० व्या गाळप हंगाम २०२५ - २६ मध्ये गाळपास आलेल्या उसाचा अंतिम ऊस दर एफ आर पी नुसार रु २९१३ प्रतिटन देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतल्याचे कृषिरत्न श्री बीबी ठोंबरे अध्यक्ष नॅचरल उद्योग समूह यांनी सांगितले.

पुढे बोलताना त्यांनी नॅचरल उद्योगाने विदर्भातील सर्वात उंची दर देण्याची परंपरा कायम ठेवली आहे शेतकऱ्यांचे हित लक्षात



घेऊन सदैव जास्तीत जास्त ऊस दर देण्याचे व शेतकऱ्याचा व शेतकऱ्यांमध्ये आर्थिक स्थैर्यता आणण्याचा प्रयत्न केला आहे. कारखाना क्षेत्रात अद्याप मान्सून पूर्व पाऊस समाधानकारक झाला नाही. तरीसुद्धा पूर्वतयारी म्हणून ऊस पिकाचे खत व्यवस्थापन, मशागती करणे आणि खरीप पिकाची पेरणी करण्यासाठी ऊस बिलाचा अंतिम हप्ता रुपये २१३ प्रति टन अदा करण्यात येत आहे. तसेच नॅचरल शुगरने सदैव विदर्भामध्ये जास्तीत जास्त दर देण्याचा पायंडा कायम ठेवला आहे. गाळप हंगाम २०२५ -२६ मध्ये गाळपास आलेल्या उसाचा साठी रु २९१३ प्रति टन दर देण्याचे निश्चित केले असून विदर्भातील सर्वाधिक दर असल्याचेही त्यांनी सांगितले. कारखान्याने गाळप हंगाम २०२५ २६ मध्ये ५.५५ लक्ष मॅट्रिक टन ऊस गाळप केला असून या गळफास आलेल्या उसासाठी सर्वाधिक पहिला हप्ता रुपये २७०० प्रति टन प्रमाणे ऊस पुरवठादारांना गळा पास आणल्यानंतर १४ दिवसात अदा केलेला आहे व उर्वरित रक्कम रु २१३ प्रतिज्ञाच्या दुसरा व अंतिम हप्ता दिनांक १५ जून २०२६ पासून चेक द्वारे वाटप करण्यात येणार असल्याचे कृषिरत्न बि बी ठोंबरे यांनी सांगितले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# ४८ कोटींची वसुली की चांडकांना ‘लाईफलाईन’?

## बोजा चढवून महसूल विभाग मोकळा; उद्योग, बँक खाती आणि कंत्राटी देयके मात्र अजूनही सुरक्षित!

### -जनमाध्यमच्या वृत्तांनंतर कारवाईचा देखावा?; एसडीओ-तहसीलदारांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह

**ॲड. समीर ठाकूर**
**अकोला :** अकोट तालुक्यातील मौजे गाजीपूर येथील कथित अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणात आकारण्यात आलेल्या तब्बल ४८ कोटी रुपयांच्या दंडवसुलीभोवतीचे गूढ दिवसेंदिवस अधिकच गडद होत चालले आहे. महसूल प्रशासनाने नुकतीच संतोष चांडक यांच्याशी संबंधित काही मालमत्तांच्या सातबाऱ्यावर शासनाच्या दाव्याचा बोजा चढविल्याची माहिती समोर आली असली, तरी ही कारवाई प्रत्यक्ष वसुलीसाठी आहे की केवळ चौकशी आणि जनक्षोभापासून बचावासाठी उभारलेले ‘प्रशासकीय कवच’ आहे, असा सवाल आता उघडपणे उपस्थित केला जात आहे. कारण तब्बल ४८ कोटी रुपयांच्या दंडाची वसुली करायची असेल तर केवळ सातबाऱ्यावर बोजा चढवून महसूल विभागाची जबाबदारी संपत नाही. उलट महसूल संहिता आणि उपलब्ध कायदेशीर अधिकारांचा वापर करून संबंधितांचे उद्योग, आर्थिक व्यवहार, बँक खाती आणि शासकीय कंत्राटांमधील देयकांवर थेट कारवाई होणे अपेक्षित असते. मात्र अशा कोणत्याही कठोर उपाययोजना झाल्याचे अद्याप दिसून आलेले नाही. याप्रकरणी अकोट एसडीओ मनोज लोणारकर आणि तहसीलदार सुनील चव्हाण यांना संपर्क साधून त्यांची बाजू जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता होऊ शकला नाही.

**■ जिल्हाधिकाऱ्यांसमोर ‘अग्निपरीक्षा’**

या संपूर्ण प्रकरणात आता सर्वांचे लक्ष जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या चौकशीकडे लागले आहे. महसूल विभागाच्या आतल्या यंत्रणेकडून होणाऱ्या चौकशीवर विश्वास व्यक्त करण्यास अनेक नागरिक तयार नसल्याने महसूल विभागाबाहेरील वरिष्ठ अधिकाऱ्यांची स्वतंत्र समिती नेमण्याची मागणी पुढे येत आहे. ४८ कोटींच्या दंडवसुलीची ही लढाई आता केवळ महसुलाची राहिलेली नाही; ती प्रशासनाच्या विश्वासार्हतेची, पारदर्शकतेची आणि निष्पक्षतेची परीक्षा बनली आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल आणि त्यानंतर होणारी कारवाईच या प्रकरणातील सत्य बाहेर आणणार की संशय आणखी गडद करणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**■ ‘हात ओले’ झाल्याची चर्चा; स्वतंत्र चौकशीची मागणी**

गाजीपूर प्रकरणात कथित अटीभंग, दंडवसुलीतील विलंब, उद्योगांवरील कारवाईचा अभाव, अपील प्रक्रियेतील प्रश्न आणि मालमत्तांच्या निवडीतील कथित विसंगती या सर्व घटनांमुळे अकोट तालुक्यात विविध चर्चांना उधाण आले आहे. या चर्चांमध्ये किती तथ्य आहे, हे चौकशीअंतीच स्पष्ट होणार असले तरी महसूल प्रशासनाच्या भूमिकेमुळेच संशयाला खतपाणी मिळाल्याचे नागरिकांचे मत आहे. काही ठिकाणी संबंधित अधिकाऱ्यांचे ‘हात ओले’ झाल्याचीही चर्चा रंगत असून या चर्चांना पूर्णविराम देण्यासाठी स्वतंत्र विशेष चौकशी समिती नेमण्याची मागणी जोर धरत आहे.

**■ खरोखर वसुली करायची असेल तर उद्योग सील का नाहीत?**

महसूल विभागाला दंडाची रक्कम वसूल करण्याची खरी इच्छा असेल तर संबंधित उद्योगांवर थेट कारवाई करणे अपेक्षित असल्याचे कायदेविषयक जाणकारांचे मत आहे. अवैध उत्खननाशी संबंधित उद्योग, क्रशर युनिट्स किंवा व्यावसायिक आस्थापनांवर महसूल प्रशासनाने कारवाई करून त्यांना सील करणे, व्यवसायिक व्यवहारांवर निर्बंध आणणे, बँक खात्यांवर कायदेशीर प्रक्रिया राबविणे आणि आर्थिक स्रोत रोखणे हे पर्याय उपलब्ध आहेत. मात्र आतापर्यंत अशा कोणत्याही निर्णायक कारवाईची नोंद दिसत नसल्याने ’दंड वसूल करण्यापेक्षा वेळ मारून नेण्याचा प्रयत्न सुरू आहे का?’ असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**■ तहसीलदारांना संपत्तीचा शोध दोन महिन्यांत लागला नाही?**

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात मोठा प्रश्न म्हणजे गेल्या दोन-तीन महिन्यांपासून दंडवसुलीची प्रक्रिया सुरू असताना महसूल विभागाला संबंधितांची मालमत्ता शोधण्यात अपयश का आले? महसूल विभागाकडे डिजिटल सातबारा, ई-नोंदणी, कर अभिलेख, बँक गहाण नोंदी, उद्योग नोंदी आणि विविध शासकीय डेटाबेस उपलब्ध असताना संबंधितांच्या मालमत्तांची माहिती मिळाली नाही, यावर आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विशेष म्हणजे जनमाध्यमने कथित मालमत्तांची यादी आणि संबंधित तपशील प्रसिद्ध केल्यानंतरच महसूल प्रशासनाने बोजा चढविण्याची कारवाई सुरू केल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे ही कारवाई स्वयंस्फूर्त नसून दबावातून झाल्याची चर्चा रंगू लागली आहे.

**■ शासकीय कंत्राटदार असतील तर देयके गोठविणार का?**

स्थानिक पातळीवर चर्चेनुसार संबंधित व्यक्ती विविध शासकीय विभागांशी कंत्राटी स्वरूपात जोडलेले असल्याचे बोलले जाते. अशा परिस्थितीत महसूल प्रशासनाने संबंधित विभागांकडून माहिती मागवून त्यांच्या प्रलंबित देयकांची माहिती घेणे आणि शासनाकडे येणारी रक्कम दंडवसुलीकडे वळविणे अपेक्षित मानले जाते. परंतु अशा प्रकारची कोणतीही प्रक्रिया सुरू झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे प्रशासनाच्या कारवाईच्या प्रामाणिकतेवरच प्रश्न उपस्थित होत आहेत.

**■ गट नं. २७, ३८ प्रकरणात जमीन ताब्यात घेण्याची कारवाई का नाही?**

मौजे गाजीपूर येथील गट क्रमांक २७ व ३८ मधील जमिनींचे कथित भाडेपट्टे शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय झाल्याचा आरोप सातत्याने केला जात आहे. जर या आरोपांमध्ये तथ्य आढळत असेल तर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील संबंधित तरतुदींनुसार अटी व शर्तींचा भंग झाल्याबद्दल कठोर कारवाई अपेक्षित असल्याचे जाणकारांचे मत आहे. अशा परिस्थितीत संबंधित जमीन शासन ताब्यात घेणे, तेथील उद्योगांवर कारवाई करणे आणि संपूर्ण व्यवहाराची चौकशी करणे अपेक्षित असताना महसूल प्रशासनाची भूमिका मात्र अत्यंत सौम्य असल्याची चर्चा आहे.

**गट नं. ३७ वर नव्या करारनाम्याचीही चौकशी होणार का?**

दरम्यान, गट क्रमांक ३७ संदर्भातही नव्याने भाडेपट्टा अथवा करारनामा झाल्याची चर्चा असून त्याचीही चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. जर संबंधित जमीन व्यवहारांमध्ये महसुली अटींचे उल्लंघन झाले असेल तर त्या ठिकाणी सुरू असलेल्या क्रशर उद्योगांवर कारवाई करून जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया राबविणे अपेक्षित असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. मात्र या सर्व बाबींवर महसूल प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस हालचाल दिसून येत नसल्याने संशय अधिकच बळावत आहे.

**एसडीओंच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह**

या प्रकरणात दंडवसुलीवर कोणताही स्थगिती आदेश नसल्याची चर्चा असताना संबंधितांची अपील याचिका स्वीकारण्यात आली. त्याचबरोबर अपील प्रक्रियेदरम्यान दंडाच्या रकमेपैकी कोणतीही रक्कम जमा करून घेण्यात आली का, याबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. महसूल वर्तुळात या प्रक्रियेबाबत विविध चर्चा सुरू असून यामुळे अकोट उपविभागीय अधिकारी (एसडीओ) यांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचे बोलले जात आहे.



# बडनेरात स्वच्छतेचा बोजवारा

## कचऱ्याने भरलेले वाहन घेऊन मनपामध्ये धडकले नगरसेवक

### -कोणार्क कंपनीच्या विरोधात आक्रोश





**-आयुक्तांसमोर गोंधळ**

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक प्रभाग क्रमांक २१ आणि २२ बडनेरा मध्ये स्वच्छतेचा बोजवारा उडाला आहे. यामुळे परिसरात जागो जागी घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. नागरिकांच्या आरोग्यावर याचा परिणाम होत आहे. तक्रार करूनही लक्ष दिले जात नाही. यामुळे प्रभागातील संतापलेल्या नगरसेविका मीरा कांबळे आणि सामाजिक कार्यकर्ता संदीप कांबळे यांनी कोणार्क कंपनी विरोधात आक्रोश करत प्रभागातील कचरा भरलेला एक वाहन घेऊन महानगरपालिकेमध्ये धडक दिली. त्यांनी मनपा आयुक्तांसमोर गोंधळ घातला. यामुळे परिसरात काही काळासाठी तणाव निर्माण झाला होता. बडनेरा नवी आणि जूमी वस्ती परिसरातील प्रभागांमध्ये कचरा उचलणारे वाहन नाही पोहोचत.यामुळे रस्त्यावर कचऱ्याचे ढीग लागलेले आहे. पावसाचे दिवस सुरू होत आहे पण नाल्यांची सफाई नाही झाली. ☞(पान २ वर)

# इर्विन, डफरीन व सुपर मधील दुरावस्था, नोडल अधिकारी संतापले

### पालकमंत्र्यांनी फटकारल्यानंतर आरोग्य विभागाला आली जाग



**अमरावती/प्रतिनिधीः-** आरोग्य व्यवस्थेतील त्रुटींवरून राज्य शासन गंभीर झाल्याचे चित्र समोर आले आहे. राज्य सार्वजनिक आरोग्य विभागाचे राज्य नोडल अधिकारी डॉ. स्वप्नील सांगळे यांनी आज सोमवार १५ जून रोजी जिल्हा सामान्य☞(पान २ वर)

# कारमधून अवैध देशी दारूची तस्करी उधळली



**-८.९४ लाखांचा मुद्देमाल जप्त; दोघे जेरबंद**

अमरावती/प्रतिनिधीः- कारमधून देशी दारूची अवैध वाहतूक करणा-यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ताब्यात घेतले. या कारवाईत देशी दारू, कार आणि मोबाईल असा एकूण ८ लाख ९४ हजार रुपयांचा ☞(पान २ वर)

# प्रवीण पोटे यांच्या विजयासाठी प्रयत्न करा

**-प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे आवाहन**

### विधान परिषद निवडणुकीचा घेतला आढावा





**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी १८ जून रोजी विधान परिषद निवडणुकी साठी मतदान होणार आहे. या निवडणुकी मध्ये भाजपा उमेदवार प्रवीण पोटे यांना विजयी बनविण्यासाठी सर्वपरी प्रयत्न करण्याचे आवाहन प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज सोमवार १५ जून रोजी अमरावती दौऱ्यावर ☞(पान २ वर)

# डीसीपी यशवंत सोळंके यांनी स्वीकारला पदभार



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती-नागपूर एएनटीएफचे माजी अपर पोलीस अधीक्षक यशवंत सोळंके यांनी अमरावती शहर पोलीस दलातील परिमंडळ-१ चे पोलीस उपायुक्त (डीसीपी) म्हणून पदभार स्वीकारला. यावेळी डीसीपी श्याम घुगे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

यशवंत सोळंके यांची अमरावती येथे दुसऱ्यांदा डीसीपीपदी नियुक्ती झाली आहे. यापूर्वी ते २०२३ ते २०२४ या कालावधीत अमरावती येथे डीसीपी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या मागील कार्यकाळात शहरातील सांप्रदायिक तणावाच्या घटनांवेळी त्यांनी अत्यंत संयम, दूरदृष्टी आणि कुशल नियोजनाच्या जोरावर परिस्थिती यशस्वीपणे नियंत्रणात ठेवली होती. तसेच ☞(पान २ वर)

# उदखेड शेत शिवारातील जुगार अड्ड्यावर धाड, १२ जण ताब्यात



**-१९.२० लाखाचा मुद्देमाल जप्त**

**मोर्शी/प्रतिनिधीः-** तालुक्यातील उदखेड शेत शिवारात सुरू जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड मारून बारा आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १९ लाख २० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आकाश दीपक खराले (२९ आठवडी बाजार), विशाल बलराम धुर्वे,(२४ तरोडा), ☞(पान २ वर)

# ३९.४८ किलो गांजासह दोघे जेरबंद

## बडनेऱ्यात पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-**बडनेरा पोलिसांनी दोन आरोपींना ३९.४८ किलो गांजासह अटक केली. जप्त अंमली पदार्थाची अंदाजे किंमत ४ लाख रुपये असून या प्रकरणात दोन आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बडनेरा पोलिसांना गोंदणीपुरा, जुनी वस्ती परिसरातील एका घरात मोठ्या प्रमाणात गांजा साठवून त्याची विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. माहितीची खातरजमा झाल्यानंतर पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार आणि सहायक पोलीस निरीक्षक संदीप हिवाळे यांच्या नेतृत्वाखाली दोन डीबी पथके तयार करून संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. घराची झडती घेत असताना बेडरूममध्ये प्लास्टिक व टेपने गुंडाळून ठेवलेली २७ पाकिटे आढळून आली. संशयित पाकिटांची तपासणी केली असता त्यामध्ये गांजा असल्याचे निष्पन्न झाले. वजन केल्यानंतर एकूण ३९.४८ किलो गांजा आढळून आला. पोलिसांनी संपूर्ण मुद्देमाल जप्त करून सीलबंद केला. या कारवाईदरम्यान विस्मिल्ला बेग यासीन बेग (५८, रा. गोंदणीपुरा, जुनी वस्ती, बडनेरा) आणि जाकीर खान रहेमत खान (४२, रा. सबा नगर, नागपुरी गेट, अमरावती) ☞(पान २ वर)

# कुमकुम मोहोडचा जागतिक धनुर्विद्या स्पर्धेत सुवर्णवेध

## मिक्स्ड टीम प्रकारात भारताला ऐतिहासिक सुवर्णपदक




**अमरावती/प्रतिनिधीः-** तुर्की येथील अंतालिया येथे ९ ते १४ जून २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ‘आर्चरी वर्ल्ड कप स्टेज-३’ (धनुर्विद्या विश्वचषक) स्पर्धेत भारतीय संघाने चमकदार कामगिरी करत सुवर्णपदकावर नाव कोरले आहे. अमरावतीच्या खेलो इंडिया केंद्राची प्रशिक्षणार्थी कुमकुम मोहोड हिने भारतीय संघातील धीरज बोम्मादेवरा राय याच्यासह मिक्स्ड टीम (मिश्र संघ) प्रकारात अंतिम सामन्यात दक्षिण कोरियाचा ५-१ अशा सेट फरकाने पराभव करून भारताला हे ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवून दिले आहे. अमरावती☞(पान २ वर)

# एसटी कामगारांचे घंटानाद आंदोलन -२९ पासून बेमुदत धरणे



**अमरावती/प्रतिनिधीः-** एसटी कामगार संयुक्त कृती समितीच्या वतीने आपल्या प्रलंबित मागण्यासाठी आज सोमवार १५ एप्रिल रोजी एसटी महामंडळ परिसरात घंटानाद आंदोलन करून प्रशासन व शासनाचे लक्ष वेधले. मागण्या पूर्ण न झाल्यास २९ जून पासून बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. महामंडळातील कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन लागू करण्यात यावे. कामगार घरासाठी ४८४८ कोटीचे पॅकेज एकतर्फी जाहीर करताना यापूर्वीच्या कामगार करारान्वये देय असलेल्या वार्षिक वेतन वाढीचा दर टक्केवारी दोन टक्के व घर भाडे भत्ता ८, १६, २४% एवजी ७, १४, २१ टक्के असा कमी केलेला होता सदर कमी केलेला दरे माहे ☞(पान २ वर)